CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २० मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १३१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### भविष्यात एमपीएससी मार्फत मोठी भरती करणार

मुंबई : भविष्यात एमपीएससी मार्फत मोठी भरती करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली. यूपीएससी प्रमाणे एमपीएससीमध्येही कॅलेंडर असेल, असे देखील देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. या संदर्भात आमदार शिवाजीराव गर्जे यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला होता. यावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. यूपीएससीच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर निश्चित केले जाणार असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. एम पीएससीची परीक्षा या वर्षीपासून आपण डिस्क्रिप्टिव्ह स्वरूपात घेणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. यासाठी काही नागरिकांचा विरोध आहे. मात्र हा विरोध ग्राह्य धरणार नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका देखील स्पष्ट केली आहे. एमपीएससी मध्ये मनुष्यबळ कमी असल्याने स्पर्धा परीक्षेची सर्व प्रक्रिया होऊन देखील उमेदवारांची पोस्टिंग होत नाही. याशिवाय पोस्टिंग देण्यासाठी काही व्यवहार होतात, असा आरोप आमदार विक्रम काळे यांनी सभागृहात केला होता. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे.

# महाल दंगलीचा म्होरक्या फहीम खानला अटक

**जमावाला दिली होती चिथावणी** | **दंगल भडकल्यावर काढला होता पळ** | **२९ दंगलखोरांना २१ पर्यंत पोलिस कोठडी**

◆ **नागपूर, १९ मार्च**

महाल परिसरात दंगल भडकविणारा म्होरक्या फहीम खान शमीम खानला पोलिसांनी बुधवारी अटक केली. जमावाला चिथावणी देत दगडफेक, जाळपोळ केल्याच्या आरोपाखाली फहीम खानवर गणेशपेठ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी फहीम खानसह त्याच्या २८ साथीदारांना अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना २१ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.



फहीम खान हा 'मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी'चा शहर अध्यक्ष आहे. त्याने २०२४ मध्ये नागपूर विधानसभा निवडणूक लढवली होती. त्याला केवळ १,०७३मते मिळाली होती. त्याने गणेशपेठ ठाण्यात विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात निवेदन दिले होते. तो त्याच्या ४०-५० साथीदारांसह ठाण्यात पोहोचला होता. धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपाखाली गणेशपेठ पोलिसांनी औरंगजेबाचा प्रतीकात्मक पुतळा जाळणाऱ्या ९ लोकांवर गुन्हे दाखल केले होते. पुतळा जाळणाऱ्यांना तासाभरात अटक करा, अशी त्याची मागणी होती.

यानंतर गांधीगेट परिसरातून फहीम खानच्या नेतृत्वातील युवक नारेबाजी करीत जात होते. त्यामुळे चिडलेल्या दुसऱ्या गटातील युवकांनी प्रत्युत्तरात घोषणाबाजी केली.

त्यामुळे वाद चिघळला. दोन्ही गटांतील युवक गोंधळ घालत असताना पोलिसांनी त्यांना शांत करीत परिसर रिकामा केला. त्यानंतर काही वेळातच दगडफेक सुरू झाली आणि पाहता पाहता दंगल भडकली. मात्र, त्यावेळी फहीम पळून गेला होता. पोलिसांनी फहीमसह त्याच्या २९ साथीदारांवर दंगल घडविणे, जाळपोळ, दगडफेक या प्रकरणी गुन्हे नोंदविले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

### कठोर कारवाई करणार

फहीम खानला अटक करण्यात आली आहे. त्याला न्यायालयाने २१ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. दंगल घडविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. समाज माध्यमांवरील चित्रफीत, कमांड कंट्रोल सेंटर आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे ओळख पटवून कारवाई केली जात आहे. समाज माध्यमांवरील चित्रफीत पाहिल्यावर सर्व चित्र स्पष्ट होईल, असे पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल म्हणाले.

### 'विहिंप' कार्यकर्त्यांचे आत्मसमर्पण; जामिनावर सुटका

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या आठ कार्यकर्त्यांनी कोतवाली पोलिसांसमोर आज आत्मसमर्पण केले. पोलिसांनी त्यांना अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आठही कार्यकर्त्यांची जामिनावर सुटका केली.

# शरद पवार-उध्दव ठाकरेंचे वर्णन कसे कराल; फडणवीस म्हणाले, दोघांचाही काही भरवसा नाही

**जयंत पाटलांच्या प्रश्नावर उत्तर; विविध प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांची दिलखुलास उत्तरे**

**मुंबई, १९ मार्च**

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे दोन-दोन वाक्यात तुम्ही कसे वर्णन कराल? असा प्रश्न जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना विचारला. यावर देवेंद्र फडणवीस यांनी दोन वाक्याऐवजी एका वाक्यात उत्तर दिले. फडणवीसांनी म्हटले की, एका वाक्यात उत्तर देतो. वाईट वाटून घेऊ नका. काही भरवसा नाही. या वाक्यात दोघांची देखील वागण्याची पद्धत आली. काही भरवसा नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.



एका वृत्तसंस्थेच्या पुरस्कार सोहळ्यात दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी हे वक्तव्य केले. गेल्या काही दिवसांपासून राज्याचे राजकारण वेगवेगळ्या विषयांवरून चांगलेच ढवळून निघाले आहे. औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण सुरु आहे. यातच नागपूरमध्ये दंगलीची घटना घडली. यावरून उद्धव ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. या टीकेला भाजपाकडून जोरदार प्रत्युत्तर दिले जात आहे. यातच आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली.या मुलाखतीत जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यातील विविध विषयांच्या संदर्भात प्रश्न विचारले. या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तरे दिली.

**मंत्र्यांनी राजधर्माचे पालन करावे**

मंत्र्यांच्या बेजबाबदार विधानांबाबत फडणवीसांचा थेट समज देणारे वक्तव्य केले आहे. नागपूरमध्ये दंगल उसळल्यानंतर सरकारमधील काही मंत्री चिथावणीखोर विधाने करत असल्याबाबतचा आरोप विरोधकांनी केला. मंत्र्यांच्या या विधानांवर मुख्यमंत्र्यांनी अंकुश लावावा, अशी मागणी होत आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, जेव्हा आपण मंत्री असतो तेव्हा संयमानेच बोलले पाहिजे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी राजधर्माचे पालन करण्याबाबत विधान केले होते. त्यामुळे आपले विचार, आपल्या आवडी-निवडी या बाजूला ठेवल्या पाहिजेत. आपण संविधानाची शपथ घेतलेली आहे. संविधानाने आपल्याला कुणाहीबरोबर अन्याय न करता वागण्याची जबाबदारी टाकली आहे. मंत्र्यांनी बोलत असताना संयम बाळगला पाहिजे. आपल्या बोलण्याने कुठेही तेढ निर्माण होणार नाही, हा प्रयत्न केला पाहिजे. कधी कधी तरूण मंत्री बोलून जातात. अशावेळी मी त्यांच्याशी संवाद साधतो त्यांना समजावून सांगतो. मंत्री असल्यामुळे संयम बाळगूनच बोलले पाहिजे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

# अंतराळवीर सुनीता विलियम्स, बुच विल्मोर पृथ्वीवर परतले

**स्पेस कॅप्सुल फ्लोरिडाच्या समुद्रात सुरक्षित उतरले...**

**वॉशिंग्टन, १९ मार्च**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात नऊ महिन्यांपासून अडकलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विलियम्स व बुच विल्मोर पृथ्वीवर सुरक्षितपणे परतले आहेत. भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.३० वाजता च्या सुमारास त्यांचे स्पेस कॅप्सुल फ्लोरिडाच्या समुद्रात उतरले. सुनीता विलियम्स व बुच विल्मोर हे अवघ्या आठ दिवसांच्या मोहिमेवर अंतराळात गेले होते.

मात्र, त्यांच्या बोईंग स्टारलाईनर या स्पेसक्राफ्टमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे त्यांना २८६ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात राहावे लागले होते. दोन्ही अंतराळवीरांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी नासाने एलन मस्क यांच्या स्पेसएक्स या खाजगी अंतराळ संशोधन कंपनीसोबत मोहीम आखली होती. सुनीता आणि



त्यांच्या सहकार्याला परत आणण्यासाठी चार अंतराळवीरांना स्पेसएक्सच्या अवकाशयानाने १४ मार्च रोजी उड्डाण केले आणि बुधवारी पहाटे ते यान दोन्ही अंतराळवीरांना घेऊन परतले. भारतीय वंशाच्या सुनीता विलियम्स यांच्यासाठी तर भारतात यज्ञ करण्यात आला होता. त्यांच्या परतीसाठी भारतीयांनीही प्रार्थना केली होती.

अढळ दृढनिश्चय प्रेरणादायीः पंतप्रधान मोदी

सुनीता विलियम्स पृथ्वीवर सुखरूप परतल्यावर पंतप्रधान मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, क्रू-९ तुमचे पृथ्वीवर स्वागत आहे.

पृथ्वीने तुमची खूप आठवण काढली. सुनीता तुमच्यासाठी ही संयम, धैर्य, धाडसाची परीक्षा होती, त्यात तुम्ही शंभर टक्के यश संपादन केले. अंतराळवीरांनी पुन्हा एकदा आपल्याला दाखवून दिले की चिकाटीचा खरा अर्थ काय असतो. विशाल अंतराळात त्यांचा अढळ दृढनिश्चय लाखो लोकांना कायम प्रेरणा देईल. अंतराळात संशोधन म्हणजे मानवी क्षमतेच्या मर्यादा ओलांडणे, स्वप्न पाहण्याचे धाडस करणे आणि ती स्वप्ने प्रत्यक्षात आणण्याचे धाडस करणे. एक अग्रणी आणि आयकॉन असलेल्या सुनीता विलियम्स यांनी संपूर्ण कारकीर्दीत या आत्म्याचे उदाहरण निर्माण केले.

**( आठ दिवसांचे मिशन ९ महिन्यांत कसे बदलले... वाचा सविस्तर वृत्त पान ६ वर)**

# शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सेवाशर्तीचे नवे नियम लवकरच

**भंडारा, १९ मार्च**

महाराष्ट्रात १९७९ च्या सेवाशर्तीच्या नियमात बदल करून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वागणुकीबाबत योग्य असे नियम करण्यात येतील. या नियमांना सेवाशर्तीचा भाग करण्याबाबत शासन निर्णय काढला जाईल. कुठल्याही परिस्थितीत बेशिस्त वर्तन खपवून घेतले जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

आमदार डॉ. परिणय फुके यांनी बुधवारी विधान परिषदेत शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सोशल मीडियावर वावर वाढल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून प्रश्न उपस्थित केला होता. शासकीय कर्मचाऱ्यांकडून रिल्स तयार करून समाजमाध्यमांवर टाकले जातात. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक किंवा पोलिस निरीक्षक जणू संपूर्ण भागाचा व राज्याचा कारभार तेच चालवतात अशा प्रकारचे चित्र या माध्यमातून उभे केले जाते.

अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समाज माध्यम वापरासाठी नियम असणे व त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, याकडे विधान परिषदेत आमदार डॉ. परिणय फुके यांनी लक्ष वेधले होते.




# सोलापूर जिल्हा परिषदेचा ४५ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**▶▶सर्वांगीण, शाश्वत विकासासाठी नवीन योजनांची तरतूद; महिला शेतकरी गट, आरोग्य, कृषी, शिक्षणाला झुकते माप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नसल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी चालू वर्षाचे ४५ कोटी ३ लाख ९० हजार रुपयांचा अर्थकसंकल्प सादर केला. त्यात ७ लाख ७३ हजार रूपयांची शिलक दाखविण्यात आली आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात महिला शेतकरी गट, आरोग्य, कृषी व शिक्षणाबरोबरच ग्रामीण पाणीपुरवठ्याला झुकते माप देण्यात आले आहे. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जा वाढवा, ग्रामीण जनतेच्या आरोग्यमानामध्ये सुधारणा व्हावी, जिल्हा परिषदेचे आर्थिक सशक्तीकरण व्हावे, शेतीपूरक जोडधंद्यांना प्रोत्साहन मिळावे, ग्रामीण जनेतेचे जीवनमान उंचावे, यासाठी विविध योजना अंतर्भूत करुन त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. गत वर्षी ४८ कोटींचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. यंदा मात्र त्यात तीन कोटी घट करुन नवीन विविध योजनांसह ४५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला गतवर्षीपेक्षा १.१२ कोटी वाढ करुन त्या विभागाला ५ कोटी १० लाख तरतूद करण्यात आली.



कृषी विभागासाठी ३ कोटी ८६ लाख तरतूद करण्यात आली असून, गतवर्षीपेक्षा १४ लाख रुपयांची वाढ करण्यात आली आहे. शिक्षण विभागासाठी ५ कोटी २० इतकी तरतूद करण्यात आली असून, समाजकल्याण विभागासाठी ४ कोटी ६१ लाख, महिला व बालकल्याण विभागासाठी ३ कोटी २९ लाख, पशुसंवर्धन विभागासाठी ३ कोटी २० लाख, ग्रामपंचायत विभागासाठी १ कोटी ३ लाख, ग्रामीण पाणीपुरवठा विभागासाठी २ कोटी ९६ लाख तरतूद करण्यात आली असून, गतवर्षापेक्षा यंदा पाच लाख रुपयांची वाढ करण्यात आली आहे. बांधकाम विभागासाठी ९ कोटी, सामान्य प्रशासन विभागासाठी ६ कोटी ७७ लाख तरतूद करण्यात आली आहे.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, ग्रामीण पाणीपुरवठा व प्रकल्प संचालक अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्यासह विभाग प्रमुख, गटविकास अधिकारी उपस्थित होते.

### या आहेत नव्या योजना

- आरोग्य- आशा कीट, स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र,जनईत्री कार्ड, युनिवर्सल डिस्चार्ज कार्ड, अर्थवेळ परिचारिकांना गणवेश, ई-ओपीडी प्रणाली
- कृषी - महिला किसान शक्ती पंख योजनेंतर्गत ड्रोनद्वारे औषध फवारणी यंत्र अनुदानावर पुरविण्यात येणार आहे. महिलांसाठी मधुमक्षिका पेटी
- शिक्षण- सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, सोलापूर येथे वाचन कक्ष, ग्रंथालय, ॲक्टिविटी रुम, जिल्हा परिषद शाळांसाठी क्रीडा साहित्य, विज्ञान केंद्र व औद्योगिक क्षेत्रास भेट
- समाजकल्याण - मुलींचे वसतिगृह, सोलापूर येथे अभ्यासिका, ॲक्टिविटी रुम, वॉटर हिटर, मागासवर्गीय वसतिगृहांना बंकर बेड, ई-रिक्षा किंवा ई-बाईक, अपंगांना झेरॉक्स मशीन, दिव्यांग शाळांना सोलर हिटर, दिव्यांग नवसंजीवनी योजना
- महिला बालकल्याण- बालसंजीवनी योजना, ग्रामपंचायत व अंगणवाडी सेविकांना बक्षीस
- ग्रामपंचायत- ग्रामपंचायत मालमत्ता संगणकीकरण
- इतर सुविधा- पंचायत समिती कार्यालयात अभ्यांगतांसाठी सुविधा व शौचालय बांधण्यासाठी तरतूद, सामान्य प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण

आरोग्य शिक्षण, कृषी व महिला बालकल्याण विभागांना प्राधान्य जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणारे अनुदान उत्पन्न गृहीत धरून ४५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. यामध्ये सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, कृषी व महिला बालकल्याण विभागासाठी वाढीव तरतूद करण्यात आली आहे. उत्पन्नात वाढ झाल्यास त्यामध्ये आणखी तरतूद करण्यास प्राधान्य देणार आहे.

**- कुलदीप जंगम,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद**

### महिला किसान शक्तीपंख योजना

महिलांचे उत्पन्न वाढीला प्राधान्य देण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील एका ग्रामसंघ महिला बचत गटाची तरतूद ६० टक्के व ४० टक्के शासन अनुदानावर ड्रोन औषध फवारणी यंत्र देण्यात येणार आहे. महिला किसान शक्तीपंख योजना प्रायोगिक तत्त्वावर ही योजना असून वैयक्तिक लाभापेक्षा सामूहिक लाभाना महत्त्व देण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### किटकनाशक प्राशन करून विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

नवरा बायकोमध्ये वाद झाल्यानंतर त्या रागाच्या भरात बायकोने किटकनाशक प्राशन केले. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावात मंगळवारी दुपारी ४.३० वाजता घडला. किर्ती आबासाहेब मसळ (वय ३५, रा. कळमण ता. उत्तर सोलापूर) असे विवाहितेचे नाव आहे. मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास किंती आणि त्यांचे पती आबासाहेब यांच्यात कौटुंबिक कारणातून वाद झाला. या वादानंतर संतापलेल्या किंती यांनी राहत्या घरात किटकनाशक प्राशन केले. यानंतर वडाळा येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पती आबासाहेब यांनी सायंकाळी ६.५५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कोरवलीतील स्मशानभूमीजवळ दुचाकी घसरून वांगीतील तरुण जखमी

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

कोरवली ते मंद्रुप दुचाकीवरून जात असताना कोरवली येथील स्मशानभूमीजवळ दुचाकी अचानक घसरून झालेल्या अपघातात वांगी येथील तरुण जखमी झाला. हा अपघात मंगळवारी दुपारी ३.३० वाजता घडला. उस्मान अल्लाबक्ष धबाले (वय ३४, रा. वांगी ता. उ. सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. उस्मान आणि त्याचा मित्र असे दोघे मंगळवारी दुपारी ३.३० च्या सुमारास दुचाकीवरून डबलसीट जात होते. ते कोरवली येथून मंद्रुपच्या दिशेने जात असताना, कोरवली गावाजवळ तेथील स्मशानभूमीजवळ अचानक ते चालवित असलेली दुचाकी घसरली. यामुळे खाली पडल्याने डोक्याला जखम होऊन व उजव्या पायाला मुकामार लागून उस्मान जखमी झाला. खासगी रुग्णालयात उपचार करून रमजान शेख यांनी रात्री ७.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सावळेश्वर टोळनाक्यावजवळ दुचाकीच्या अपघातात एकजण जखमी

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

मोहोळ ते सोलापूर असे दुचाकीवरून जात असताना सावळेश्वर टोळ नाक्याजवळ विरूध्द दिशेने आलेल्या दुचाकीस्वाराने धडक दिल्याने एकजण जखमी झाला. हा अपघात मंगळवारी रात्री ७.४५ वाजता झाला. सिकंदर अहमद मुलाणी (वय ४४, रा. देशमुख प्लॉट, बार्शी ) असे जखमीचे नाव आहे. सिकंदर हा दुचाकी चालवित मंगळवारी रात्री ७.४५ वाजता मोहोळहून सोलापूरच्या दिशेने जात होता. सावळेश्वर टोळनाक्यापासून काही अंतरावर चुकीच्या दिशेने आलेल्या दुचाकीस्वाराची सिकंदर चालवित असलेल्या दुचाकीला धडक बसली. यात डोक्याला मार लागून सिकंदर जखम झाली. तसेच त्याच्या हात आणि पायाला खरचटल्याने त्यास रुग्णवाहिकेव्दारे शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पुळूजमध्ये पेट्रोल अंगावर ओतून तरुणाने स्वत:ला पेटवले

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

पुळुज येथे अंगावर पेट्रोल ओतून घेऊन तरुणाने स्वत:ला पेटवून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार मंगळवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडला. उमेश हरिदास कांबळे (वय २५, रा. पुळूज ता. पंढरपूर) असे तरुणाचे नाव आहे. पुळूज शिवारात उमेश याचे घर आहे. मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास त्याने अज्ञात कारणातून अंगावर पेट्रोल ओतून घेऊन स्वत:ला पेटवून घेतले. यात छाती, चेहरा, पोट व दोन्ही हाताला भाजल्याने वडील हरिदास यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रंगाची पिचकारी लागून १० वर्षाचा बालक जखमी

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

पिचकारीने रंग मारताना ती सटकल्याने डोक्याला जखम होऊन दहा वर्षाचा बालक जखमी झाला. हा प्रकार लष्कर परिसरात बुधवारी सकाळी ११.३० वाजता घडला. यश महिंद्र लंबुवाले (वय १०, रा. लष्कर) असे जखमीचे नाव आहे. यश हा बुधवारी रंगपंचमीनिमित्त सकाळी ११.३० वाजता पिचकारीतून रंग खेळत होता. अचानक हातातील पिचकारी सटकून लागल्याने डोक्याला जखम झाली. दुपारी १२.१५ वाजता वडील महिंद्र याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रंग खेळताना पाय घसरून पडल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

रंगपंचमीनिमित्त रंग खेळताना अचानक पाय घसरून पडल्याने एकजण जखमी झाला. हा प्रकार नई जिंदगी परिसरातील भाग्योदय सोसायटीत बुधवारी सकाळी ११ वाजता घडला. परमेश्वर रघुनाथ बनसोडे (वय ४४, रा. भाग्योदय सोसायटी) असे जखमीचे नाव आहे. परमेश्वर हा बुधवारी सकाळी घरी रंग खेळत होता. त्यावेळी अचानक तो पाय घसरून पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली. मुलगा पांडुरंग बनसोडे याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### व्यापाऱ्याची सोळा लाखांची फसवणूक

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

एस व्ही एस सोर्सिंग्स प्रायव्हेट लिमिटेड सोलापूर कंपनीकडून ८५ ड्रम केमिकल माल खरेदी केला.बिलाचे पैसे न देता १६ लाख ४ हजार आठशे रुपयांची फसवणूक केल्याची घटना २३ मे २०२४ ते १८ मे २०२४ दरम्यान घडली.




याप्रकरणी मनोहर सिद्धाराम वलसा (वय-३४,रा.रवींद्र नगर, एमआयडीसी रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून रवी कुमार सुदरशी (रा.वनस्थली पुरम रंगारेड्डी,तेलंगणा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या अधिक माहिती अशी की,यातील संशयित आरोपीने सोलापूर कंपनीकडून ८५ ड्रम केमिकल माल खरेदी केला. खरेदी केलेल्या केमिकलचे पैसे न देता रक्कम नसलेल्या बँक खात्याचे दोन धनादेश देऊन जाणीवपूर्वक फसवणूक केली.तसेच बँकेच्या दराप्रमाणे होणारे व्याज एक लाख ९० हजार ७२९ रुपये अशी एकूण १७ लाख ९५ हजार ५२९ रुपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस; सोनारासह तीन चोरटे गजाआड



## साडेचार लाखांचे ९६ ग्रॅम दागिने हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१९ मार्च -**

शहर गुन्हे शाखेने जोडभावी, एमआयडीसी व फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घडलेल्या पाच घरफोड्या उघडकीस आणून सोनार व तीन चोरट्यांना गजाआड केले. त्यांच्याकडून घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस आणून साडेचार लाखांचे ९६ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत.

शहरात काही दिवसात रात्री बंद घरामध्ये चोरी करुन ऐवज पळवून नेण्याचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना मार्गदर्शन केले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे पथक आरोपींचा शोध घेत होते. विविध ठिकाणावरुन प्राप्त सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन, त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. पथकास, यातील आरोपी रुपाभवानी मंदीराच्या परिसरामध्ये, स्मशानभूमीजवळ येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सिध्दू शामराव काळे (वय ३९, रा. चिंचोली एमआयडीसी, ता. मोहोळ), बजरंग नागनाथ चव्हाण (वय २९), नरसिंह नागप्पा बल्लारी (वय ३१, दोघे रा. सनमडीकर हॉस्पीटलजवळ, सातारा रोड, जत, जि. सांगली), सचिन दामोदर सावंत (वय ३५, रा. बनाळी, ता. जत, जि. सांगली, सध्या रा. कडलास रोड, सांगोला) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारपूस केली असता, सिध्दू काळे व बजरंग चव्हाण यांनी त्यांच्या इतर तीन साथीदारांसह मिळून फेब्रुवारी २०२५मध्ये रात्रीच्यावेळी पोशम्मा मंदिराजवळ, धनलक्ष्मी नगर, जुना विडी घरकूल येथील एका बंद घराच्या मुख्य दरवाज्याचे कड़ी व कोयंडा तोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिली. तसेच नरसिंह बल्लारी याच्या मार्फत त्यांच्या वाटणीस आलेले सोन्या-चांदीचे दागिने, सोनार सचिन दामोदर सावंत यास विक्री केले असल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपी हे पोलीस कोठडीत असताना, त्यांच्याकडे तपासातून सिध्दू काळे व बजरंग चव्हाण यांनी त्यांच्या इतर तीन साथीदार एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणखी ४ ठिकाणी रात्रीच्या वेळी घरफोडी केल्याची कबुल केले. या गुन्हयातील चोरी करून वाटणीस आलेले सोन्या-चांदीचे दागिने आरोपी नरसिंह बल्लारी याच्या मार्फत आरोपी सोनार सचिन सावंत यास विक्री केल्याचे सांगितले. आरोपी सिध्दू काळे व बजरंग चव्हाण याच्याकडून ६२ हजार रुपये रोख रक्कम जप्त केली. आरोपी सोनार सावंतकडून सोन्या-चांदीचे रु.३ लाख ९० हजारांचे ९६ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त केले.



## महापालिकेतील डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अंजली काकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

सोलापूर महापालिकेतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी आरोग्य निरीक्षक अंजली काकडे यांची निवड करण्यात आली. महापालिका आवारात माजी अध्यक्ष पद्मावती इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सर्वंट सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेषराव शिरसट यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली. याप्रसंगी वंदना कांबळे, डॉ. सुहासिनी वाळवेकर, डॉ. संजिव मुरुमकर, कामगार क्रांती युनियनचे अध्यक्ष लिंबराज जेठीथोर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. मुलांवर संस्कार घडवून उच्चपदस्थ अधिकारी, उद्योजक घडविणाऱ्या आदर्श माता - पिता कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी आपली नावे शेषराव शिरसट - ९८५०८००८४१, शिलरत्न दुड्डे -८६००९५०९०७, सुजित काळे - ९८९०४९६४०८ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.समितीचे **नुतन पदाधिकारी** - अध्यक्ष : अंजली काकडे, उपाध्यक्ष : रविंद्र सर्वगोड, श्रीकांत भंडारे, खजिनदार : सतिश नागटिळक, सहखजिनदार दत्ता मस्के, ऑडिटर : वनिता साठे, सचिव : हेमलता टोनपे, कार्याध्यक्ष : सचिन आवारे, कार्यक्रम प्रमुख : शिलरत्न दुड्डे, प्रमुख सल्लागार : उत्तम कसबे, बाळासाहेब गोतसुर्वे,सुनिल भालेराव,शुभम रणखांबे , उमेश गायकवाड, अजय जाधव आदी.

# एक बाटली पाणी झाडासाठी उपक्रमाचा शुभारंभ

## नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे : डॉ. ओंम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च -**

माझी वसुंधरा अभियान, सोलापूर महानगरपालिका आणि परसबाग सोलापूर यांच्या वतीने एक बाटली पाणी झाडासाठी या लोकसहभाग उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सोलापूर महापालिका आवारातील बागेतील झाडांना आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे आणि परसबाग सोलापूरचे मुख्य प्रवर्तक नारायण पाटील यांच्या हस्ते बाटलीने पाणी घालून एक बाटली पाणी झाडासाठी या लोकसहभाग उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवि पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, सहायक आयुक्त शशिकांत भोसले , पर्यावरण संवर्धन अधिकारी अक्षय मोरे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, पर्यावरण व्यवस्थापक स्वप्नील सोलनकर ,परसबागच्या सहप्रवर्तिका शुभदा पाटील,समन्वयक शिरीष गोळवलकर, स्मिता देशपांडे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. ऐन कडक उन्हाळ्यात सोलापूर शहरामध्ये विविध माध्यमातून वृक्षारोपण केलेल्या रोपांना लोकसहभागातून नियमितपणे पाणी मिळावे व त्याचे संवर्धन व्हावे तसेच या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती व्हावी या हेतूनें हा उपक्रम हाती घेण्यात आला. नागरिकांनी स्वयंप्रेरणेने या उपक्रमात उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीस परसबागचे प्रतिनिधी शिरीष गोळवलकर यांनी सर्वांचे स्वागत केले. नारायण पाटील यांनी या उपक्रमाची संकल्पना विषद केली. डॉ. भारत मुळे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे व उपस्थित मान्यवरांना देशी वृक्षाची रोपे भेट देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास पवन देसाई, प्रकाश कुलकर्णी, विजयानंद स्वामी, डॉ. सर्जेराव दौलतोडे, श्रीशैल स्वामी, सुप्रिया जक्कल,इको क्लबचे मनोज देवकर, काशिनाथ भतकुणगी,अनिल मुतालिक देसाई, अविनाश बेंजरपे ,महेंद्र आठवले , सुप्रिया ठाणे,अनिता कोळी, स्नेहश्री देसाई यांच्यासह उपस्थितांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

# भागीदारीत जिम व्यवसायाचे आमिष दाखवून ६० लाखाला गंडवले

## भवानी पेठेतील प्रकार : तिघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

मुंबई, पुणे येथे भागीदारीमध्ये जिमचा व्यवसाय करण्यासाठी आमिष दाखवून तिघांनी ६० लाख रुपयांची फसवणूक केल्याची फिर्याद विशाल प्रकाश कलवा (वय २६, रा. सिद्धी रेसिडेन्सी, भवानी पेठ, सोलापूर) यांनी मंगळवारी (दि. १८) जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दिली आहे. हा प्रकार ५ मार्च २०२१८ ते ३ नोव्हेंबर २०२४ या




कालावधीत भवानी पेठ येते घडला. स्नेहा, सुहास तंबाके, अमोल रामनाथ परदेशी, उषा महिंद्र रजपूत (तिघे रा. पुणे) अशी गुन्हा नोंदलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी भा. दं. वि. ४२० अन्वये गुन्हा नोंदला आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, यातील फिर्यादी या त्यांच्या भवानी पेठेतील घरी असताना २०१८ मध्ये वरील तिघांनी फिर्यादी व त्यांच्या वडिलांना पुणे येथे जिम सुरू करण्यासाठी प्रत्येकी १५ ते २० लाख रुपये खर्च येईल व भागीदारीमध्ये नवे फर्म रजिस्टर करून घेऊन जिममध्ये होणारा नफा समप्रमाणात वाटून घेऊ असे म्हणून फिर्यादीकडून ६० लाख १४ हजार ४४८ रुपये पैसे घेतले. ठरल्याप्रमाणे जिमच्या व्यवसायातील नफा समान प्रमाणात वाटून न देता भागीदारीत सामावून घेतले नाही. या प्रकाराची माहिती झाल्यानंतर फिर्यादीने विचारणा केली, मात्र या व्यवसायात कोणत्याही प्रकारचा फायदा झाला नाही त्यामुळे पैसे देऊ शकलो नाही, असे खोटे सांगितले. फिर्यादीने दिलेल्या पैशांवर पुणे येथे जिम व हॉटेल व्यवसाय सुरू केला. स्वत:चा आर्थिक फायदा करून घेतला. यामुळे नमूद तिघांनी आमची आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या प्रकरणी अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड करीत आहेत.

# महामार्गाच्या उड्डाणपुलांच्या भिंतीतील 'वीप होल' चिमण्यांना ठरतात आसरा

**सोलापूर, दि. १९ मार्च -**

सोलापूर: वाढत्या सिमेंटचे जंगल, बेसुमार वृक्षतोड, ग्रामीण भागातील ग्राम सडक योजना इत्यादी पर्यावरणाला घातक ठरत असलेल्या मानवी वृत्तीमुळे बेघर झालेली घरचिमण्या आता महामार्गांच्या उड्डाण पुलाच्या खालील बाजूच्या भिंतीत सोडलेले वीप होल आश्रयस्थान ठरत आहेत. मानवाच्या वस्तीत घरटे बांधून माणसाला जवळीक साधणारे घरचिमण्या सह दयाळ, बुलबुल, भारतीय व ब्राह्मणी साळुंकी इत्यादी इटुकली पक्षी या वीप होल मध्ये आपली घरटी साकारताना दिसतात. निसर्ग अभ्यासक व युगंधर फौंडेशनचे अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांनी आपल्या नेहमीच्या भ्रमंतीच्या वेळी हे उड्डाण पुलांचे निरीक्षण करून ही माहिती दिली.

काय आहेत हे लीप होल? इमारती किंवा बांधकामावर पाणी साठून त्यावर पाण्याचा भार पडू नये म्हणून स्थापत्यशास्त्रानुसार काही छिद्र सोडले जातात. पावसळ्यात बांधलेल्या वास्तूंवर साठलेले पाणी या छिद्रातून झिरपून जाते. या कारणामुळे त्या वास्तूची आयुष्य वाढते. या छिद्रातून सतत पाणी झिरपत असल्याकारणाने मराठीत या छिद्रांना रडणारे छिद्र असे नाव पडले आहे. सध्या देशभरात सर्वत्र महामार्गांची निर्मिती होत आहेत. महामार्गांवर अनेक ठिकाणी उड्डाण पूल बांधण्यात येत आहे. सर्रास उड्डाण पुलाखाली अनेक वीप होल सोडत आहेत. या वीप होल मध्ये चिमण्या आपला प्रपंच थाटात असल्याचे चित्र दिसत आहे. म्हणूनच हे वीप होल चिमण्यांसाठी वरदान ठरत आहेत. बंगले व अपार्टमेंट चिमण्यांच्या अस्तित्वाला धोका. छपराच्या अडचणीत, भिंतीमधील फटीत, पन्हाळे पाईपाच्या छिद्रात कचरा व गवताच्या काड्या जमवून आवडीने घरटे बनवणाऱ्या चिमण्याना काळाच्या ओघात छपरे व दगड- मातीच्या भिंती नष्ट होत गेले . आता अपार्टमेंट, बंगले या सिमेंटच्या वास्तूंमुळे चिमण्यांना त्यांचे घरटे थाटणे अवघड झाले आहे. शिवाय स्वच्छता राखण्याच्या सबबी पुढे करून माणूस चिमण्यांना हुसकावून देतो.



महामार्गावरील उड्डाण पुलाखालील वीप होलमध्ये प्रपंच थाटलेली घर चिमणी..

### का कमी होताहेत चिमण्या?

* मानवी जीवन शैलीतील बदल. * वाढते सिमेंटचे जंगल. * बेसुमार वृक्षतोड. * शेतीव्यवसायातील बदल. * कीटकनाशकांचा अतिवापर. * हवा व ध्वनी प्रदूषणातील मरणांतिक वाढ. * भ्रमणध्वनी मनोऱ्यातून बाहेर पडणारे लहरी. * महिलांनी घरा बाहेर अंगणात बसून धान्य निवडण्याची पद्धत नामशेष.

### चिमण्यांना कसे जवळ करता येईल?

* घर आणि कार्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करणे. * आपल्या वसतीस्थान परिसरात पोकळ बांबू, पाईप, खोके ठेवून घरट्यासाठी जागा करून देणे. * गच्चीवर, अंगणात मूठभर ज्वारी, बाजरी, तांदूळ आणि वाळलेल्या भाकरी व चपातीचे तुकडे टाकणे. * खिडकीत, गच्चीवर, भिंतीवर अंगणात खापराच्या भांडीत पाणी ठेवणे.

### मुलांना सुट्टीत कृत्रिम घरटी बनवायला प्रेरित करणे

माणसांनी आपल्या स्वार्थापोटी चिमण्यांच्या हक्काचे घर हिरावून घेतले आहे. आता त्याच्या अनुकूलासाठी महामार्ग निर्मिती करताना उड्डाण पूल बांधले आहेत. सुदैवाने या उड्डाण पुलाखालील लीप होल चिमण्यांसाठी वरदान ठरले आहेत. मात्र कधीकधी वाढदिवस, अभिनंदन, उत्सव, जाहीराती इत्यादी मजकूरांचे वीपहोलवर होर्डिंग्ज लटकावून चिमण्यांच्या अधिवासाला बाधा आणत आहेत ही खेदाची बाब आहे. चिमण्यांना वाचविणे काळाची गरज आहे.

**- प्रा. रेश्मा माने, निसर्ग अभ्यासक.**

# प्रा. शकील बागवान यांना पीएच.डी. प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर येथील शास्त्र विभागातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक शकील बागवान यांना पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांचे कडून पीएचडी प्रदान करण्यात आली.



त्यांनी अमेरिकन लेखक निल स्टीफनसन यांच्या साहित्याचा अभ्यास करून आजच्या प्रगत सायन्स आणि तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर होणारा दुष्परिणाम या संदर्भात संशोधन करून आपली पीएचडी पूर्ण केली. त्यांना मार्गदर्शक म्हणून बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी येथील प्राचार्य डॉक्टर संजय करंडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राध्यापक बागवान यांचे मूळ गाव मोहोळ असून, ते बागवान समाजातील पहिलेच पीएचडी धारक असल्याने महाराष्ट्र बागवान जमीयत संघटनेकडून देखील त्यांचे अभिनंदन करण्यात आले. याचबरोबर त्यांच्या संस्थेतील सहकार्यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

# सोलापूरच्या कंपनीची फसवणूक; तेलंगणाच्या खरेदीदाराविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

शहरातील केमिकल उत्पादन करणाऱ्या कंपनीकडून ८५ ड्रम केमिकल माल खरेदी करुन बिलाचे पैसे दिले नाही. त्यापोटी बँक खात्यावर रक्कम नसलेले चेक देऊन १६ लाख ४ हजार ८०० रुपयांची फसवणूक केल्याबद्दल मंगळवारी (दि. १८) विजापूर नाका पोलीस ठाण्यात तेलगंणाच्या खरेदीदाराविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार २३ मे २०२४ या काळात घडला. मनोहार सिद्राम वलासा (वय ३४, रवींद्र नगर, एमआयडीसी रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. रवी कुमार सुदरशी (रा. ६५ वनस्थली पुरम, रंगारेड्डी, तेलंगणा) असे गुन्हा नोंदलेल्या खरेदीदाराचे नाव आहे.




यातील फिर्यादीचे होटगी रोडवर एस. व्ही. एस. सौर्सिंगस प्रा. लि. शॉप नं. ११ या कंपनीकडून नमूद खरेदीदाराने ८५ ड्रम केमिकल माल खरेदी केले. त्याचे रोख रक्क़म न देता बँक खात्यावर रक्कम नसताना दोन चेक देऊन जाणीवपूर्वक फसवणूक केली. बँकेच्या दराप्रमाणे होणारे व्याज १ लाख ९० हजार ७२९ अशी एकूण १७ लाख ९५ हजार ५२९ रुपयांची आर्थिक फसवणूक नमूद आरोपी व परचेस डिपार्टमधील कर्मचाऱ्यांनी केल्याचे फिर्यादीत नमूमद केले आहे. यांप्रकरणी भा. दं. वि. ४१७,४२० अन्वये गुन्हा नोंदला असून, अधिक तपास फौजदार तरंगे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### २५० लोकसंख्येच्या ठिकाणी 'पीएमजीएसवाय' राबविणार : जयकुमार गोरे

**मुंबई, दि. १९ मार्च :-**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही किमान ५०० लोकसंख्या असलेल्या ठिकाणी राबविण्यात येते. ही योजना २५० लोकसंख्या असलेल्या ठिकाणीही राबविणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू असल्याचे राज्याचे ग्रामविकास व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले. या संदर्भात सदस्य समीर कुणावार यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य प्रकाश सोळंके, प्रशांत बंब, कैलास पाटील आणि किरण लहामटे यांनी सहभाग घेतला. यावेळी मंत्री गोरे म्हणाले ,' प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात येणारे रस्ते दर्जेदार, गुणवत्तापूर्ण, मजबूत आणि निकषांनुसार केले जात आहेत. रस्ते विकासाच्या बाबतीत गुणवत्ता नियंत्रणाची कठोर तपासणी केली जात आहे. या रस्त्यांची कार्यकारी अभियंता, राज्य गुणवत्ता निरीक्षक आणि राष्ट्रीय गुणवत्ता निरीक्षक यांच्यामार्फत तपासणी केली जाते. या तपासणीशिवाय कोणत्याही प्रकारचे देयक अदा केले जात नाही. प्रधानमंत्री ग्रामसडक आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्त्यांची कामे निकृष्ट झाल्याचे निदर्शनास आल्यास याची चौकशी करण्यात येईल. योजनेच्या कामाचा कार्यारंभ आदेश देऊनही कामे विलंबाने सुरू केल्यास संबंधित कंत्राटदारांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा टप्पा- १ मधील नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यात ७७ कामे मंजूर होती. त्यापैकी ६८ कामे पूर्ण झाली असून ९ कामे प्रगतीपथावर आहेत. ही कामे मे २०२५ पर्यंत पूर्ण होतील.

### सोशल मीडियाच्या वाढत्या वापराबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियमात बदल : फडणवीस

**मुंबई, दि. १९ मार्च :**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे नियम तयार करताना तेव्हा सोशल मीडिया अस्तित्वात नसल्याने त्यात समाज माध्यमे वापरासंदर्भात कोणताही उल्लेख नव्हता. बदलत्या काळानुसार आणि सोशल मीडियाचा वाढता प्रभाव लक्षात घेता, पुढील तीन महिन्यात या नियमांमध्ये बदल करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले. या नियमांसंदर्भात पुढील तीन महिन्यात एक शासन निर्णय जारी करण्यात येईल. यासंदर्भात काही सूचना असल्यास संबंधितांनी त्या पुढील एक महिन्यात सामान्य प्रशासन विभागाकडे (सेवा) द्याव्या, असेही त्यांनी सांगितले.



### मुंबईत सवलतीच्या दरात भाडे तत्वावरील घरांच्या योजना राबवा : मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई, दि.१९ मार्च -**

मुंबईत रोजगारासाठी हजारो नागरिक येत असतात. त्यांना राहण्याचा प्रश्न उद्भवत असतो. त्यामुळे म्हाडा व सिडको मार्फत माफक दरात भाडेतत्त्वावर घरे उपलब्ध करून देण्याची योजना राबवावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस यांनी केली आहे त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून ही योजना राबवण्याची विनंती केली आहे. त्यात म्हटले आहे की,मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र म्हणून ओळखले जाते. मुंबईत गावखेडी, देश परदेशातूनही लाखो लोक नोकरी, व्यवसायासाठी येत असतात. मुंबईत लाखो लोकांना रोजगार मिळतो पण राहण्याची व्यवस्था होत नाही. मुंबई शहर, उपनगर व एमएमआरडीए भागात घर विकत घेणे सर्वसामान्य लोकांना परवडणारे नाही, त्यामुळे मुंबईत आलेल्या लोकांची घरांची समस्या सोडवण्यासाठी परवडणारी भाडे तत्वावरील घरे ही योजना महत्वाची व फायदेशीर ठरु शकते. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण धोरण २००७ च्या आधारे खाजगी क्षेत्राच्या सहभागातून भाडे तत्वावरील घरे योजना २००८ साली सुरु करून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नेमणुक केली. परंतु त्यातून फारशी घरे उपलब्ध झाली नाहीत. २५० ते ३०० चौरस फुट आकाराची घरे या योजनेतून उपलब्ध करुन दिली व त्याचे भाडे ६ ते ८ हजार रुपयापर्यंत ठेवता आले तर अनेकांच्या राहण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. परवडणारी घरे उपलब्ध करुन देताना ती नियम, अटी, पात्रता, निकष अशा किचकट बंधनात अडकू नयेत, ती सहज उपलब्ध झाली पाहिजेत. मुंबई व परिसरातील घरांचे भाडे परवत नसल्याने लाखो लोकांच्या राहण्याचा गंभीर प्रश्न बनला आहे. निवारा ही अत्यावश्यक बाब लक्षात घेऊन म्हाडा, सिडको वा इतर संस्थेच्या मार्फत मोठ्या प्रमाणात घरे उपलब्ध करू देणारी योजना राबवावी. म्हाडा व सिडको मार्फत ही योजना राबवण्यात यावी अशी मागणी राजहंस यांनी केले आहे.

### बेकायदेशीर बांधकाम परवाना प्रकरणी जामीनासाठी अर्ज

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

येथील सोलापूर महानगरपालिका बांधकाम परवाना विभागातील सहा अभियंता झाकीर नाईकवाडी, कनिष्ठ अभियंता श्रीकांत खानापुरे रा. सोलापूर यांनी सोलापूर येथील सत्र न्यायालयमध्ये जामीन अर्ज दाखल केला आहे. या प्रकरणात नाईकवाडी व खानापुरे यांनी सरकार पक्षाने महानगरपालिकेतील ऑनलाईन बांधकाम परवाना संदर्भातील सर्व कार्यालयीन अध्यादेष, परिपत्रके दाखल करावेत अशी मागणी अर्जाद्वारे न्यायालयामध्ये केलेली आहे. सदर आरोपीनी कोणतेही गैरकृत्य केलेले नाही जी.आर प्रमाणे, परिपत्रक प्रमाणे काम केलेले आहे. हे त्यातून स्पष्ट होणार आहे, त्यामुळे ते सर्व परिपत्रके कोर्टासमोर येणे गरजेचे आहे. सदर कागदपत्रे मागण्याच्या अर्जावर न्यायालयाने सरकारी वकिलांचे म्हणणे मागवलेले आहे.. थोडक्यात हकीकत अशी की, जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ यादरम्यान महापालिकेतील बांधकाम परवाना विभागातील सहाय्यक अभियंता झाकीर नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता खानापुरे हे महापालिकेच्या बांधकाम विभागातील अधिकारी म्हणून काम पाहत होते त्या काळात त्यांनी अधिकार नसताना बांधकाम परवाने दिले व महापालिकेचे नुकसान केले. याप्रकरणी बांधकाम विभागाचे अभियंता बसवराज मठपती यांनी पोलिसात तक्रार दिली होती सदरकामी १८ फेब्रुवारी रोजी सदर बझार पोलिसांनी नाईकवाडी आणि खानापुरे यांना अटक केली होती.करून सोलापूर येथील न्यायाधीश श्री भंडारी यांनी दोघांचा जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर नाईकवाडी व खानापुरे यांनी ॲड. शशी कुलकर्णी यांचे मार्फत सोलापूर येथील सत्र न्यायालय मध्ये जामीन अर्ज दाखल केलेला आहे. सदर कागपत्रे मागणीच्या अर्जावर म्हणणे दाखल करण्यासाठी पुढील सुनावणी सत्र न्यायाधीश श्री. मोहिते यांचे समोर दि. २१ मार्च २०२५ रोजी होणार आहे. सदर कामी आरोपींतर्फे ॲड. शशी कुलकर्णी. ॲड. गुरुदत्त बोरगावकर, ॲड. आदित्य अदोने, ॲड. प्रणव उपाध्ये हे काम पाहत आहेत.

# नीलम गोऱ्हेंवरील विश्वास ठरावावरुन गोंधळ

## विधान परिषदेत विरोधकांकडून अर्धा तास घोषणाबाजी

## आज काळ्या फिती लावून निषेध नोंदविणार

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई ,दि.१९ मार्च:**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावरील विश्वासदर्शक ठरावावर बोलू न देता परस्पर मंजुर केल्याने बुधवारी विरोधी महाविकास आघाडीच्या सदस्यांनी मोठा गदारोळ केला.सुमारे अर्धा तास सभापतींच्या समोर येऊन घोषणाबाजी करत राहिले. प्रचंड गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज दोनदा तहकूब करण्यात आले होते मात्र त्यानंतरही त्यांना बोलून दिल्याने विरोधकांनी कामकाजावर बहिष्कार घालित सभात्याग केला.

सभापती प्रा. राम शिंदे हे पक्षपाती व एकांगीपणे कामकाज चालवत असल्याचा आरोप करीत विरोधकांनी त्यांच्यावरच अविश्वासाचा ठराव दाखल केला आहे गुरुवारी काळ्याफिती लावून कामकाजात सहभागी होण्याचा इशारा त्यांनी दिला. महाविकास आघाडीने उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात ५ मार्चला नियमाप्रामणे प्रस्ताव दिला होता. मात्र सभापतींनी तो काल फेटाळून लावला होता.त्यानंतर आज कार्यक्रमात नसताना भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी उपसभापतींवर विश्वास प्रस्ताव ठेवला. आणि तो चर्चेविना मंजूर करण्यात आला विरोधी सदस्य या प्रस्तावावर बोलण्यासाठी मागणी करू लागले. नियमाप्रमाणे आम्हाला बोलू द्यावे अशी मागणी अनिल परब यांनी केली. मात्र सभापतींनी ती फेटाळून लावली. त्यामुळे विरोधकांनी उभे राहत गोंधळ सुरू केला.ते ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब केले. त्यानंतर सभापती शिंदे हे सभागृहात न आल्याने तालिका सभापती चित्रा वाघ यांनी कामकाज सुरू केले. त्यांनी विरोधकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत लक्षवेधी वरील चर्चा सुरू केली. त्यामुळे संतप्त झालेल्या विरोधकांनी वेलमध्ये येत जोरदार घोषणाबाजी करू लागले. त्यांची घोषणा सुरू असतानाच अंतराळातून परतलेल्या सुनीता विल्यम्स यांच्या अभिनंदनचा ठराव तसेच सदस्यांनी पुकारलेल्या लक्षवेधीवर आरोग्य मंत्री प्रकाश आंबेडकर व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरे दिली. त्यांनी विरोधकांना शांत राहण्याच्या सूचना करत असले तरी विरोधकांनी त्याकडे दुर्लक्ष करीत जोरदार घोषणाबाजी सुरू ठेवली त्यामुळे पुन्हा दहा मिनिटांसाठी सभागृह करण्यात आले. त्यानंतर विरोधकांनी गोरे यांच्या विश्वास स्तरावर बोलण्याची मागणी केली मात्र ती नाकारल्याने विरोधकांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला.



एकप्रकारे सत्ताधारी पक्षाला पाशवी बहुमताचा माज चढला आहे. त्यांनी विरोधकांची भूमिका मांडू न देता रेटून प्रस्ताव नेला, त्याला आम्ही विरोध केला. त्यावर आम्ही अर्धा तास घोषणा दिल्या. विरोधी पक्षाला बोलू न देणे हे लोकशाहीला बाधक आहे. लोकशाहीच्या संस्कृती व परंपरेला छेद देणार असल्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले. सभापती हे सभागृहाचे काम काज नियमानुसार करत नाहीत. विरोधी पक्ष व विरोधी पक्षनेते यांचे हक्क डावलले जात असल्याने त्यांनी सभागृहाचा विश्वास गमावला आहे, त्यामुळे त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या आमदारांनी अविश्वास ठराव मांडत त्यांना पदावरून दूर करण्याची मागणी विरोधी पक्षाने केली आहे. गुरुवारी महाविकास आघाडीचे सदस्य काळ्याफिती लावून परिषदेच्या कामकाजात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.उपसभापती नीलम गोरे या सभापतींच्या गैरहजेरीत सभागृहात डायसवर बसल्यास यापुढे कामकाजावर बहिष्कार घालण्याचा इशारा विरोधकांनी दिला आहे.



# न्यूझीलंडच्या पंतप्रधानांचे राज्यपाल, उपमुख्यमंत्र्यांकडून स्वागत

## स्नेहभोजनाला क्रिकेटपटू एजाज पटेलही उपस्थित

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१९ मार्च -**

भारत दौऱ्यावर आलेल्या न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टॉफर लक्सन व त्यांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाचे मुंबईत राज्याच्यावतीने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी बुधवारी राजभवन येथे स्वागत केले. यावेळी बैठकीत हरित ऊर्जा, क्रीडा, शिक्षण, कृषी तंत्रज्ञान, मत्स्यपालन, यांसह विविध विषयांवर चर्चा झाली.

यावेळी आयोजित स्नेहभोजन समारोहाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्य विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, तर न्यूझीलंडच्या वतीने भारतीय वंशाचे माजी गव्हर्नर जनरल सर आनंद सत्यानंद, क्रिकेटपटू एजाज पटेल, पंतप्रधान कार्यालयाचे माध्यम अधिकारी मायकेल फोर्ब्स, अतिरिक्त मुख्य सचिव (राजशिष्टाचार) मनीषा म्हैसकर, मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर, न्यूझीलंड पंतप्रधानांचे प्रेस सेक्रेटरी मॅट यंग, समाजमाध्यम सल्लागार जेकब ओ'फ्लाहर्टी, मार्क टॅलबोट, न्यूझीलंडचे भारतातील उच्चायुक्त पॅट्रिक राटा, जोआना केम्पकर्स, मॅथ्यू आयर्स, मुंबईतील उप-उच्चायुक्त ग्राहम राऊस व उद्योजक हे देखील उपस्थित होते.

# रा. स्व. संघाची प्रतिनिधी सभा २१ ते २३ मार्च दरम्यान

## बंगळुरू येथे आयोजन

**बंगळुरू, १९ मार्च**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेची बैठक येत्या २१, २२ आणि २३ मार्च रोजी बंगळुरू येथे जनसेवा विद्या केंद्र परिसरात होणार आहे. रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी बुधवारी ही माहिती पत्रपरिषदेत दिली. प्रतिनिधी सभेचे उद्घाटन शुक्रवारी २१ रोजी सकाळी नऊ वाजता होईल. यावेळी मंचावर दक्षिण मध्य क्षेत्राचे (कर्नाटक, आंध्र आणि तेलंगणा) कार्यवाह एन. तिप्पेस्वामी तसेच अखिल भारतीय सह प्रचार प्रमुख नरेंद्र कुमार आणि प्रदीप जोशी उपस्थित होते.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे संयुक्तपणे प्रतिनिधी सभेचे उद्घाटन करतील. प्रतिनिधी सभेच्या प्रारंभी सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे संघकार्याच्या स्थितीवर वार्षिक विवेचन करणार असून, यानंतर विविध प्रांतातील कार्यकर्ता गतिविधी तसेच कार्यक्रमांचा अहवाल सादर करतील. यंदा संघ स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत, यासाठी प्रतिनिधी सभेच्या बैठकीत संघकार्याच्या विस्तारावर विचारमंथन केले जाईल. विजयादशमी २०२५ ते विजयादशमी २०२६ दरम्यान शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी व्यापक जनसंपर्क योजना तयार करण्यात आली असून, त्यात सर्व क्षेत्रांतील मान्यवरांना सहभागी केले जाणार आहे. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण जागरूकता, स्वत्वावर जोर आणि नागरी कर्तव्य या पंच परिवर्तनांवरही चर्चा केली जाईल आणि शताब्दी वर्षादरम्यान समाजातील सर्व घटकांना सहभागी करण्याची योजना आखली जाणार आहे. तीन दिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत दोन प्रस्तावांवर चर्चा होणार आहे. पहिला प्रस्ताव बांगलादेशात हिंदू आणि अल्पसंख्यकांवर अत्याचाराची स्थिती तसेच भविष्यातील उपायांवर



आहे. दुसरा प्रस्ताव मागील १०० वर्षांत संघाचा प्रवास, शताब्दी वर्षादरम्यान गतिविधी आणि भविष्यातील योजना याविषयी असेल. या प्रतिनिधी सभेत वीर योद्धा राणी अब्बक्का यांच्या जन्मास ५०० वर्षे पूर्ण होण्याच्या अनुषंगाने एक विशेष वक्तव्य जारी होईल. राणी अब्बक्कांचा जन्म १५२५ मध्ये झाला होता आणि त्या कर्नाटकच्या राहणाऱ्या होत्या. वक्तव्यात राणी अब्बक्कांच्या अद्वितीय योगदानाचे स्मरण होईल. संघ प्रशिक्षण वर्गाविषयी माहिती देताना आंबेकर यांनी सांगितले की, यंदा रा. स्व. संघाच्या वतीने ९५ प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातील, ज्यात संघ शिक्षा वर्ग, कार्यकर्ता विकास वर्ग आणि आणखी एक कार्यकर्ता विकास वर्गाचा समावेश आहे. ४० वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींसाठी ७२ वर्ग आयाोजित केले जातील, तर २३ वर्ग ४० वर्षे आणि त्याहून जास्त वय असणाऱ्यांसाठी राहतील. प्रतिनिधी सभेत माननीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या अखिल भारतीय प्रवासाच्या योजनांना अंतिम रूप दिले जाईल. चार वर्षांनंतर बंगळुरू येथे प्रतिनिधी सभेची बैठक आयोजित केली जात आहे. या तीन दिवसीय बैठकीत ३२ संघ प्रेरित संघटनांचे अध्यक्ष, संघटन मंत्री आणि महामंत्री सहभागी होतील. अखिल भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष हिरणमय पंड्या, राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का, भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राजशरण शाही, विहिंपचे अध्यक्ष आलोक कुमार, वनवासी कल्याण आश्रमाचे सत्येंद्रसिंह, विद्या भारती आणि अन्य संघटनांचे प्रतिनिधी हजर राहतील. रविवारी २३ रोजी सकाळी ११.३० वाजता सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे पत्रपरिषदेला संबोधित करतील

# बनावट बांधकाम परवाना; आणखी एकाला अटक

## आर.एन. क्षीरसागर असे अटक झालेल्याचे नाव

## न्यायालयाने दिली एक दिवसाची पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

महापालिकेत बांधकाम परवानगी देण्यासाठी समांतर प्रक्रिया राबवून अधिकार नसतानाही बनावट बांधकाम परवानगी दिल्या प्रकरणातील आणखी एका आरोपीस सदर बाजार पोलिसांनी अटक केली. आरोपीस मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्याला एक दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. आर. एन. क्षीरसागर (वय- ५२, रा. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणात यापूर्वी महापालिका बांधकाम विभागातील तत्कालीन उपअभियंता जाकीर नाईकवाडी आणि तत्कालीन सहाय्यक अभियंता श्रीकांत खानापुरे यांना अटक केली आहे. ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. याशिवाय या गुन्ह्यात अधिकाऱ्यांना सहाय्य करणाऱ्या आणि यामध्ये गुंतलेल्या चार आर्किटेक्ट इंजिनियर यांना देखील पोलिसांनी अटक केली होती. त्यांना प्रथम पोलीस कोठडी नंतर न्यायालयीन कोठडी आणि पोलीस ठाण्यात हजेरी लावण्याचा अटीवर जामीन मंजूर झाला आहे. महापालिकेत बांधकाम परवाना विभागात कार्यरत पासून ते बदलून गेल्यानंतर कार्यरत नसतानाही महापालिकेतील तत्कालीन उप अभियंता जाकिर नाईकवाडी, श्रीकांत खानापुरे, आर. एन. क्षीरसागर आणि घाटे अशा चौघांनी बांधकाम परवानगीची समांतर प्रक्रिया परस्पर बाहेर राबवून बनावट शिक्याचा वापर करून तब्बल शहर-हद्दवाढ भागातील तब्बल ९६ प्रकरणात बांधकाम परवानगी दिली. या व्यतिरिक्त आणखीही अनेक प्रकरणे तशीच आहेत. हा प्रकार उजेडात येताच प्रथम महापालिका प्रशासनाने चौघांना निलंबित आणि नंतर सक्तीने सेवानिवृत्ती दिली होती. तर एकाच दंडात्मक कारवाई केली होती. मात्र आरोपींनी महापालिकेच्या आदेशाविरुद्ध न्यायालयात गेल्याने तत्कालीन आयुक्त यांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश विभाग प्रमुखाला दिले होते यावरून सदर बाजार पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, या प्रकरणात बरेच दिवस फरार राहून आरोपींनी सोलापुरातील न्यायालयात प्रथम जामीनासाठी अर्ज केला होता तो फेटाळण्यात आल्यानंतर उच्च न्यायालयात देखील जामीन अर्ज दाखल केले होते. तेथेही दोघांचा जामीन अर्ज नुकतेच न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर प्रथम दोघेजण सदर बाजार पोलिसांना शरण आले. त्यानंतर आज फरार असलेल्या दोन आरोपींपैकी क्षीरसागर हा पोलिसांना शरण आला आहे.



### सुप्रिया कासार यांना आदर्श आशा स्वयंसेविका पुरस्कार

**मंद्रूप, दि. १९ मार्च-**

येथील सुप्रिया लक्ष्मण कासार यांना बीड येथील जनसहयोग प्रतिष्ठानतर्फे राज्यस्तरीय आदर्श आशा स्वयंसेविका पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या आरोग्य सेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.



दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेच्या वेळी एका विद्यार्थिनीला उष्णतेमुळे चक्कर आल्याची घटना घडली होती. त्यावेळी कासार यांनी प्रसंगावधान राखत तातडीने प्राथमिक उपचार केले. त्यांच्या मदतीमुळे त्या विद्यार्थिनीला आत्म विश्वास मिळाला आणि तिने यशस्वीपणे परीक्षा दिली. कासार यांनी वैद्यकीय मदत, आयुष्मान भारत योजना आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना यांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. गरोदर मातांना योग्य सल्ला व मदत देणे, क्षयरोग निर्मूलन मोहिमेत सहभाग घेणे, तसेच आरोग्य जनजागृतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

# तृतियपंथियांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजपा तृतियपंथियांची आघाडी गठित करणार

## प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१९ मार्च:**

वंचित, उपेक्षित वर्गांची सर्वांगीण उन्नती तसेच त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्याचे लक्ष्य ठेवून भारतीय जनता पार्टीची वाटचाल सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून समाजातील उपेक्षित अशा तृतियपंथी समाजाच्या समस्या मार्गी लावण्यासाठी लवकरच भाजपातर्फे तृतियपंथीयांची आघाडी गठित करण्यात येईल, अशी ग्वाही भाजपा प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

भाजपा प्रदेश कार्यालयात बुधवारी मोठ्या संख्येने तृतियपंथियांनी बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. त्यावेळी ते बोलत होते. या पक्षप्रवेशाला प्रदेश सरचिटणीस



विजय चौधरी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ता ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते.

यावेळी बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्र संकल्प पूर्ण करण्यासाठी तृतियपंथी समाजातील अनेकांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. या सर्वांचे हक्क आणि अधिकार अबाधित ठेवण्यासाठी भाजपा कटीबद्ध असून केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांचा लाभ तळागाळातील तृतियपंथियांपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपा प्रयत्नशील आहे. या समाजातील प्रमुख पदाधिकारी झालेल्या जवळपास ५० जणांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून अधिकार प्राप्त होतील. जिल्ह्यातील प्रमुखांना त्या त्या जिल्ह्यात प्रतिनिधी म्हणून पक्षात यथोचित स्थान देण्यात येईल. तसेच या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी स्थापन होणाऱ्या आघाडीमध्ये एक प्रमुख, एक संयोजक आणि ५ ते ६ जणांची सह-संयोजक म्हणून नियुक्ती केली जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

तृतियपंथी समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांनी भाजपाचे सक्रीय सदस्य व्हावे, तसेच राज्यभरात ५ लाखांच्या आसपास असणाऱ्या सर्व तृतियपंथियांनी भाजपाचे सदस्य व्हावे, असे आवाहनही बावनकुळे यांनी केले. यावेळी डॉ.सान्वी जेठवाणी म्हणाल्या की, या दुर्लक्षित समाजाचे प्रश्न भाजपा सोडवू शकतो, असा विश्वास वाटल्याने तृतियपंथांनी भाजपाला साथ दिली आहे. यावेळी राज्यभरातील अनेक तृतियपंथियांनी भाजपामध्ये प्रवेश केला. यामध्ये कोल्हापूर येथील मयुरी आळवेकर, नागपूर येथील राणी ढवळे, बेबी नायक, धुळे येथील पार्वती जोगी, प्रेरणा वाघेला, कादंबरी (पुणे), मुंबईतील शोभा नायक, अकोला येथील सिमरन नायक, छ.संभाजीनगर येथील कोमल, अल्ताफ शेख, नाशिक येथील सलमा गुरू, आशा पुजारी (ठाणे) आदींचा समावेश होता

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# अनोखे अपरिचित मंदिर दर्शन अभियान

हिंदू धर्मात मंदिरांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मंदिरे फक्त प्रार्थनेसाठीच नाहीत तर त्या ठिकाणी आत्म्याची शांती, दैवी ऊर्जा, संस्कृती संवर्धन, समाज जागृती, धार्मिक शिक्षण, परंपरेचे जतन आणि संरक्षण या बाबीसुद्धा होतात. मंदिरांचे महत्त्व विविध पद्धतींनी अधोरेखित करता येते. हिंदू धर्मात प्रत्येक देवी-देवतेचे विशिष्ट मंदिर आहे. ज्यात त्या देवतेचा आशीर्वाद मिळवण्यासाठी भाविक नियमितपणे जातात. मंदिर म्हणजे एक पवित्र स्थान आहे, जिथे भक्त चित्त एकाग्र करून ध्यान, पूजा आणि आरती करतात. यामुळे त्यांना दैवी ऊर्जा आणि शांती मिळते. मंदिरांमध्ये सामूहिक पूजा आणि उत्सवांचे आयोजन केले जाते. यामुळे समाजात एकता, प्रेम आणि बंधुभाव निर्माण होतो. मंदिरे धार्मिक कार्यक्रम आणि उत्सवांचे केंद्रबिंदू असतात, जे लोकांना एकत्र आणतात. धर्म शिक्षण आणि तत्त्वज्ञान शिकवण्याचे ठिकाणही मंदिरच असते. तिथे विविध धार्मिक ग्रंथ वाचन, प्रवचने, कीर्तने आणि चर्चा होतात, ज्यामुळे भक्तांचे धर्मज्ञान वाढते आणि आध्यात्मिक विकास होतो. हिंदू धर्मात मंदिरांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी शारीरिक आणि मानसिक शुद्धतेचा आग्रह ठेवला जातो. यामुळे भक्तांची आध्यात्मिक शुद्धता वाढते. मंदिरांची वास्तुकला सुद्धा पवित्रतेचे प्रतीक मानले जाते. मंदिरे अनेकदा समाजातील गरजूंना मदत करण्यासाठी उपक्रमांचे आयोजन करतात. अनेक मंदिरांमध्ये अन्नदान तसेच मानसिक व शारीरिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. एकंदरीत, हिंदू धर्मात मंदिरे एक धार्मिक, सामाजिक आणि आध्यात्मिक केंद्र म्हणून काम करतात, जे लोकांना शांती, समृद्धी आणि जीवन जगण्याची उच्च मूल्ये साधण्यास मदत करतात. मात्र आपण सारे प्रसिद्ध मंदिरांच्या पाठीमागे धावतो, तिथे गर्दी करतो. अनेकदा गर्दीमुळे भक्तांना देवदर्शनही दुर्लभ होते. जी मंदिरे दुर्लक्षित आहेत, इतिहासाच्या पानांमध्ये दडलेली आहेत किंवा सुदूर आहेत, अशा मंदिरांकडे भाविक फिरकतही नाही. त्यामुळे हिंदू समाजाला प्रामुख्याने नव्या पिढीला मंदिरांशी जोडण्यासाठी, मंदिरांबाबत जनजागृती व्हावी म्हणून तसेच मंदिरांना जीवनाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने रामनवमी (६ एप्रिल) ते भानुसप्तमी (२० एप्रिल) पर्यंतच्या काळात १ लाख अज्ञात मंदिरांशी संबंध प्रस्थापित करण्याची महामोहीम हाती घेतली आहे. यानिमित्ताने मंदिरांची गणना आणि पुजारी गणनेचाही कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर आणि अर्चक आयामातर्फे आयोजित या कल्पक अभियानाचे निश्चितच स्वागत करायला हवे.

प्रयागराज येथे नुकत्याच पार पडलेल्या महाकुंभमेळ्यात सुमारे ६० कोटी भाविकांनी गंगेमध्ये अमृतस्नानाचा आनंद घेतला. या कुंभमेळ्याबाबत जनताजनार्दनामध्ये प्रचंड उत्सुकता होती. त्यातही तरुणाईचा सहभाग लक्षणीय होता. तरुणांना केवळ कुंभाचे आध्यात्मिक महत्त्वच जाणून घ्यायचे नव्हते तर त्यांना गंगेतील पवित्र स्नानाची प्रचीतीही घ्यायची होती. एका सर्वेक्षणात हे ध्यानात आले की भारतीय तरुणाई प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने आध्यात्मिक आणि धार्मिक उपक्रमाशी जोडली गेली. तरुणांनी कुंभात तर सहभाग नोंदविलाच पण देशातील इतर मंदिरे, त्यातील मूर्ती, मंदिराचे महत्त्व, देवदर्शनाने होणारे फायदे, प्राप्त होणारी शांतता, चित्तशुद्धी, मिळणारी नवऊर्जा याबाबत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. एक काळ असा होता की मेकॉलेच्या शिक्षणामुळे भरकटलेली तरुणाई मंदिरांकडे फिरकायला देखील तयार नव्हती. पण गेल्या काही वर्षांत देशातील बदललेल्या वातावरणामुळे तरुणाईत झालेले हे बदल दृष्टोत्पत्तीस पडत आहेत. याच ऊर्जावान तरुणाईला दिशा देण्यासाठी आणि त्यांचे मंदिराशी घट्ट नाते जोडण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने 'पाऊले चालती मंदिराची वाट' हा मंत्रजप करण्याचा निर्धार केला आहे. महाराष्ट्रातील १ लाख दुर्लक्षित, अपरिचित मंदिरांच्या दर्शनाचा निर्धार या निमित्ताने करण्यात आला आहे. मंदिरे ही ऊर्जाकेंद्रे व्हावीत असे प्रयत्न विश्व हिंदू परिषदेने यापूर्वीच सुरू केलेले आहेत. याअंतर्गत मंदिरांची स्वच्छता, प्रत्येक कुटुंबाने आठवड्यातून एकदा एखाद्या मंदिरात सहकुटुंब उपस्थित राहून तेथील धार्मिक कार्यात सहभाग नोंदविणे, मंदिरांमध्ये महाप्रसादाचे आयोजन करणे, मंदिरांमध्ये शैक्षणिक मार्गदर्शन, मंदिरातील पुजाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, एका मंदिराला किमान एक गाय पाळण्याचा आग्रह, मंदिरांमध्ये आरोग्य शिबिरे, विविध प्रकारचे मार्गदर्शन, गरीब लोकांना मदत, परिसरातील एखाद्या गरजू व्यावसायिकाला आर्थिक मदत, निराधार, विधवांना आधार देणे, मंदिरामार्फत मानसिकरीत्या खचलेल्यांचे समुपदेशन, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, बचत गटातील महिलांना कापडी पिशव्या शिवण्याचे काम देणे, महाप्रसादासाठी नवख्या कॅटरर्सना तयार करणे, मोठ्या मंदिरांमार्फत शाळा-महाविद्यालयांचे संचालन, कुवतीनुसार रुग्णालयांची स्थापना, मंदिरांमार्फतच समाजोपयोगी उपक्रमांना पाठिंबा, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, राष्ट्रीय दिनी आणि विशिष्ट सण-समारंभांना मंदिरांवर रोषणाई आणि मंदिराला प्राप्त झालेले दान सत्पात्री खर्च होईल, यावर जातीने लक्ष देण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. अपरिचित मंदिरांचे दर्शन हा उपक्रम त्याच योजनेचा पुढचा भाग आहे. या मोहिमेंतर्गत नवीन मंदिरांची ओळख समाजाला करून देणे, विस्मृतीच्या काळोखात दडलेल्या मंदिरांवर प्रकाशझोत टाकणे, आपल्या मंदिरांच्या स्मरणीय इतिहासाचे भान होऊन आत्मगौरवाची अनुभूती नवीन पिढीला करून देणे, मंदिरांप्रति आपल्या उदासीनतेची जाणीव होऊन त्यांच्या प्रति आपल्या कर्तव्याचे भान होणे, मंदिरांची देखभाल करणारे, पूजाअर्चा करणारे यांच्या सेवावृत्तीचे दर्शन होऊन त्यांच्यापुढे नतमस्तक होण्याची भावना निर्माण होणे आदी उद्दिष्टांची पूर्ती करण्याचे योजिले आहे.

या अभियानांतर्गत कोणत्याही मंदिरांना भेटी द्यायच्या, याचे काही नियम आणि अटीदेखील घालून देण्यात आल्या आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या व्यक्ती किंवा परिवार यांनी किमान तीन अपरिचित मंदिरांना भेटी देणे अपेक्षित आहे. आपण कधीही ज्या मंदिरात गेलेलो नाही, भेट दिलेली नाही, दर्शन घेतलेले नाही अशा मंदिरांची भाविकांनी निवड करायची आहे. जुने, प्राचीन, वहिवाटीत नसलेले, जीर्णोद्धाराची वाट बघत असलेले मंदिर भेटीसाठी निवडले जाऊ शकते. हे मंदिर सुंदर, देखणे, उत्तम व्यवस्थापन असलेले किंवा नव्याने बांधलेलेही असू शकते. आपण ज्या शहरात अथवा गावात राहता, त्याठिकाणी आपली वस्ती सोडून इतर वस्तीतील मंदिरांची निवड केली जावी, अशी अपेक्षाआहे. सेवा वस्तीतील मंदिरे किंवा ज्या वस्तीत हिंदू अल्पसंख्येने आहेत अशा वस्तीतील मंदिरांच्या दर्शनाला जाण्याचीही आयोजकांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. अभियानात सहभागी लोकांनी ज्या मंदिरांना भेटी दिल्या, त्या मंदिरांची छायाचित्रे काढून समाजमाध्यमांवर टाकायची आहेत. निश्चितच हा उपक्रम जनतेला, तरुणाईला मंदिर परंपरेशी जोडणारा आहे. यातून मंदिरांबद्दलची अनास्था तर दूर होणारच आहे, पण या चळवळीशी जोडल्या गेलेल्या लोकांचा परिचयही भाविकांना होणार आहे. मंदिरांचा इतिहास जाणून घेतला, त्या मंदिरांचे महत्त्व जाणून घेतले, त्या देवतेचे कार्य आणि तिची पूजा पद्धती, तिचे प्रमुख उत्सव जाणून घेतले तर निश्चितच नवी माहिती भाविकांना मिळू शकेल. दररोज ठरावीक वेळी त्या मंदिराचे दार कोण उघडतो आणि बंद करतो, काकड आरतीची परंपरा आहे का, मंदिरात होणारे धार्मिक कार्यक्रम, मंदिराचा इतिहास, मूर्तीचे माहात्म्य आदी माहिती मिळू शकेल. यातून दानशूर व्यक्तींना त्या मंदिराच्या दानासाठी प्रवृत्त करता येईल. ज्यांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे, ते स्वतःसुद्धा अशा मंदिरांसाठी दान-दक्षिणा देऊन तेथील सेवेकरांच्या परिस्थितीत सुधार आणू शकतील. पूजा-अर्चना करणारे गुरुजी तुटपुंज्या पगारावर काम करत असतील, तर त्यांनाही मदतीचा हात दिला जाऊ शकतो. मोठ्या दानशूर व्यक्ती संपूर्ण मंदिराचेच पालकत्व स्वीकारू शकतात. 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' असे बरेच लाभ या उपक्रमामुळे हिंदू समाजाला होणार आहेत. पण त्यासाठी आपल्याला एक कदम मंदिर की ओर... असे म्हणत काही पावले देव, देश, धर्मासाठी टाकावी लागणार आहेत. ती टाकली जातील, अशी खात्री असल्यानेच माणसात देव पाहणाऱ्या उपक्रमाचा श्रीगणेशा करणाऱ्या विश्व हिंदू परिषदेला मनापासून शुभेच्छा देऊया!

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# कुंभमेळा आणि छावा

या वर्षाच्या सुरुवातीपासून भारतात घडलेल्या दोन गोष्टींनी सगळ्या जगाचे लक्ष आकर्षित करून घेतले आहे.पहिली घटना म्हणजे प्रयागराज येथील दर १२ वर्षांनी येणारा आणि यावेळी १४४ वर्षांनी आलेल्या योगानेगाजणारा कुंभमेळा. दुसरेम्हणजेछत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील सध्या देशभरात गाजत असलेला 'छावा' हा चित्रपट होय. प्रयागराजला ६० कोटी हिंदू भाविकांनी भेट देऊन त्रिवेणी संगमात स्नान केले. हे हिंदू संस्कारांची मुळं किती खोलवर रुजलेली आहेत, याची साक्ष देणारे आहे. त्यामुळे 'डिसमेन्टलिंग हिंदुत्व' अशा मथळ्याखाली आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स घेणाऱ्या वोक विचारसरणीचे धाबे दणाणले आहे. त्यामुळेत्यांची इको सिस्टिम कामाला लागलेली दिसते आहे. त्याच वेळी या हिंदू मेळ्यामुळे तिथे झालेलीतीन लाख कोटींची आर्थिक उलाढाल जगाचे लक्ष वेधून घेत आहे. त्यातही यावेळी हिंदू व्यावसायिक, हिंदू संघटना, हिंदू तरुणाई आणि उत्तर प्रदेश सरकारद्वारे हिंदू व्यतिरिक्त इतरांना यातवाटा मिळणार नाही, याची घेतलेली खबरदारी कौतुक करण्याजोगीआहे.दरम्यान, दोन अत्यंत दुर्दैवी घटना घडल्या.दोन्ही वेळेस प्रशासनाने संवेदनशीलतेने कृती केली आणि पुन्हा अशी घटना घडू नये याची काळजी घेतली, हे नमूद केले पाहिजे. खरं तर५०-६० कोटी भाविकांनी कुंभमेळ्याला भेट देणे हेच जागतिक पातळीवर लक्ष वेधणारे आहे. निद्रिस्त आणि सुस्त असलेल्या हिंदू समाजानेजागृतीचा, एकतेचा हुंकार देणे हे अनेक जागतिक शक्तींना सहन होणारे नाही तसेच एवढ्या मोठ्या आर्थिक उलाढालीत आपला वाटा नगण्य आहे, हेयांच्या सहनशक्तीपलीकडचे आहे.

दुसरे म्हणजे नुकताच छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील 'छावा' हा चित्रपट भारतात सर्वच प्रांतात गर्दी खेचून घेतो आहे. हा चित्रपट पाहून येणाऱ्या प्रेक्षकांच्या प्रतिक्रियाआतापर्यंत या देशात आपला अजेंडा चालवणाऱ्या डाव्या विचारसरणीच्या लोकांना सणसणीत चपराक देणाऱ्या आहेत. शाळकरी मुलांना 'आम्हाला हे काहीच शाळेत का शिकवले जात नाही'हा प्रश्न पडला आहे.महाविद्यालयीनविद्यार्थी 'हा इतिहास आम्हाला शिकवला नाही, हे आम्हाला माहितीच नव्हते' म्हणून संताप व्यक्त करीत आहेत. सर्वसामान्य माणसालाछत्रपती संभाजी महाराजांनी धर्म आणि हिंदवी स्वराज्य रक्षणार्थ दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचे ज्ञान आणि जाणीव नव्याने होताना दिसते.धर्म, संस्कृती आणि स्वातंत्र्यासाठी संभाजी महाराजांनी काय किंमत चुकवली,याची जाणीवच आम्हाला होऊ दिली नाही. या चित्रपटाने ती जाणीव करून दिली.



सिनेमाच्या अखेरच्या अर्ध्या तासात संभाजी महाराजांवर औरंगजेबाने केलेले शारीरिक अत्याचार पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी आले, असे मत भेटलेल्या प्रत्येकाने व्यक्त केले. हे त्या चित्रपटाचे जसे यश आहे, तसेच सत्य लपवून इतिहास लिहिण्याच्या साम्यवादी विचारसरणीला दिलेली चपराक आहे.

प्रसिद्ध कानडी लेखक डॉ. एस.एल.भैरप्पा यांनी त्यांनाएनसीआरटी राष्ट्रीय अभ्यासक्रम समितीत आलेल्या अनुभवाने'आवरण' ही ऐतिहासिक सत्यकथन करणारी कादंबरी लिहिली. ही कादंबरी लिहिण्याआधी त्यांनी 'खोट्या ऐतिहासिकगोष्टींच्या आधारे राष्ट्रवाद कधीही मजबूत होऊ शकत नाही' या शीर्षकाचा एक लेख लिहिला होता. त्यावर अनेकधर्मनिरपेक्ष विचारवंतांनी टीकाटिप्पणी केली. या तथाकथित विचारवंतांना उत्तर देण्यासाठी आणिमुस्लिमराज्यकर्त्यांनी हिंदूंवर केलेल्या अत्याचारांना लपवण्याच्या आपल्या देशातील वृत्तीवरत्यांनी दुसरा लेख लिहिला. या लेखाचे शीर्षकच 'इतिहासकारांनी कादंबरी लेखकासारखे स्वातंत्र्य घेतले तर सत्याचे काय होईल' असे होते. हा लेख २० मे २०१२ च्या 'फोक्स' या मासिकात प्रसिद्ध झाला होता. इतिहासहा वस्तुनिष्ठ पद्धतीनेच सांगणे व शिकवणे आवश्यक असते, असे या लेखात त्यांनी प्रतिपादन केले होते.आम्हाला एकात्मता असलेला देश निर्माण करायचा आहे, असेम्हणत खरा इतिहास लपवण्याचा उद्योग या देशातस्वातंत्र्य मिळाल्यापासूनच सुरू आहे. आजही या प्रकारच्या इतिहास शिक्षणामुळे अनेकांना या देशावरील इस्लामिक आक्रमणामागेधर्मविस्ताराची लालसा हे सर्वांतप्रमुख कारण होते हे माहिती नसते आणि मान्यही नसते. धर्म विस्तार हीच इस्लाम आणि ख्रिस्तीधर्मीयांनी जिथे गेले, तिथे केलेल्या अत्याचारांमागची प्रेरणा होती, हे या देशातील हिंदूंच्यालक्षात येऊ नये, यासाठी हे सगळे केले गेले. अन्यथाछत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील कोणतीही टीव्ही मालिका त्यांच्यावर औरंगजेबाने केलेले अत्याचार दाखविल्याशिवाय संपूच शकत नाही. या छत्रपतींच्याभूमीत मात्र ती तशी संपवली गेली.मुसलमानांना अल्पसंख्यक ठरवीत, विविध सवलती देत, इस्लामचा प्रच्छन्न प्रसार करण्याची मोकळीक देत आपली व्होट बँक मजबूत करण्याचे हलकट राजकारणया मराठी भूमीतच आकाराला येते, हे अगदी पाच-सहा वर्षांपूर्वी आपण अनुभवले. येथे मुळात हे मान्य केले पाहिजे की,आजही याच धर्म प्रसाराच्या प्रेरणेनेया दोन्ही धर्मांचे अनुयायी सतत कटकारस्थाने करीत असतात आणिसामान्य हिंदू माणसाच्या हे ध्यानीमनीदेखील नसते.'औरंगजेबसुफी संत होता'असे आता सांगितले जाताना दिसते. वास्तविक भारतातीलसुफी संत परंपराही इतकीच क्रौर्य आणि कत्तलींनी भरलेली आहे. मात्र, आमच्या समोर सुफी संतांची सामाजिक सौहार्द जपणारी प्रतिमाच सातत्याने ठेवली गेली आहे.असत्य इतिहासाच्यापायाभरणीवरसामाजिक एकात्मतेची इमारत उभी राहू शकत नाही, या सत्याकडे डोळेझाक करायची, हीच साम्यवादी विचारसरणी जगभरात जोपासली जात आहे.

दुर्दैवाने भारतीय शिक्षण व्यवस्था,इतिहास संकलन व संशोधन साम्यवाद्यांच्याच हातात सोपविले गेले. या देशाच्या काही भागात मागील ५०० वर्षे परकीय आक्रमकांचे राज्य होते. त्यांनी आपल्या सोयीच्या ऐतिहासिक नोंदी केल्या. अखेरची दीडशे वर्षे अत्यंत धूर्त आणि कारस्थानी इंग्रजी शासक होते. त्यांनी या समाजात फूट पाडणे आणि स्थानिक हिंदू राज्यकर्ते नाकर्ते होतेहे दाखविण्याच्या दृष्टिकोनातूनच इतिहासाचे लेखन करून घेतले. त्यांच्यानंतर आलेले नेहरूहेइंग्रजधार्जिणे होते. शिवाय त्यांना नेहरू खानदान कसेया देशाचे तारणहार आहे, हे सामान्यलोकांच्या मनात ठसवायचे होते. त्यामुळे त्यांनी इंग्रजाळलेला इतिहास देशापुढे येईल, अशी तजवीज केली.वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून इतिहासाचे लेखन करणारे इतिहासकार बाजूला सारण्यात आले तरसाम्यवादी इतिहासकारांची महत्त्वाच्या शैक्षणिक समित्यांवर वर्णी लावण्यात आली. परिणामतः मुस्लिम आणि ख्रिस्ती शासकांनी धार्मिक आधारावर केलेले अत्याचार लोकांपासून लपवले गेले.या नेमणुकांमागचा कॉंग्रेसी शासकांचा उद्देशही तोच होता. हिंदूंचे म्हणून जे काही असेल ते चूक,असे जनतेच्या मनावर बिंबवण्याचे हे प्रयत्न होते.मात्र, मुस्लिम शासकांचे चित्र हेच इतिहासकार जास्तीत जास्त उदात्त रंगवीत गेले. हे उदात्तीकरण, नव्हे रंगसफेदी, एवढी टोकाची होती की, पानिपत युद्धाच्या आधी आणि नंतरही जवळजवळ सगळा भारत मराठी आधिपत्याखाली होता, हे सत्य दडपण्यात आले. ऐतिहासिक नोंदी, त्यातही मोगलइतिहासकारांनी केलेल्या ऐतिहासिक नोंदी काही वेगळेच सांगत असताना, हे सगळे राजाश्रयामुळे म्हणजे गांधी-नेहरू परिवार व कॉंग्रेस यांच्या आशीर्वादाने साम्यवादी इतिहासकार करीत होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

२०२५ च्या सुरुवातीलाच कुंभमेळ्याने पुन्हा एकदा या देशाची सांस्कृतिकएकात्मता अधोरेखित केली, तर 'छावा' चित्रपटाच्यानिमित्ताने मुस्लिम-मुघली शासकांचा आणि साम्यवादी इतिहासकारांचा खरा चेहरा जगासमोर आणला.


९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# भोंग्यांपासून होणारे ध्वनिप्रदूषण टाळा

भारतीय लोकशाहीचे चार स्तंभ आहेत. त्यात कायदे मंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका आणि प्रसारमाध्यम यांचा समावेश आहे. न्यायपालिका अर्थात न्यायालय समाजहिताचा सर्वांगीण विचार करून निवाडा करीत असतात. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. हे सत्य असले तरी न्यायालयाचे अनेक निर्णय केवळ प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अंमलात येत नाहीत, हे उघड सत्य आहे. ध्वनिप्रदूषण हे त्यातीलच एक. ध्वनिप्रदूषणाने अनेकानेक समस्यांमध्ये भर पडते. एकीकडे सर्वोच्च न्यायालयाने ध्वनिप्रदूषण होऊ नये म्हणून त्याचे डेसिबल अर्थात आवाजाचा स्तर निश्चित केला आहे. एवढेच नव्हे तर रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत कुठल्याही लाऊडस्पीकरला बंदी असल्याचा निर्णय दिला, तर दुसरीकडे ठिकठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची अवहेलना होत असल्याचे दिसून येते. याबाबत कारवाई करावी तरी कुणी?, प्रदूषण नियंत्रण मंडळाने की पोलिस प्रशासनाने असा प्रश्न उपस्थित होतो आणि ध्वनिप्रदूषणाची समस्या जैसे थे राहते. त्यातही बहुतांश भोंगे हे धार्मिक स्थळावर असल्याने पोलिस प्रशासनाची अनास्था दिसून येते. अनेक ठिकाणी तर विना परवानगी भोंगे वाजत असून आवाजाचा स्तराचा मुलाहिजा देखील केला जात नाही. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात बोलताना ध्वनिप्रदूषणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नियमांचा दाखला देत या नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे. देवेंद्र फडणवीसांच्या या वक्तव्यानंतर ध्वनिप्रदूषणाचा त्रास असणारे अनेकजण सुखावले आहेत.



ध्वनिप्रदूषण हा तसा नेहमीच चर्चेत असणारा प्रश्न. असहनीय त्रास झाल्यानंतर काहींनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. या याचिकांवर न्यायालयाने निर्णय दिला. खरं म्हणजे अत्यंत कर्णकर्कश आवाजामुळे प्रत्येकाच्याच शारीरिक-मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. सोबतच रात्रीची शांतता भंग करणारा आवाजही स्वास्थ्यासाठी हानिकारकच. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने याबाबत निर्णय देताना आवाजाची मर्यादा निश्चित केली. यासह रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत आवाजाला प्रतिबंध केला. एवढेच नव्हे तर न्यायालयाने रुग्णालय, शाळा-महाविद्यालये असलेल्या ठिकाणी शंभर मीटर परिघात 'शांतता क्षेत्र' असल्याचे घोषित केले. सण, उत्सवांची रेलचेल असणाऱ्या आपल्या देशात उत्सवांवर विरजण पडू नये म्हणून न्यायालयाने वर्षातले ४५ दिवस निर्बंधांवर सूट देण्याची मुभा त्या-त्या राज्य सरकारांना दिली. मात्र असे असूनही या कायद्याचे पालन होत नाही, हे दुर्दैवच.

नियमांचा भंग करीत विनापरवाना पहाटेच्या वेळी धार्मिक स्थळांवरील वाजणारे भोंगे, वेळी-अवेळी मध्यरात्रीनंतरही वाजणारे फटाके, रात्री दहानंतरही 'डीजे'चा होणारा दणदणाट, अशा प्रत्येक बाबतीत पोलिसांकडून कठोर कारवाई जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही दुरापास्तच आहे. सध्याच्या आधुनिक काळात 'डीजे'चा नागरिकांना सर्वाधिक त्रास होत असल्याने त्यावर बंदी आणण्याची मागणीही होऊ लागली आहे. त्यामुळे सरकारला त्याबाबतही निश्चित भूमिका घ्यावी लागणार आहे. वास्तविक, ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचा भंग केल्यास शिक्षेची तरतूद असूनही आजपर्यंत याबाबत कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही. एकीकडे राज्यभरात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तेथील पोलिस अधीक्षक सर्वोच्च न्यायालयाचा दाखला देत गणेश उत्सवापूर्वी ध्वनिप्रदूषण कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश असल्याचे प्रसारमाध्यमांना गत काही वर्षांपासून कुळाचार असल्यागत नेमाने सांगतात.पण दुसरीकडे वर्षभर सकाळी ५.३० वाजता कर्णकर्कश आवाजात कुठल्याही आवाज मर्यादेचा विचार न करता वाजणारा भोंगा पोलिसांना दिसत नाही ही सापत्न वागणूक नाही का?तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन का केले जात नाही? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात दिलेल्या आदेशानंतर समाजातील बहुसंख्य असलेल्या पण सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिप्रदूषणाबाबतच्या निर्णयाआड सतत अन्याय होणाऱ्या गटाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. गणेशोत्सव आला की न्यायालयाच्या निर्णयाचा अंमलबजावणीचा देखावा करणाऱ्या पोलिस प्रशासनाला आता या पुढे सकाळी अवेळी वाजणाऱ्या भोंग्यांसह ध्वनिप्रदूषण करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करावी लागेल ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# भाजपाला नवा राष्ट्रीय अध्यक्ष कधी मिळणार?

दिल्ली विधानसभा निवडणूक भाजपाने जिंकल्यानंतर आणि बिहार विधानसभा निवडणुकीला जवळपास सातआठ महिन्यांचा कालावधी उरला असताना सर्वांचे लक्ष आता भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे लागले आहे. मार्च महिन्यात भाजपाला नवा राष्ट्रीय अध्यक्ष मिळेल, असे सुरुवातीला वाटत होते. पण आता या महिन्याच्या अखेरपर्यंत ही निवडणूक होईल असे वाटत नाही. त्यामुळे एप्रिल महिन्यात भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवडणूक होईल, असा अंदाज आहे. जगतप्रकाश नड्डा हे सध्या भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर नड्डा यांचा केंद्रीय मंत्री म्हणून मोदी यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला, आधी त्यांच्याकडेच असलेले आरोग्य आणि कुटुंब कल्याण खाते पुन्हा त्यांच्याकडे सोपवण्यात आले.

भाजपाच्या धोरणानुसार एका व्यक्तीकडे एकाच वेळी दोन महत्त्वाची पदे ठेवता येत नाही. पण नड्डा यांच्याकडे एकाचवेळी दोन नाही तर तीन महत्त्वाची पदे आहेत. नड्डा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, सोबतच ते केंद्रीय आरोग्य मंत्री पण आहेत. याशिवाय राज्यसभेतील सत्ता पक्षनेते म्हणूनही त्यांच्याकडे जबाबदारी आहे. जानेवारी २०२० मध्ये नड्डा यांची भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अमित शाह यांच्या जागेवर निवड झाली. सामान्यपणे भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचा कार्यकाळ तीन वर्षांचा असतो. त्याहिशेबाने जानेवारी २०२३ मध्ये नड्डा यांचा कार्यकाळ संपणार होता. पण वर्षसव्वा वर्षातच म्हणजे २०२४ मध्ये लोकसभा निवडणुका होणार असल्यामुळे नड्डा यांच्या अध्यक्षपदाला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक आटोपल्यावर भाजपाने नवा अध्यक्ष निवडणे अपेक्षित होते. पण दिल्ली विधानसभा निवडणुकीमुळे नड्डा यांच्या अध्यक्षपदाला पुन्हा मुदतवाढ मिळाली.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजनाथसिंह भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. २०१९ ची लोकसभा निवडणूक भाजपाने अमित शाह यांच्या अध्यक्षतेत लढवली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी नड्डा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी भाजपाचे अध्यक्ष असलेल्या राजनाथसिंह यांचा नंतर मोदी यांच्या मंत्रिमंडळात गृहमंत्री म्हणून समावेश झाला, २०१९ ची लोकसभा निवडणूक भाजपाने अमित शाह यांच्या नेतृत्वात लढवली आणि जिंकली. मोदी यांनी गृहमंत्री म्हणून शाह यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. तिसऱ्या म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर मोदी यांनी नड्डा यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. याचाच अर्थ आतापर्यंत तीन राष्ट्रीय अध्यक्षांच्या नेतृत्वात भाजपाने लोकसभा निवडणूक लढवली, जिंकली आणि तिघांचाही नंतर मोदी यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीलाही आता वर्ष होत आहे, पण अजूनपर्यंत भाजपाने आपला राष्ट्रीय अध्यक्ष निवडला नाही. म्हणजे नड्डा यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. भाजपाच्या घटनेप्रमाणे कोणताही अध्यक्ष सुरुवातीला तीन वर्षे आपल्या पदावर राहू शकत होता. २०१२ मध्ये भाजपाने केलेल्या घटनादुरुस्तीप्रमाणे कोणताही नेता सलग दोन कार्यकाळ म्हणजे सहा वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवू शकतो. नड्डा यांच्या अध्यक्षपदाची पाच वर्षे पूर्ण झाली असून सहावे वर्ष सुरू आहे. त्यामुळे येत्या महिना दोन महिन्यात भाजपाला आपला नवा राष्ट्रीय अध्यक्ष निवडावा लागणार आहे.

भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याची एक प्रक्रिया आहे. सर्वांत आधी बुथ स्तरावरच्या निवडणुका होतात, त्यानंतर मंडल आणि शेवटी जिल्हा स्तरावरची निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाते. बुथ ते जिल्हा पातळीपर्यंतची संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रदेश पातळीवरील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण केली जाते. देशातील अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांतील अध्यक्षांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड होऊ शकते. सध्या फक्त १३ राज्यांतील अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. येत्या काही दिवसांत केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश अशा पाच राज्यांतील अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल, असे समजते. ओडिशा, कर्नाटक, हरयाणा आणि तेलंगणा अशा आणखी चार राज्यांतील अध्यक्षांची नावे जवळपास ठरली असल्याचे समजते. म्हणजे कोणत्याही क्षणी भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडणुकीचा कार्यक्रम होऊ शकतो.

भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी काही केंद्रीय मंत्र्यांसह इतर नेत्यांच्या नावांची चर्चा आहे. केंद्रीय मंत्र्यांमध्ये मनोहरलाल खट्टर, शिवराजसिंह चौहान, धर्मेंद्र प्रधान आणि भूपेंद्र यादव यांच्या नावांची चर्चा आहे. भाजपात अध्यक्षाची निवडणूक असो वा मुख्यमंत्र्याची निवड ज्या नावांची चर्चा असते, ते त्या पदासाठी निवडले जातातच असे नाही. राजस्थान आणि मध्यप्रदेशात मुख्यमंत्रिपदासाठी ज्या नावांची चर्चा होती, ती नावे मागे पडून एकदम अनपेक्षित अशा नेत्याच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. विशेष म्हणजे या निवडीमुळे या पदाच्या शर्यतीत असलेल्या अन्य नेत्यांनाच धक्का बसला नाही, तर ज्यांची निवड झाली, त्यांनाही आपल्या निवडीने धक्का बसला होता. त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या शर्यतीत ज्या नावांची चर्चा आहे, त्यापैकी कोणी अध्यक्ष होईलच असे नाही. स्वप्नातही कोणी कल्पना केली नसेल असा एखादा नेता राष्ट्रीय अध्यक्ष झाला तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सध्या तर भाजपात एखाद्या पदासाठी आपल्या नावाची चर्चा व्हावी, असे कोणाला वाटतच नाही. कारण जी नावे चर्चेत असतात, ती त्यांची जमेची नाही तर नकारात्मक बाजू मानली जाते. चर्चेत असण्यामुळे फायदा नाही तर नुकसान होत असते. त्यामुळे भाजपातही कोणताही नेता पक्षाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार याबाबत कोणतेही मतप्रदर्शन करत नाही. भाजपाचे विद्यमान नेतृत्व आपल्या धक्कातंत्राच्या कार्यपद्धतीसाठी ओळखले जाते. त्यामुळे यावेळी एखाद्या महिलेचीही भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड होऊ शकते. ओबीसी नेत्याच्या गळ्यातही राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून माळ पडू शकते. भाजपात आतापर्यंत अनेक राष्ट्रीय अध्यक्ष झाले, पण यात एकही महिला अध्यक्ष झाली नाही. त्यामुळे नवी परंपरा वा पायंडा म्हणा भाजपा एखाद्या महिलेला राष्ट्रीय अध्यक्ष करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडल्यानंतर १८ एप्रिलपासून बंगळुरू येथे होणाऱ्या भाजपाच्या त्रिदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या बैठकीत नव्या अध्यक्षाच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाऊ शकते.

९८८१७१७८१७

### चिवचिवाट हरवण्याआधी

एखाद्या शांत सकाळी, चहा घेत असताना कानावर चिमण्यांचा गोडसर चिवचिवाट पडतो. घराच्या परसात, माडगिंतीच्या भिंतींवर, टाईल्सच्या छपरांमध्ये त्या अलगद विसावतात. त्यांच्या किलबिलाटाने सकाळ प्रसन्न होते. पण हे चित्र आता विरळ होत चालले आहे. पूर्वी सहजपणे खिडकीच्या गजांवर बसणाऱ्या चिमण्या आता दिसेनाशा होत आहेत. निसर्गाच्या या छोट्या जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे आणि आपण मात्र या बदलाचा विचारही करत नाही.

चिमण्या केवळ गोड चिवचिवाट करीत नाहीत, तर त्या निसर्गाच्या आरोग्यदर्शकही आहेत. ज्या ठिकाणी चिमण्यांची संख्या अधिक असते, तेथे पर्यावरणाचा समतोल योग्य पद्धतीने राखला जातो. त्या शेतातील हानिकारक किडे खाऊन शेतीस मदत करतात. जर चिमण्याच नष्ट झाल्या, तर शेतीतील किड्यांचे प्रमाण वाढेल आणि शेतीला फटका बसेल. त्यामुळे त्यांचे अस्तित्व केवळ निसर्गासाठी नव्हे, तर माणसासाठीही तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या लहानपणी चिमण्यांच्या गोष्टी आजी सांगायची. अंगणात उडणाऱ्या चिमण्यांवरून बडबडगीतं तयार व्हायची. पण आज ती लहान मुलांच्या पुस्तकांपुरतीच उरली आहेत. भविष्यात ती चित्रांमधून, व्हिडिओंमधून किंवा केवळ आठवणीत राहिली तर? तो दिवस येण्याआधीच आपण काहीतरी करायला हवं. आपल्या घराच्या टेरेसवर, खिडकीच्या कोपऱ्यात किंवा अंगणात चिमण्यांसाठी अन्न-पाण्याची सोय करायला हवी. झाडे लावायला हवीत, त्यांची जोपासना करायला हवी. आज जागतिक चिमणी वाचवा दिवस! एक दिवस चिमण्यांचा विचार करण्याचा पण विचार पुरेसा नाही. कृती करायलाच हवी!

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

### मानवी मूल्यांना उजाळा देणारा नाथषष्ठी उत्सव

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्यास्मरणार्थ नाथषष्ठी उत्सव पैठणयेथे दरवर्षी फाल्गुन वद्य षष्ठीला साजरा केला जातो. नाथषष्ठी उत्सव महाराष्ट्र राज्यातील सर्वांत मोठा उत्सव होय. संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांनी आपले गुरू जनार्दन महाराज स्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आरंभ केला होता. संत एकनाथ महाराजांच्या जीवनात फाल्गुन वद्य षष्ठी हा दिन अत्यंत महत्त्वपूर्ण होता. कारण याच दिवशी स्वामी जनार्दन स्वामींचा अनुग्रह झाला, याच दिवशी त्यांना श्रीदत्तात्रेयांचे दर्शन झाले आणि याच दिवशी गुरुवर्य जनार्दन स्वामी महाराजांचे महापरिनिर्वाण झाले होते आणि विशेष म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठी हाच दिवस संत एकनाथ महाराजांनी जलसमाधीसाठी निवडून जलसमाधी घेतली आहे. यास्तव पैठण येथे या दिवशी नाथषष्ठी यात्रा भरवून संत एकनाथ महाराजांच्या वाड्यापासून मोठी दिंडी काढली जाते. गावातून ही दिंडी गोदावरी नदीच्या पात्रात वालुकामय ठिकाणी जाते. या ठिकाणी चालत आलेल्या परंपरेनुसार भजन, भारुडे इत्यादी कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. या ठिकाणी भक्त-भाविक संत एकनाथ महाराजांच्या जयघोषात रमून व गुंगून जातात. संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्यप्राणिमात्रावर दया करण्यासाठी, गोर-गरीब,दीन-दुबळ्यांच्या भल्यासाठी घालविले. काशीतीर्थ क्षेत्र येथन पवित्र जल अभिषेकासाठी आणलेल्या कावडीचे पाणीतहानलेल्या गाढवाला पाजले.तत्कालीन कर्मठपणाविरुद्ध त्यांनीमहाराचे पोरं उचलून कडेवर घेतले होते. श्राद्धासाठी केलेले जेवण गोरगरिबांना वाटून दिले होते. चिखलाच्या डबक्यातील डुकराच्या पिलाला मायेने बाहेर काढून उचलून घेतले होते. सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज देवगिरी किल्ल्याचे किल्लेदार होते. त्यांची समाधी भंग होऊ नये म्हणून शत्रूशी त्यांनी हातात शस्त्र घेऊन मुकाबलाही केला होता. संत एकनाथ महाराज यांनी मूल्यांची जपवणूक केली, प्राणिमात्रांवर दया दाखवून त्या जीवांचीही मूल्ये जपली अशा मानवी मूल्ये जपणाऱ्या संतांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम!

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## वाचक पत्रे

### विमानतळावरही कुत्र्यांची दहशत

नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पाहुण्यांना आणण्यासाठी किंवा सोडण्यासाठी जायचे असल्यास तुम्हाला तुमची कार पार्किंगमध्ये ठेवून साधारण अर्धा किलोमीटर पायी चालत जावे लागते. विमानाचे आगमन ज्या भागाकडे होत असते त्याच्या दिशेने श्वानांचा मुक्त संचार बघायला मिळतो. आगमन टर्मिनलच्या अगदी समोर उपाहारगृह आहे. ग्राहकांच्या प्लेटमधील उरलेले खाद्यपदार्थ कुत्र्यांना दिले जात असल्याने उपाहारगृहाच्या आसपास कुत्र्यांचा घोळका सतत उभा असतो. त्यामुळे त्यांना पार करून समोर जाणे हे फार कठीण काम आहे. तुमच्या हातात पिशवी, डबा किंवा पाण्याची बाटली असेल तर त्यावर कुत्र्यांची नजर असते. काही दानशूर, प्राण्यांवर प्रेम करणारे या कुत्र्यांना बिस्किटे खाऊ घालतात. बिस्किटे मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाल्यावर ही कुत्री एकमेकांवर जोरजोराने भुंकायला लागतात. त्यांचा भुंकण्याचा आवाज विमानतळाच्या बाहेरील शेडमध्ये परावर्तनामुळे अनेकपटींनी वाढतो. येणारे पाहुणे किंवा त्यांच्या स्वागतासाठी जाणाऱ्यांवर कुत्र्यांनी हल्ला केला तर काय होईल,याची कल्पना करवत नाही.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## क्राईम वृत्त...

### हँडल लॉक केलेली दुचाकी चोरट्याने पळविली

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

सात रस्ता येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच १३ ए वी १९९६ ही चोरून नेल्याची घटना दहा मार्चला घडली.याप्रकरणी अंबादास नरसप्पा मच्छल (वय-३७,रा.मेदीखाना) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



### टमटमने रिक्षाला धडक दिल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

रिक्षात बसून जात असताना, तीन चाकी मालवाहतूक टमटमने धडक दिल्याने महिला जखमी झाली. हा अपघात मंगळवारी रात्री ७.४५ वाजता जोडबसण्णा चौकात घडला. राणी अरुण साळुंखे (वय ३०, रा. राहुल गांधी झोपडपट्टी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. मंगळवारी रात्री ७.४५ वाजता मंगळवार बाजार येथून राणी या रिक्षात बसून घराकडे जात होत्या. जोडबसण्णा चौकात रिक्षाला तीन चाकी टमटमने धडक दिल्याने त्यांच्या उजव्या हाताला जखम झाली. बहिण रेखा यांनी त्यांना उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




# घंटागाडीवरून पडून दोन कंत्राटी कामगार जखमी

### सहाय्यक कामगार आयुक्त, कंत्राटदारावर कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

सोलापूर महापालिकेतील कचऱ्याच्या घंटागाडीवरून पडून दोन कंत्राटी कामगार गंभीररित्या जखमी झाले. याप्रकरणी

सहाय्यक कामगार आयुक्त आणि कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कामगार मंत्री व कामगार आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे जनहितार्थ जन आक्रोश सोशल असोसिएशनचे भाऊसाहेब कांबळे यांनी केली आहे. सोलापूर जिल्हा सहाय्यक कामगार आयुक्त यांनी वेळीच पत्राची दखल न घेतल्यामुळे कंत्राटी कामगारांचे शोषण करणाऱ्या कंत्राटदारावर कायदेशीर कारवाई करण्यात आली नाही. यामुळे दि. १६ मार्च २०२५ रोजी सोलापूर महापालिका येथे कचऱ्याच्या घंटागाडीवरून पडून दोन कंत्राटी कामगार गंभीररित्या जखमी झाले आहेत असा आरोप करत संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तक्रार केली आहे.

सोलापूर महापालिकेतील मे वॉटर ग्रेस प्रोडक्ट नाशिक या कंत्राटदाराकडून व इतर त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेतील कंत्राटदाराकडून मनमानी कामकाज सुरू आहे. डम्पिंगवर चढून कचरा खाली करणे हे कंत्राटी मजुराचे काम नाही परंतु सर्व गाड्या नादुरुस्त असल्यामुळे सोलापूर येथील कचरा डेपो मध्ये गाडी खाली करताना कंत्राटी दोन कामगार हे गंभीररित्या जखमी झाले. या जखमी कामगारांची मे वॉटर ग्रेस प्रॉडक्ट नाशिक या कंत्राटदाराने दखल घेतली नाही तसेच महापालिका आयुक्त यांनीही दखल घेतली नाही.

सोलापूर महापालिकेच्या वतीने पोलीस प्रशासनात तक्रार देऊन मे वॉटर ग्रेस प्रॉडक्ट नाशिक या कंत्राटदारावर अपघाताचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येऊन त्या जखमी कामगारांना तात्काळ न्याय द्यावा. ते जखमी कामगार जोपर्यंत बरे होत नाही तोपर्यंत त्यांना किमान वेतनानुसार पूर्ण पगार देण्यास आदेशित करून त्या कामगारांना त्यांच्या अपघाताची नुकसान भरपाई मे वॉटर ग्रेस प्रॉडक्ट नाशिक या कंत्राटदाराकडून वसूल करून देण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

## क्रिकेटवरून वाद झाल्याने दोघांना बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

क्रिकेट खेळण्याच्या कारणातून वाद होऊन सहा जणांच्या जमावाकडून दोघांना बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार चाटी गल्लीतील व्ही.आर. पवार साडी सेंटरसमोर मंगळवारी रात्री ७.३० वाजता घडला. जय महेश जगदाळे (वय १७, रा. पश्चिम मंगळवार पेठ) व शिवराज गणेश जगदाळे (वय १६, रा. बाळीवेस) असे मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. जय आणि शिवराज यांचा आणि राज केकडे, रुद्र केकडे तसेच इतर पाच ते सहाजणांचा क्रिकेट खेळण्यावरून वाद झाला होता. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता जय आणि शिवराज हे चाटी गल्ली येथे कामानिमित्त गेले होते. तेथे राज केकडे व रुद्र केकडेसह इतर सहाजणांनी त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात जयच्या कपाळास जखम झाली. शिवराज यास मुकामार लागल्याने मामा शहाजी आवताडे यांनी उपचारास दाखल केले.


### जाहीर प्रसिध्दीकरण

तमाम लोकांस कळविणेत येते की, विशेषतः डि. सोलापूर सब डी. व ता. करमाळा जि. सोलापूर (मांगी मध्यम प्रकल्प लाभ क्षेत्रातील शेतकरी) येथील लोकांना या जाहीर प्रसिध्दीमार्फत कळविणेत येते की,

आमचे वादी लालासाहेब राजाराम जाधव यांनी करमाळा येथील मे. वरिष्ठ न्यायालयात रे. मु. नं. ४०२/२०२३ अन्वये मांगी मध्यम प्रकल्पातून उपसा सिंचन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून १) जिल्हाधिकारी सो. २) कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, सोलापूर, ३) उप अभियंता पाटबंधारे विभाग करमाळा, ४) शाखा अभियंता पाटबंधारे विभाग, करमाळा यांचे विरूध्द निरंतर ताकीदीचा दावा दाखल केलेला आहे. सदर दावा हा वादी यांनी उपसा सिंचन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून प्रतिनिधीक स्वरूपात दाखल केलेला आहे.त्यामुळे यामध्ये असंख्य शेतकऱ्यांचे हित आहे. मांगी मध्यम प्रकल्प लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना सदर दाव्यात वादी यांचे बाजूने संमती देणेकामी किंवा विरोधी पक्षकार म्हणून सामील होण्याचे असल्यास अथवा आपले काही म्हणणे मांडायचे असल्यास मे. करमाळा येथील वरीष्ठ न्यायालयात पुढील तारीख दिनांक २५/०३/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. ता.१९/०३/२०२५

वादीतर्फे
ॲड. श्री. एच. डी. जाधव
(दिवाणी व फौजदारी न्यायालय करमाळा, ता. करमाळा)
मो. नं. ९३२५४३८१४१
अशिलातर्फे ॲडव्होकेट



### खरेदीखत, मुळ पावती, इंडेक्स हरविले बाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः जिल्हा सोलापूर, शहर बार्शी व आसपासचे लोकांना आमचे अशिल यांच्यातर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व शहर बार्शी पैकी बार्शी शहर म्यु. पल हद्दीतील मिळकत याचा गट नं. १३९९/१/१/१/२/३ यापैकी पुर्व बाजूचा प्लॉट क्षेत्रफळ ८६.१७ चौ.मी., याचा बिनशेती आकार ३३ रूपये आहे. या मिळकती संबंधाने दि. ०३/१२/२०१४ रजि. दस्त क्र. ४८५६/२०१४ व दि. ०७/०६/२०१६ रजि. दस्त क्र. २५०७/२०१६ अशी दोन खरेदीदस्त झालेले होते. या खरेदीखताचा मुळ दस्त, हे आमचे अशिल लता जॉन भट रा. लोकमान्य मिल, राऊत चाळ, बार्शी यांचे कडून दि. १८/०३/२०२५ रोजी दुपारी ३:३० वाजणेचे सुमारास बार्शी येथे कुर्डूवाडी रोड ते उपळाई रोड या परिसरात पडून गहाळ झालेले आहे /हरविलेले आहे. त्याबाबत त्यांनी बार्शी पोलिस ठाणे येथे तक्रार केली आहे. त्याचा गहाळ रजिष्टर क्र. १७८/२०२५ दि. १८/०३/२०२५ असा आहे.

लता जॉन भट यांना सदर जागा कर्जाकरिता तारण ठेवण्याकरिता मूळ रजि. खरेदीखत दस्त क्र. ४८५६/२०१४ व रजि. दस्त क्र. २५०७/२०१६ या दस्ताची मूळ प्रत परंतु सदर खरेदीखत, हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधून आणून द्यावी अथवा लता जॉन भट हे, खरेदी दस्तची मूळ प्रत ऐवजी दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील. यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉटबाबत हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आल्यास आमचे अशिलाच्या व कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थेचे हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १९/०३/२०२५

सही/-
ॲड. धनंजय महादेव धस
रा. 'भक्त प्रल्हाद', नाईकवाडी प्लॉट, उपळाई रोड, बार्शी
मो. नं. ९८९०४७२०९६
अशिलातर्फे ॲडव्होकेट


## भेरा चित्रपट २१ मार्चला रसिकांच्या भेटीला

**सोलापूर, दि. १९ मार्च -** तळकोकणाच्या सौंदर्याने नटलेला आणि स्थानिक कलाकारांच्या वास्तव अभिनयाने सजलेला भेरा हा चित्रपट २१ मार्च २०२५पासून महाराष्ट्राच्या विविध भागांत प्रदर्शित होत आहे. श्री वैजप्रभा चित्र निर्मित हा चित्रपट प्रसाद खानोलकर यांच्या साकव या कथेवर आधारित आहे. तर दिग्दर्शन श्रीकांत प्रभाकर यांनी केले आहे. या चित्रपटाची पटकथा प्रसाद खानोलकर आणि श्रीकांत प्रभाकर यांनी लिहिली आहे.तर समीर भास्कर यांचे छायांकन आहे. या चित्रपटात दीपक जोईल,श्रद्धा खानोलकर, प्रमोद कोयंडे,आकांक्षा खोत,विवेक वाळके,गौरव राऊळ यांच्या मुख्य भूमिका आहेत.सिंधुदुर्ग जिल्ह्यात चित्रपटगृहांची संख्या अत्यल्प असल्यामुळे २८ फेब्रुवारीपासून या जिल्ह्यातील वेंगुर्ला, मालवण, कुडाळ, देवगड येथील नाट्यगृहांत भेरा चित्रपट दाखविण्यात आला.हा चित्रपट चेन्नई, जर्मनी, कान्स, पुणे आणि मुंबई येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत गाजला आहे.





**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 118917202 | मालमत्तेवर कर्ज | 1. अमोल विश्वास घोडके<br>2. ज्योती अमोल घोडके | 28/12/2024 | INR 7,28,226.67/- |
| मालमत्तेचा पत्ता : विभाग सोलापूर, उपविभाग बार्शीमधील मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल ग्रामपंचायत मिळकत नं. १०१ च्या ग्रामपंचायत रुईच्या मर्यादेत, एकूण मोजमाप क्षेत्र १३५० चौरस फूट, खंडोबा मंदिराजवळ, सोलापूर, महाराष्ट्र -४१३४०, खालील सीमांसह:- पूर्व : अरुण घोडके, पश्चिम - श्रीमंत घोडके, उत्तर - ग्रामपंचायत रस्ता, दक्षिण - ग्रामपंचायत रस्ता | | | | | |
| 2 | 103906229 | मालमत्तेवर कर्ज | 1. अक्षय सुधाकर खुने<br>2. सुधाकर विनायक खुने | 29/06/2024 | INR 9,53,951.72/- |
| मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ६२५, ३६१५ चौ. फूट क्षेत्रफळ असलेले सर्व भाग आणि पार्सल, ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्थित : भातंबरे, उपविभाग : बार्शी, विभाग : सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र -४१३४०१, आणि सीमा पूर्व - ५ फूट भावकी रस्ता, पश्चिम - ग्रामपंचायत रस्ता, उत्तर - ग्रामपंचायत घर क्रमांक ६५१, दक्षिण - ग्रामपंचायत रस्ता | | | | | |

तुम्हाला याद्वारे आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार, त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)

दिनांक : 20/03/2025
स्थळ : सोलापूर



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

फाइल क्रमांक: SUR/C/565/STB/NSG 4/2025 सूचना क्रमांक STB/01/NSG 4/2025, तारीख: 16.03.2025. सोलापूर विभागातील NSG-4 श्रेणी स्थानकांवर स्टेशन तिकीट बुकिंग एजंटची नियुक्ती. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, सोलापूर विभागातील वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक, मध्य रेल्वे, इच्छुक व्यक्तींकडून निविदा मागवत आहेत. स्टेशन मास्टर/डेप्युटी स्टेशन मास्टर यांच्या देखरेखीखाली विद्यमान काउंटरवरून संगणकीकृत अनारक्षित तिकीट प्रणाली (UTS) द्वारे अनारक्षित तिकिटे जारी करण्यासाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील NSG-4 श्रेणी स्थानकांवर स्टेशन तिकीट बुकिंग एजंटची नियुक्ती करण्यासाठी. संपूर्ण अटी आणि शर्ती इत्यादी असलेले अहस्तांतरणीय निविदा फॉर्म सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक यांच्या कार्यालयातून रु.1000/- (परतावा न करण्यायोग्य) भरून मिळू शकतात. रु.1000/- जमा केल्यानंतर जवळच्या कोणत्याही स्टेशनवर पैशाची पावती मिळू शकते. अर्जदाराला अर्जासोबत NSG-4 साठी Sr.DFM/SUR च्या नावे रु.10000/- चा EMD, मनी पावती (रेल्वे बुकिंग ऑफिस)/DD (राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेने जारी केलेला) स्वरूपात सादर करावा लागेल. कृपया लक्षात ठेवा की अर्जदाराकडे अर्ज करताना आधार आणि पॅन क्रमांक असणे आवश्यक आहे. सुरुवातीला NSG-4 स्टेशनसाठी STB एक वर्षापर्यंत किंवा 21.02.2026 (जे आधी असेल) पर्यंत कार्यरत राहील. पात्रता निकष आणि इतर अटींसाठी कृपया मध्य रेल्वे सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक कार्यालयाशी कोणत्याही कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते संध्याकाळी 5:00 या वेळेत संपर्क साधा. तपशील वेबसाइटवर (http://www.cr.indianrailways.gov.in) देखील उपलब्ध आहेत. परिशिष्ट-1 पात्रता निकष जोडलेले आहेत. परिशिष्ट-2 एसटीबीएला देय असलेले कमिशन जोडलेले आहे. परिशिष्ट-3 स्थानकाचे नाव आणि श्रेणी यादी जोडलेली आहे. निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख 14 एप्रिल 2025 ते दुपारी 3:00 वाजेपर्यंत आहे. निविदा पेटी त्याच दिवशी म्हणजेच 14 एप्रिल 2025 रोजी दुपारी 3:30 वाजता सोलापूर येथील वरिष्ठ डीसीएम कार्यालयात उघडली जाईल. **टीप:** लागू असल्यास कर वेळोवेळी भरावे लागतील.

सीनियर डिव्हिजनल कमर्शियल मॅनेजर
DE/Sur-50 सेंट्रल रेल्वे, सोलापूर

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पॅलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

जेथे,
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना 12.02.2024 रोजी जारी केली.
कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधोस्वाक्षरी करणाऱ्याने 17.03.2025 रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

| अ.क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सुचनेची तारीख आणि एकूण देणी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- वळसंग**<br>**कर्जदार:- श्री.संभाजी दगडू निकम**<br>पत्ता:- पोस्ट 24 मित्रनगर, शेलगी, मारुती मंदिर, उत्तर सोलापूर, एमआयडीसी सोलापूर, महाराष्ट्र-413006. | **श्री. संभाजी दगडू निकम** यांच्या नावावर मालमत्तेचे गहाण.<br>प्लॉट क्रमांक/ एस. क्र./ सीटीएस क्रमांक/ गट क्रमांक मिलकट क्रमांक सब प्लॉट क्रमांक 247/1 चे गहाणखत नोंदणी करा. अंतिम प्लॉट क्रमांक 35 सीटीएस क्रमांक 10389/A, फ्लॅट क्रमांक 6, तिसरा मजला, जयलक्ष्मी रेसिडेन्सी खख, नवीन पच्छा पेठ ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर. | **मागणी सूचना:**<br>दिनांक 12.02.2024<br>रु.38,64,783.00/- (रु. अडतीस लाख चौसष्ट हजार सातशे त्र्याऐंशी रुपये फक्त)<br>अधिक 12.02.2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत लागू न केलेले व्याज |
| 2 | **सह-कर्जदार:-**<br>**सौ.मीरा संभाजी निकम**<br>पत्ता:- पोस्ट 24 मित्रनगर, शेलगी, मारुती मंदिर, उत्तर सोलापूर, एमआयडीसी सोलापूर, महाराष्ट्र-413006. | **सीमा खालीलप्रमाणे आहेत:-**<br>**पूर्व:-** त्याच अपार्टमेंटचा उर्वरित भाग आणि अंतिम प्लॉट क्रमांक 34/A/10 आणि 34/A11<br>**पश्चिम:-** या अपार्टमेंटचा उर्वरित भाग<br>**दक्षिण:-** अंतिम प्लॉट क्रमांक 35/247/2<br>**उत्तर:-** अंतिम प्लॉट क्रमांक 35/248 | **प्रत्यक्ष ताबा तारीख: 17.03.2025** |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - १७/०३/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



**पवित्र पणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात**
**जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ टाकळी (टें.) ता. माढा, जि. सोलापूर**

संचलित सरस्वती माध्यमिक विद्यालय आलेगाव (खुर्द) ता. माढा (६० टक्के अनुदानित) या शाळेत खालील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील मान्य | | | | | | | | | दि.१५/०३/२०२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी / मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकूण पदे |
| 1 | Marathi | Graduate Teacher std (6-8) | s-14:38600-122800 | Partialy Aided 60% | Language (English) | -- | Graduation | Diploma / Graduation | TET Paper 2 (any Subject) | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher std (9-10) | s-14:38600-122800 | Partialy Aided 60% | Science | Marathi | Graduation | Graduation | -- | 1 |
| | | | | | | | | Total | | 2 |

**सर्वसाधारण सूचना : १) अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी - २०२२ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली या (http://tait2022mahateacherrecruitment.org.in) संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.**



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पॅलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

AX10/5516-Rec/SARFAESI/2024-25 Date :- 11.03.2025

**मागणी सूचना**

खालील कर्जदारांनी आमच्या शाखेतून कर्ज घेतले होते ज्यासाठी त्यांनी विविध कागदपत्रे पूर्ण केली होती. त्यांनी आमच्या बँकेच्या नावे सुरक्षा व्याज तयार करून मालमत्तांचे गहाणखत देखील केले आहे. कर्जदारांनी मुद्दल, व्याज इत्यादी हप्ते भरण्यात चूक केली आहे आणि 10/03/2025 रोजी खाते एनपीए झाले आहे. मागणी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणीच्या कलम 13 (2) अंतर्गत सूचना अधिनियम 2002 खालील कर्जदारांना 60 दिवसांच्या आत रक्कम भरण्यासाठी पाठवण्यात आली आहे आणि म्हणूनच अंतिम मागणी करण्यात येत आहे या प्रकाशनाद्वारे कर्जदारांना खाली तपशीलवार देय रक्कम भरण्याची अंतिम मागणी करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव / जामीनदार - साखर पेठ शाखा | सूचना तारीख आणि दावा रक्कम | सुरक्षित मालमत्तेची माहिती | कर्जाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | **देवी अग्निशमन सेवा**<br>कार्यालयाचा पत्ता: E 79 एम आयडीसी अक्कलकोट रस्ता, सोलापूर, महाराष्ट्र 413005<br>**1. दिलीप देविदास राऊत (भागीदार)**<br>M/8 सुंदरम नगरजवळ स्वामी समर्थ मंदिर, विजापूर रोड, सोलापूर 413003<br>**2. श्री प्रसाद दिलीप राऊत (भागीदार)**<br>M/8 सुंदरम नगरजवळ स्वामी समर्थ मंदिर, विजापूर रोड, सोलापूर 413003<br>**3. श्री जयंत प्रभाकर दळवी (जामीनदार)**<br>३ 30 जानकी समर्थ नगर, सिव्हिल हॉस्पिटलजवळ, जिल्हा न्यायालय, उत्तर सोलापूर 413001<br>**4. श्रीम. इंदिरा दिलीप राऊत (जामीनदार)**<br>M/8 सुंदरम नगर, जवळ स्वामी समर्थ मंदिर विजापूर रोड सोलापूर 413003<br>**5. श्री प्रसाद दिलीप राऊत (जामीनदार)**<br>M/8 सुंदरम नगर, जवळ स्वामी समर्थ मंदिर विजापूर रोड सोलापूर 413003<br>**6. श्री. दिलीप देविदास राऊत (जामीनदार)**<br>M/8 सुंदरम नगर, स्वामी समर्थ मंदिराजवळ विजापूर रोड सोलापूर 413003 | दि. 11/03/2025 आणि रु. 5,68,95,544/- (रु. पाच कोटी अडूसष्ट लाख पंचाण्णव हजार पाचशे चव्वेचाळीस फक्त) | **निष्पादकांची नावे :** श्री. देविदास नागोराव राऊत, श्रीमती इंदिरा दिलीप राऊत आणि श्री. दिलीप देविदास राऊत<br>**मालमत्ता 1.** समतुल्य निवासी खुल्या गहाणखत प्लॉट क्रमांक 1, जुना एस. क्रमांक ३58/1/2/2/1-D/2-B, नवीन एस. क्रमांक 28/1/2/2/1-D/2-B, भाग्यश्री नगर नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर ज्यामध्ये मोजमाप करणारी जमीन दिलीप देविदास राऊत यांच्या नावावर 566.70 चौरस मीटर<br>**मालमत्ता 2.** समतुल्य खुल्या निवासी गहाणखत प्लॉट क्रमांक 6 (601.34 चौरस मीटर), 7 (602.73 चौरस मीटर), 49 (137.17 चौरस मीटर), 50 (137.17 चौरस मीटर), 53 (187.17 चौरस मीटर), 54 (146.48 चौरस मीटर), 55 (146.48 चौरस मीटर), जुना. एस. क्रमांक 402/E-1/1 आणि 2, नवीन एस. क्रमांक 6/A-2B (पश्चिम आणि पूर्व), सालगरवाडी, विजापूर रोड, सोलापूर असे ओळखले जाणारे भूखंड जिथे एकूण क्षेत्रफळ 1959.08 चौरस मीटर दिलीप देविदास राऊत यांच्या नावावर<br>**मालमत्ता 3.** समतुल्य प्लॉटवरील मालमत्तेचे गहाण क्रमांक A75 एमआयडीसी, 800 मीटर 2 अक्कलकोट रोड, सोलापूर<br>**मालमत्ता 4.** समतुल्य प्लॉटवरील मालमत्तेचे गहाण क्रमांक E-79 एमआयडीसी, 1000 मीटर 2 अक्कलकोट रोड, सोलापूर<br>**मालमत्ता 5.** समतुल्य औद्योगिक मालमत्ता गहाणखत प्लॉट E-115, एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर जिथे 1200 चौरस मीटर क्षेत्रफळाची जमीन आणि एकूण बांधलेले क्षेत्रफळ 584.72 चौरस मीटर मेसर्स देवी अग्निशमन सेवा यांच्या नावावर तिच्या भागीदार दिलीप राऊत यांच्यामार्फत<br>**मालमत्ता 6.** समतुल्य निवासी गहाणखत दुमजली बंगला ब्लॉक M-8, सुंदरम नगर, जुना गट क्रमांक 600/2B, नवीन गट क्रमांक 39/२ब, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर जिथे 232.06 चौरस मीटर क्षेत्रफळाची जमीन आणि 110.00 चौरस मीटर देवीदास नागोराव राऊत यांच्या नावावर<br>**मालमत्ता 7.** समतुल्य निवासी गहाणखत खुले प्लॉट क्रमांक 13 (145.32 चौरस मीटर), 14 (145.32 चौरस मीटर), 15 (166.84 चौरस मीटर), जुने. से. क्रमांक 402/A-1/1 आणि 2, नवीन से. क्र. 6/A-2B (पश्चिम आणि पूर्व), सलगरवाडी, विजापूर रोड, सोलापूर असे ओळखले जाणारे एकूण क्षेत्रफळ 457.48 चौरस मीटर इंदिरा दिलीप राऊत यांच्या नावावर | **1. रोख क्रेडिट**<br>रु. 200.00 लाख<br>**खाते क्रमांक**<br>20033605908<br>**2. मुदतीचे कर्ज वाहनासाठी**<br>रु.20.00 लाख<br>**खाते क्रमांक**<br>60415914712<br>**3. मुदतीचे कर्ज**<br>रु.150.00 लाख<br>**खाते क्रमांक**<br>60403811992<br>**4. अल्पकालीन कर्ज**<br>रु. 200.00 लाख<br>**खाते क्रमांक**<br>60471108738 |

वरील कर्जदारांना येथे सूचित केले जाते की, अधिकृत अधिकारी डठऋएडख कायदा, 2002 च्या तरतुदींनुसार, गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा / सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतील आणि त्यानंतर लिलाव करतील आणि बँकेकडे उपलब्ध असलेल्या इतर कायदेशीर कारवाई सुरू करतील, जर सूचनेपासून 60 दिवसांच्या आत बँकेच्या समाधानानुसार वरील देयके भरली गेली नाहीत तर तुम्हाला कोणताही आधार मिळणार नाही. कलम 13(13) अंतर्गत तुम्हाला विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास देखील मनाई आहे.

कर्जदारांचे लक्ष वेधले जाते की, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदीकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात.

दिनांक - ११/०३/२०२५
ठिकाण - सोलापूर

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी
साखर पेठ शाखा, बँक ऑफ महाराष्ट्र



### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. ३८/२०२५
नि. -५

**बार्शी येथील मे.सि.ज. ज्यु. डि.साहेब यांचे कोर्टात**

१) **सुलुन उर्फ सुलन कोंडीबा जाधव,**
वय- ७७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. हत्तीज, ता. बार्शी जि. सोलापूर
२) **वंदना समाधान जाधव,**
वय- ३७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर, ता. बार्शी जि.सोलापूर
३) **साक्षी समाधान जाधव,**
वय- १५ वर्षे, धंदा-शिक्षण, (अज्ञान अ.पा.क. आई)
रा. सदर, ता. बार्शी जि.सोलापूर
४) **समृध्दी समाधान जाधव,**
वय- १० वर्ष, धंदा- शिक्षण, (अज्ञान अ.पा.क. आई)
रा. सदर, ता. बार्शी जि.सोलापूर
५) **हर्ष समाधान जाधव,**
वय- ०६ वर्षे धंदा-शिक्षण, (अज्ञान अ.पा.क. आई)
रा. सदर ता. बार्शी जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** - **सामनेवाला**

**ज्याअर्थी,** यातील अर्जदार नं. ३ ते ५ चे वडिल व अर्जदार नं. २ चे पती व अर्जदार नं. १ चा मुलगा मयत समाधान कोंडिराम उर्फ कोंडिबा जाधव हे दि. १७/०१/२०२५ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार नं. १ ते ५ हे मयत समाधान कोंडिराम उर्फ कोंडिबा जाधव यांचे जवळचे व कायदेशीर वारस आहेत, त्यांचे शिवाय मयतास अन्य कोणीही वारस नव्हते व नाहीत. अर्जदार यांना मयत समाधान कोंडिराम उर्फ कोंडिबा जाधव यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून जाहीर होवून मिळणे साठी यातील अर्जदार यांनी सदरील मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**त्याअर्थी,** वर नमुद अर्जदार नं. १ ते ५ यांचे शिवाय मयत समाधान कोंडिराम उर्फ कोंडिबा जाधव यांचेशी इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. १९/०४/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील मयत समाधान कोंडिराम उर्फ कोंडिबा जाधव यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. १७/०३/२०२५

सही/-
क.लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय क स्तर बार्शी



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पॅलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

जेथे,
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना 01.01.2025 रोजी जारी करण्यात आली.
कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधोस्वाक्षरी करणाऱ्याने 03.03.2025 रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, २००२ च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतीक ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

| अ.क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सुचनेची तारीख आणि एकूण देणी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- धाराशिव**<br>**कर्जदार:-**<br>M/s M G पॅकेजिंग इंडस्ट्रीज<br>प्लॉट क्रमांक बी 42, एमआयडीसी, जुन्या आरटीओ कार्यालयाजवळ, धाराशिव-413501. | 1. एम.आय.डी.सी. धाराशिव येथील प्लॉट क्रमांक बी 42, क्षेत्रफळ 800.00 चौ. मीटर, मेसर्स एमजी पॅकेजिंग इंडस्ट्रीजने त्यांच्या भागीदार श्री. अतुल अनंतराव मुळे आणि श्री. वीरधवल किशोर गांधी यांच्यामार्फत भाडेपट्टा म्हणून दिलेला आहे.<br>**सीमा खालीलप्रमाणे :-**<br>**पूर्व :-** एमआयडीसी रोड<br>**पश्चिम :-** प्लॉट क्रमांक बी-47<br>**दक्षिण :-** एमआयडीसी जमीन<br>**उत्तर :-** प्लॉट क्रमांक बी-43.<br>2. कंपनीच्या वर्तमान आणि भविष्यातील संपूर्ण चालू मालमत्तेचे आणि प्लांट आणि मशिनरींचे गहाणखत. | **मागणी सूचना:**<br>दिनांक **01.01.2025**<br>रु.73,00,673.00/- त्र्याहत्तर लाख सहाशे त्र्याहत्तर रुपये अधिक 01.01.2025 पासून लागू न केलेले व्याज कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**सांकेतीक ताबा तारीख:**<br>03.03.2025 |
| 2 | **भागीदार आणि हमीदार**<br>**श्री.अतुल अनंतराव मुळे,**<br>अनंतचाय निवास, उंबरे कोठे, आंबेहोळ, धाराशिव-413501. | | |
| 3 | **सौ.स्वाती अतुल मुळे**<br>अनंतचाय निवास, उंबरे कोठे, आंबेहोळ, धाराशिव-413501. | | |
| 4 | **श्री. वीरधवल किशोर गांधी**<br>सीटीएस क्रमांक 3932, रत्नत्रय, महावरपथ, मारवाडी गल्ली, धाराशिव-413501. | | |
| 5 | **सौ. मीना श्रीराम जिंतूरकर**<br>HN 20/58 संजीवन हॉस्पिटल जवळ धाराशिव-413501 | | |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - ०३/०३/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### भारताचा मालदीववर सरळ ३-० ने

**मुंबई** : येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर भारत आणि मालदीवदरम्यान खेळल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण फुटबॉल सामन्यात भारताने सरळ ३-० गोलने वर्चस्व गाजवले. भारताचा हा मालदीवविरुद्धचा २२ सामन्यातील १६ वा विजय आहे. भारताच्याआक्रमक खेळापुढे मालदीव संघाची बचावफळी फारच कमकुवत ठरली. सामन्याच्या ३४ व्या मिनिटाला भेकेने गोल केला. ब्रॅण्डनने उजव्या बाजूने कोपऱ्यातून चेंडू बॉक्समध्ये वळवला. राहुल भेकेने बॉक्सच्या आत जोरदार आक्रमण करत चेंडू गोलजाळ्यात धाडला. मध्यंतरापर्यंत भारताने १-० अशी आघाडी मिळविली. मध्यंतरानंतर ६६ व्या मिनिटाला लिस्टन कोलॅकोने मालदीवच्या बचावफळीला हुलकावणी देत गोल नोफ्लदवून भारताची आघाडी दुप्पट केली. निवृत्तीनंतर पुनरागमन करणाऱ्या सुनील छेत्रीने आपल्या कौशल्याची छाप टाकताना ७६ व्या मिनिटाला हेडरव्दारे गोल केला.

# बुमराहची अनुपस्थिती मुंबई इंडियन्ससाठी आव्हान : जयवर्धने

**मुंबई, १९ मार्च**

इंडियन प्रीमियर लीग २००५ मध्ये वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहची अनुपस्थिती हे मुंबई इंडियन्ससाठी एक मोठे आव्हान असेल, असे मत संघाचे मुख्य प्रशिक्षक माहेला जयवर्धने म्हणाले.

बुमराह सध्या बंगळुरू येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पाठीच्या दुखापतीतून बरा होत असल्यामुळे तो स्पर्धेतील काही सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार आहे.

बुमराह राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये आहे. त्याच्याबद्दलचा त्यांचा अभिप्राय पाहण्यासाठी आपल्याला वाट पहावी लागेल. सध्या सर्व काही व्यवस्थित सुरू आहे, प्रगती दररोज होत आहे, असे जयवर्धने म्हणाले.

बुमराह चांगल्या मनःस्थितीत आहे व तो जगातील सर्वोत्तम गोलंदाज आहे, त्याची अनुपस्थिती मुंबई इंडियन्ससाठी एक आव्हान आहे, असे तो म्हणाला..

बुमराहचे पुनरागमन अनिश्चिततेने भरलेले आहे. तो बहुदा एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुंबई इंडियन्सच्या सहकाऱ्यांशी संपर्क साधणार असून तो संघासोबत आपले पुनर्वसन सुरू ठेवू शकेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.



जानेवारीच्या सुरुवातीला सिडनी येथे झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या कसोटी सामन्यापासून बुमराहला संघाच्या बाहेर ठेवण्यात आले आहे. शेवटच्या सामन्यात यजमान संघाने १६२ धावांचा पाठलाग करून ३-१ अशी मालिका जिंकली होती.

**माझ्यासोबत तीन कर्णधार : पांड्या**

मी भाग्यवान आहे, कारण माझ्यासोबत तीन कर्णधार खेळत आहेत- रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव व जसप्रीत बुमराह. ते नेहमीच माझ्या खांद्याला खांदा लावून खेळतात व जेव्हा मला कोणत्याही मदतीची गरज भासते तेव्हा ते तिथे माझ्या पाठीशी असतात, असे कर्णधार हार्दिक पांड्या म्हणाला.

ड्रेसिंग रूममध्ये ३० वर्षीय बुमराहसारखा अनुभवी खेळाडू असणे मला व संघाला मदतशीर ठरेल, असेही तो म्हणाला.

(वृत्तसंस्था)

## अष्टपैलू असणे आवश्यक : हार्दिक

**मुंबई, १९ मार्च**

वादग्रस्त इम्पॅक्ट प्लेअर नियम तीन वर्षांनी वाढवण्यात आला आहे, त्यामुळे सुरुवातीच्या अंतिम एकादशमध्ये जणांमध्ये स्थान मिळवण्यासाठी क्रिकेटपटूला शुद्ध अष्टपैलू असणे आवश्यक आहे, असे मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या याने बुधवारी सांगितले.

इम्पॅक्ट प्लेअर नियमानुसार संघ सामन्याच्या नंतरच्या टप्प्यात त्यांच्या अंतिम एकादशमधील खेळाडू बदलू शकतो. परिस्थितीनुसार संघ फलंदाजी किंवा गोलंदाजी तज्ज्ञांना आणतात. रोहित शर्मासह आघाडीच्या भारतीय खेळाडूंनी आक्षेप घेतल्यानंतरही बीसीसीआयने हा नियम किमान २०२७ च्या आवृत्तीपर्यंत वाढवला.

इम्पॅक्ट प्लेअर नियामुळे भारतीय अष्टपैलू खेळाडूंचा विकास रोखला जात आहे आणि संघ खेळादरम्यान आपल्या जागी अतिरिक्त फलंदाज किंवा गोलंदाज घेत आहेत. सध्याच्या परिस्थितीत, जर तुम्ही पूर्णपणे ५०-५० च्या श्रेणीतील अष्टपैलू खेळाडू नसाल तर तुमचे स्थान मिळवणे कठीण होते. पुढे जाऊन हे बदलू शकते किंवा बदलेल, हे आपल्याला पहावे लागेल. पण हो, जर तुम्हाला अधिक अष्टपैलू खेळाडूंना प्रोत्साहन द्यायचे असेल तर त्यांना वर्षानुवर्षे विकसित होण्यासाठी एका निश्चित जागेची आवश्यकता असेल,'' असे पांड्याने पत्रकारांशी बोलताना सांगितले.

(वृत्तसंस्था)

## सलामी सामन्यात सूर्यकुमार करणार मुंबई इंडियन्सचे नेतृत्व

**मुंबई, १९ मार्च**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत रविवारी होणाऱ्या चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघाचे नेतृत्व सूर्यकुमार यादव करणार आहे. गत हंगामात मुंबई इंडियन्स संघाने केलेल्या संथ गतीच्या षटकांबद्दलच्या तीन गुन्ह्यांसाठी नियमित कर्णधार हार्दिक पांड्याला एका सामन्याच्या निलंबनामुळे बाहेर बसावे लागणार आहे.

सूर्यकुमार हा राष्ट्रीय टी-२० संघाचा कर्णधार आहे व अलिकडेच त्याने घरच्या मैदानावर इंग्लंडवर ४-१ असा विजय मिळवून दिला. तथापि, त्याची फलंदाजीची शैली विशेष प्रभावी नव्हती व मालिकेतील पाच सामन्यांमध्ये त्याला केवळ ३८ धावा करता आल्या. सूर्य



देखील भारताचे नेतृत्व करतो. जेव्हा मी तिथे नसतो तेव्हा तो आदर्श पर्याय असतो, असे पांड्या म्हणाला. गत हंगामात आमच्या संघाने तीन वेळा संथ गतीच्या षटकांबद्दलच्या नियमाचे उल्लंघन केल्यामुळे बीसीसीआयने पांड्यावरील एका सामन्याच्या बंदीबद्दल संघाला कळवले आहे, असे मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने म्हणाले.

२०२४ मध्ये, हार्दिक पांड्याचे कर्णधार म्हणून पदार्पणाचे वर्ष होते व मुंबई इंडियन्सने १० पराभव स्विकारले व केवळ ४ विजय मिळवले होते. ते गुणतालिकेत सर्वात खालच्या स्थानावर होते.हार्दिकने रोहित शर्माकडून जबाबदारी घेतली. रोहितने मुंबई संघाला पाच वेळा विजेतेपद जिंकून दिले होते.

(वृत्तसंस्था)

# मराठा प्रीमियर लीग क्रिकेट सामन्यांचा २६ मार्चपासून सोलापुरात थरार

- ग्रामीण शहरातील प्रत्येकी आठ संघ, खेळाडूंचा लिलाव
- संघाना दिली छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडांची नावे
- मराठा उद्योजकांच्या हस्ते चषक व पोषाखांचे अनावरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

विजापूर रोडवरील नेहरू नगर येथील शासकीय मैदानावर मराठा प्रीमियर लीग टेनिक बॉल क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ २६ मार्च रोजी सकाळी होणार असून ५ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी शहरी भागातील अ गटातील सर्व ४ संघांचे ६ सामने पार पडणार आहेत.

येथील अंत्रोळीकर नगरमधील पुष्पस्नेह ह्या सांस्कृतिक भवनाच्या हिरवळीवर १८ मार्च रोजी सोलापूर जिल्ह्यातील मराठा समाजातील तरुण होतकरू खेळाडूंसाठी प्रमुख आयोजक प्रशांत बाबर यांच्यावतीने आयोजित टेनिस बॉलवर खेळविण्यात येणाऱ्या मराठा प्रीमियर लीग २०२५ (सिझन २) साठीच्या शहर भागातील ८ संघातील खेळाडूंची लिलाव प्रकिये द्वारे निवड करण्यात आली. या कार्यक्रमात स्पर्धेसाठी बक्षीस म्हणून देण्यात येणाऱ्या चषकांचे अनावरण आणि स्पर्धेतील शहर व ग्रामीण भागातील १६ संघांची जर्सीचे (रंगीत पोशाख) देखील प्रसिध्दी शहर व जिल्ह्यातील मराठा समाजाचे नामवंत व्यक्ती अनंत जाधव, विनोद भोसले, रणजित चवरे, राम साठे, सुनीलबापू जाधव, रवी भोपळे व आयोजक प्रशांत बाबर यांच्या हस्ते करण्यात आले.

सुरुवातीला उत्तर सोलापूर तालुक्यातील मराठा उद्योजक प्रल्हाद काशीद, गणेश सावंत व राम साठे या मान्यवरांच्या हस्ते हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून जय जिजाऊ जय शिवराय जय शंभूराजेच्या घोषणात लिलाव प्रक्रियेला थाटामाटात सुरुवात करण्यात आली. आयोजक शंकर पवार, आमोघ जगताप, सागर गव्हाणे, रोहित (राजा) जाधव यांच्या वतीने लिलाव प्रक्रियेसाठी मंचावर वॉल तसेच हिरवळीवर शहरी भागातील ८ संघांसाठी टेबल, खुर्ची, खेळाडूंची यादी, चहा पाणी नाश्ता, जलपेय आदी गोष्टींची व्यवस्था अत्यंत चोख व उत्कृष्ठ रित्या करण्यात आली होती. शहरी भागातील ८ संघांना शिवनेरी, सिंहगड, पन्हाळगड, तोरणा, विजयदुर्ग, प्रतापगड, सिंधुदुर्ग व राजगड अशी नावे देण्यात आली असून या आठ संघांची विभागणी दोन (अ - ब) गटात करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागातील आठ संघांना सज्जनगड, पुरंदर, सुवर्णदुर्ग, रामजेशगड, प्रबळगड, अजिंक्यतारा, लोहगड व विशालगड अशी नावे देण्यात आली असून त्यांचा समावेश क व ड गटात करण्यात आलेला आहे. शहरी भागातील संघांच्या लिलाव प्रक्रिया करिता २१० मराठा खेळाडूंची नोंदणी झाली होती, या खेळाडूंना संघांचे प्रायोजक/मालक व कर्णधार यांच्या उपस्थित, वतीने १ लाख पॉइंट्स मध्ये लिलाव पद्धतीने संघात घेण्यासाठी



प्रत्येक खेळाडूचे नाव, फोटो मंचावरील स्क्रीनवर दाखवून तसेच घोषणा करून योग्य ती विभागणी करण्यात आली असून प्रत्येक संघात १५ खेळाडू असणार आहेत.शहरी भागातील आठ संघांचे प्रायोजक/मालक अमोल भोसले, सुनील चव्हाण, सचिन मगर, विक्रांत वानकर, रवी भोपळे, संभाजी केत, रणजित मुळीक, वैभव जाधव यांचे समवेत त्यांचे संघ कर्णधार सागर गव्हाणे, नितीन गायकवाड, बाळकृष्ण काशीद, चेतक गोरे, रोहित जाधव हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद गोरे यांनी व लिलाव प्रक्रिये साठी अजित शापूरकर यांनी काम पाहिले. स्पर्धेतील सर्व खेळाडू साठी लागणारे टीशर्ट हे प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या वतीने देण्यात आले असून सोलापूरचे के.टी. पवार व विक्रांत पवार यांच्या वतीने कै.विजयराव केशवराव मुळीक यांच्या स्मरणार्थ प्रथम, कै.देविदास पवार यांच्या स्मरणार्थ द्वितीय, कै.अंबादास पवार यांच्या स्मरणार्थ तृतीय पारितोषिक चषक देण्यात आले असून सोलापूरचेच प्रसिद्ध डॉ.सुमित मोरे यांच्या कडून मालिकावीर साठी रोख १० हजार ३९४ रुपयेचे योगेश गवळी यांच्याकडून उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाज साठी ५३९४ रुपयांचे बक्षीस देण्यात आले आहे. तसेच स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील सामनावीरासाठी नमेंद्र साखरे आणि मिलिंद गोरे यांचे कडून ट्रॉफी व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

## चहल पत्नी धनश्रीला ४.७५ कोटी रुपये पोटगी देणार

**मुंबई, १९ मार्च**

मुंबई उच्च न्यायालयाने युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांच्या घटस्फोटाचा निकाल जलदगतीने दिला आहे व अनिवार्य कूलिंग-ऑफ कालावधी रद्द केला आहे. चहल धनश्रीला ४.७५ कोटी रुपये पोटगी म्हणून देणार असल्याचे वृत्त आहे. आयपीएल २०२५ सुरू होण्याच्या काही दिवस आधी हे घडले आहे.



आयपीएलमध्ये चहल पंजाब किंग्जचे प्रतिनिधीत्व करणार आहे. एका महत्त्वपूर्ण घडामोडीत मुंबई उच्च न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय रद्द केला आहे आणि भारतीय क्रिकेटपटू युजवेंद्र चहल व त्याची पत्नी धनश्री वर्मा यांना अनिवार्य कूलिंग-ऑफ कालावधी माफ करून जलदगतीने घटस्फोट मंजूर केला आहे. घटस्फोटानंतर सहा महिन्यांचा अनिवार्य कूलिंग-ऑफ कालावधी बायपास करण्याची परवानगी मुंबई उच्च न्यायालयाने या जोडप्याला दिल्याचे वृत्त आहे. चहल व धनश्री यांना मुंबई उच्च न्यायालयाने जलदगतीने घटस्फोट दिला. बार अॅण्ड बेंचनुसार न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने कुटुंब न्यायालयाला उद्यापर्यंत घटस्फोटाची प्रक्रिया अंतिम करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून चहलला आगामी इंडियन प्रीमियर लीग २०२५ हंगामात सहभागी होता येईल. डिसेंबर २०20 मध्ये विवाहबंधनात अडकलेले हे जोडपे २०२२ पासून वेगळे राहत होते. ५ फेब्रुवारी २२0२५ रोजी वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात त्यांचा घटस्फोट अर्ज दाखल करण्यात आला होता, ज्यामध्ये हिंदू विवाह कायद्यांतर्गत कूलिंग-ऑफ कालावधी माफ करण्याची मागणी करणारा अर्ज होता.

## जिओस्टार आयपीएलमधून ६ हजार कोटी रुपये कमावणार

**मुंबई, १९ मार्च**

आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मधून जाहिरात महसूल, लिनियर टीव्ही आणि डिजिटल मिळून रिलायन्स जिओस्टार एक विक्रम प्रस्थापित करणार आहे, असा अंदाज विकास आणि मीडिया प्लॅनर्सची माहिती असलेल्या सूत्रांनी व्यक्त केला आहे. ९0 टक्के इन्व्हेंटरीज विकल्या गेल्या आहेत, त्यामुळे जिओस्टारला गत वर्षीच्या आयपीएलपेक्षा ५८ टक्क्यांहून अधिक वाढ होण्याची अपेक्षा आहे,

जेव्हा आयपीएल ३,९00 कोटी रुपये होता. आयपीएल सुरू होण्यास काही दिवस शिल्लक असताना चॅम्पियन्स ट्रॉफीमधील भारताच्या विजयाच्या पार्श्वभूमीवर हा दिवस येत आहे. जरी या स्पर्धेतील जाहिरातींचे उत्पन्न मोठे नव्हते, तरीही भारताच्या कामगिरीमुळे जिओ-स्टारने ७५0 कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली आहे. जाहिरात करणाऱ्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये पेय कंपनी कॅम्पा यांचा समावेश आहे, जी रिलायन्स रिटेलने विकत घेतली आहे, कोकचे थम्ब्स अप, फॅन्टसी क्रिकेट अॅप माय ११ सर्कल, स्टेट बँक ऑफ इंडिया, अमूल, ड्रीम ११ आणि बिर्ला ओपस. बाजारपेठेतील भावना आयपीएलचे प्रमाण व दर निश्चित करतील, असे रेडिफ्यूजनचे अध्यक्ष संदीप गोयल म्हणाले. जर आर्थिक बाजारपेठा कोमट राहिल्या, तर सर्व स्टार्टअप वित्तीय ब्रॅण्ड खर्च करू शकणार नाहीत. भारत सरकार पान मसाल्यांवर बंदी घालत आहे. जर त्यांनी दारूवर बंदी घातली तर त्याच्या विक्रीला मोठा फटका बसेल, असे गोयल यांनी स्पष्ट केले.

# आठ दिवसांचे मिशन नऊ महिन्यांत कसे बदलले?

भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर ९ महिने आणि १४ दिवसांनी पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचे ड्रॅगन फ्रीडम अंतराळयान १९ मार्च रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर उतरले. हे दोन्ही अंतराळवीर बोईंग आणि नासाच्या ८ दिवसांच्या संयुक्त क्रू फ्लाइट टेस्ट मिशनवर गेले होते, परंतु स्टारलाइनर अंतराळयानाच्या थ्रस्टर्समध्ये समस्या आल्यामुळे त्यांचा आठ दिवसांचा प्रवास नऊ महिन्यांत बदलला. या मोहिमेचा उद्देश बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानाची अंतराळवीरांना अंतराळ स्थानकात नेण्याची आणि परत आणण्याची क्षमता तपासणे हा होता. अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावरील त्यांच्या आठ दिवसांच्या कालावधीत संशोधन आणि अनेक प्रयोग करावे लागले. मोहिमेदरम्यान त्यांना अंतराळयान हातानेही उडवावे लागले.



- बोईंगचे स्टारलाइनर अंतराळयान ५ जून २०२४ रोजी रात्री ८:२२ वाजता अॅटलस व्ही रॉकेटद्वारे प्रक्षेपित करण्यात आले. ते ६ जून रोजी रात्री ११:०३ वाजता अंतराळ स्थानकात पोहोचले. ते रात्री ९:४५ वाजता पोहोचणार होते, पण रिॲक्शन कंट्रोल थ्रस्टरमध्ये समस्या होती.
- स्टारलाइनर अंतराळयानाच्या २८ रिॲक्शन कंट्रोल थ्रस्टरपैकी पाच निकामी झाले होते. २५ दिवसांत ५ वेळा हेलियम गळती झाली. थ्रस्टर्सना प्रणोदक पोहोचवण्यासाठी हेलियम अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत, अंतराळयानाच्या सुरक्षित परतीबद्दल चिंता होती.
- डेटाचे विश्लेषण केल्यानंतर, नासाने ठरवले की स्टारलाइनर अंतराळयान सुनीता आणि बुच विल्मोरला परत पाठवणे सुरक्षित नाही, म्हणून त्यांनी ६ सप्टेंबर २०२४ रोजी अंतराळवीरांशिवाय स्टारलाइनर अंतराळयान पृथ्वीवर परत केले.
- आता अंतराळवीरांना परत आणण्याची जबाबदारी स्पेसएक्सला देण्यात आली. स्पेसएक्सचे ड्रॅगन अंतराळयान दर काही महिन्यांनी चार अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावर घेऊन जाते आणि मागील कर्मचारी स्थानकावर आधीच उभ्या असलेल्या त्यांच्या अंतराळयानात परत येतात.
- २८ सप्टेंबर २०२४ रोजी जेव्हा स्पेसएक्सने क्रू-९ मिशन लाँच केले तेव्हा त्यात ४ अंतराळवीरही असणार होते, परंतु सुनीता आणि बुचसाठी दोन जागा रिकाम्या ठेवण्यात आल्या होत्या. त्यांच्या आगमनानंतर, अंतराळ स्थानकात उभे असलेले क्रू-८, त्यांच्या अंतराळयानात पृथ्वीवर परतले.
- १५ मार्च २०२५ रोजी, स्पेसएक्सने ४ अंतराळवीरांसह क्रू-१० मोहीम सुरू केली. हे अंतराळवीर १६ मार्च रोजी आयएसएसवर पोहोचले.

### अंतराळात २८६ दिवस काय खाल्ले?

गेल्या नऊ महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रात अडकलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विलियम्स यांची पृथ्वीवरील घरवापसी झाली आहे. ६१ वर्षीय बुच विल्मोर आणि ५९ वर्षीय सुनीता विलियम्स गेल्या २८६ दिवसांपासून अंतराळात अडकले होते.

अंतराळ संस्थेचे डॉक्टर त्याच्या आहारावर आणि आरोग्यावर लक्ष ठेवून होते. मात्र ,लोकांच्या मनात त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयींबद्दल, ते नेमके काय खात आहेत याबद्दल प्रश्न पडले आहेत.

स्टारलाइनर मिशनशी संबंधित एका तज्ज्ञाने काही काळापूर्वी सांगितले होते की ते दोघेही विविध प्रकारचे अन्न खात आहेत.

आहारात व्हेज आणि नॉनव्हेज दोन्ही प्रकारचे पदार्थ होते. पावडर दुधासह धान्य, पिझ्झा, कोळंबी, कॉकटेल, रोस्ट चिकन आणि टूना फिश यांचा समावेश होता. कोणतेही मांसाहारी पदार्थ आणि अंडी पृथ्वीवर शिजवली जातात आणि पॅक केली जातात. अंतराळात फक्त गरम केली जातात.

नासाने दिलेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्टेशनवर प्रत्येक अंतराळवीराला दररोज जवळपास १.७२ किलो अन्न पुरवले जाते. बहुतेक अंतराळवीरांचे अन्न फ्रीज, ड्राय किंवा पॅक केलेले असते. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्टेशनवरील फूड वॉर्मर वापरून ते पुन्हा गरम करता येतं. मिशनच्या आपत्कालीन परिस्थितीसाठी अन्न साठवण्याची सुविधा देखील आहे.

### नऊ महिने अंतराळ स्थानकात काय केले?

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील (आयएसएस) नऊ महिन्यांच्या काळात, सुनीता विलियम्स यांनी अंतराळात फिरण्यापासून ते वैज्ञानिक प्रयोग आणि अंतराळ स्थानकाच्या देखभालीपर्यंतची कामे केली.

**स्पेसवॉकमध्ये विक्रम:** सुनीता विलियम्स यांनी आतापर्यंत एकूण ६२ तास ६ मिनिटे स्पेसवॉक केला आहे. कोणत्याही महिला अंतराळवीराने सर्वाधिक अंतराळयात्रा करण्याचा हा विक्रम आहे. जानेवारी २०२५ मध्ये, त्यांनी दोन मोठे स्पेसवॉक केले - एक ५ तास २६ मिनिटांचा आणि दुसरा ६ तासांचा.

**वैज्ञानिक प्रयोग:** त्यांनी आणि त्यांचे साथीदार बुच विल्मोर यांनी अंतराळ स्थानकावर १५० हून अधिक वैज्ञानिक प्रयोग केले. यामध्ये बायोमेडिकल संशोधन, पर्यावरणीय अभ्यास आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी यांचा समावेश होता. या प्रयोगांमध्ये त्यांनी ९०० तासांहून अधिक वेळ घालवला.

**अंतराळ स्थानकाची देखभाल:** सुनीता यांनी आयएसएसवर नियमित देखभालीची कामे केली जसे की स्वच्छता, जुनी उपकरणे बदलणे आणि हार्डवेअरची तपासणी करणे. आयएसएसचा आकार फुटबॉल मैदानाएवढा आहे आणि तो सुरळीत चालण्यासाठी सतत देखभालीची आवश्यकता असते.

**शारीरिक तंदुरुस्ती:** अवकाशात वजनहीनतेमुळे स्नायू आणि हाडांची कमजोरी टाळण्यासाठी सुनीता नियमितपणे व्यायाम करत असत. पृथ्वीवर परतल्यानंतर आरोग्याच्या समस्या टाळण्यासाठी त्यांनी वजन प्रशिक्षण आणि इतर फिटनेस क्रियाकलापांमध्ये वेळ घालवला.

**संघासोबत सहकार्य:** सुरुवातीला त्या आणि बुच विल्मोर आयएसएसवर पाहुणे म्हणून होते, परंतु नंतर ते तेथील नियमित क्रूचा भाग बनले. त्यांनी इतर अंतराळवीरांसोबत दैनंदिन कामकाज हाताळण्यासाठी आणि मोहिमेच्या कामांमध्ये योगदान देण्यासाठी काम केले.

#### अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर परतण्यासाठी किती वेळ लागला?

ड्रॅगन कॅप्सूल फ्रीडम वेगळे झाल्यापासून ते समुद्रात उतरेपर्यंत सुमारे १७ तास लागले. १८ मार्च रोजी सकाळी ८:३५ वाजता, अंतराळयानाचा दरवाजा उघडला गेला. १०:३५ वाजता अंतराळयान अनडॉक झाले, म्हणजेच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून वेगळे झाले. १९ मार्च रोजी पहाटे २:४१ वाजता डीऑर्बिट जळण्यास सुरुवात झाली. म्हणजेच, अंतराळयानाचे इंजिन कक्षापासून विरुद्ध दिशेने चालवण्यात आले. यामुळे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करू शकले आणि पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर पाण्यामध्ये उतरले.

### सुनीता परतल्या, कल्पना परतू शकल्या नाहीत!

#### फक्त १६ मिनिटांच्या अंतरावर असताना स्फोट

**तारीख- १ फेब्रुवारी २००३**
**ठिकाण - टेक्सास, अमेरिका**

नासाचे अंतराळ यान कोलंबिया शटल एसटीएस-१०७ वेगाने पृथ्वीवर परतत होते. भारताच्या पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला त्यांचे दुसरे अंतराळ अभियान पूर्ण करून या अंतराळयानातून परतत होत्या.

पृथ्वीपासून सुमारे २ लाख फूट अंतरावर असलेल्या या वाहनाचा वेग ताशी २० हजार किलोमीटर होता. पृथ्वीवर पोहोचण्यासाठी १६ मिनिटे लागणार होती, पण अचानक नासाचा या अंतराळयानाशी संपर्क तुटला. अंतराळयानात एक मोठा स्फोट झाला आणि त्याचे आगीच्या धगधगत्या गोळ्यात रूपांतर झाले. कोलंबिया शटल स्पेस शटल क्रॅश झाल्याची बातमी आली. कल्पना चावलासह सर्व सात अंतराळवीरांचे निधन झाले.

**१६ दिवसांचे मिशन यशस्वी होण्याच्या १६ मिनिटे आधी अयशस्वी**

आज सुनीता विलियम्स यांच्या सुरक्षित परतीमुळे संपूर्ण देशात आनंदाचे वातावरण आहे, परंतु २००३ मध्ये अशाच एका मोहिमेच्या अपयशामुळे संपूर्ण देशाच्या डोळ्यात अश्रू आले होते.

कल्पना चावला यांनी १९ नोव्हेंबर १९९७ रोजी पहिल्यांदा अंतराळात उड्डाण केले. त्यांच्या पहिल्या अंतराळ प्रवासात त्या ३७२ तास अंतराळात राहिल्या. यानंतर, १६ जानेवारी २००३ रोजी त्यांना दुसऱ्यांदा अंतराळात जाण्याची संधी मिळाली.



कल्पना चावला १ फेब्रुवारी २००३ रोजी सुरक्षितपणे पृथ्वीवर परतणार होत्या, परंतु त्यांचे ध्येय अयशस्वी झाले. खरं तर, कल्पना चावला यांच्या अंतराळयानाच्या उड्डाणादरम्यान, अंतराळयानाच्या इंधन टाकीतून इन्सुलेटिंग फोमचे तुकडे शटलच्या डाव्या पंखावर आदळले. पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना तीव्र उष्णतेपासून अंतराळयानाचे संरक्षण करणाऱ्या टाइल्सना नुकसान झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

यामुळे, कल्पना चावलाचे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात पोहोचताच, हवेच्या तीव्र घर्षणाच्या उष्णतेमुळे एक मोठा स्फोट झाला आणि सर्व अंतराळवीरांचा मृत्यू झाला.

# पंढरपूर शहरासह तालुक्यात रंगपंचमी उत्साहात





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मार्च -**

पंढरपूर शहरासह तालुक्यात पारंपारिक संस्कृती जपत रंगपंचमीचा सण बुधवारी दि.१९ मार्च रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

गेल्या काही वर्षा पासून शहरात पाण्याचा वापर न करता कोरड्या रंगांची उधळण करीत रंगपंचमी उत्सव साजरा केला जात आहे. त्यामुळे या वर्षी देखील कोरड्या रंगाची उधळण करीत अगदी लहानग्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वजण रंगोत्सवात सहभागी झालेले दिसत होते. रंगपंचमी निमित्त शहरात सकाळ पासूनच बच्चे कंपनीने रंग खेळण्यास सुरुवात केलेली दिसत होती. शहरातील बहुसंख्य दुकानदार मंडळींनी आज रंगपंचमी निमित्त दुकानांना सुटी घेवून रंगोत्सवा सारख्या पारंपारिक उत्सवा मध्ये सहभागी झालेले दिसत होते. शहरातील रेल्वेस्टेशन ग्राऊंड, प्रदक्षिणा मार्ग, नवीपेठ, जुनीपेठ, संतपेठ, भादुले चौक, महावीर नगर तसेच उपनगरातील गजानन नगर, मनिषा नगर, लिंकरोड, टाकळी परिसर, शाकुंतल नगर, इसबावी आदी ठिकाणी तरुण, तरुणींचे जथ्थे कोरड्या रंगाची उधळण करीत करीत होते.

शहर तसेच उपनगरातून अनेक ठिकाणी हौशी तरुणांनी लाऊडस्पीकर लावून गाण्याच्या तालावर ठेका धरला होता. अनेक तरुणांचे जथ्थे दुचाकीवरुन मित्रमैत्रिणांना रंग लावण्यासाठी फिरत होते. रंगपंचमी उत्सवाच्या वेळी शहर व तालुक्यात कुठेही अनुचित प्रकार होवू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

### छत्रपती प्रतिष्ठानच्या रंगोत्सवात हजारोंचा सहभाग

रंगपंचमी निमित्त छत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने होलिका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन मराठी सिनेकलाकार कुमारी रितिका श्रोत्री, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत व माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या हस्ते झाले. संयोजन संतोष नेहतराव व सुरेश नेहतराव तसेच छत्रपती प्रतिष्ठानने केले होते. कार्यक्रमास मराठी सिनेकलाकार कुमारी रितिका श्रोत्री (बॉयज २ आणि ३) हिची उपस्थिती विशेष ठरली. रंगोत्सवात पंढरपुरातील दोन ते तीन हजार तरुण-तरुणींनी आनंद लुटला. ही रंगपंचमी पूर्णपणे कोरड्या रंगाने खेळली गेली हे रंगोत्सव कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते.

### तरुणाई थिरकली डीजेच्या तालावर

येथील यमाई तलाव परिसरात दररोज सकाळी, संध्याकाळी फिरावयास येणाऱ्या काही हौशी मंडळींनी स्थापन केलेल्या सुप्रभात मंडळाच्या वतीने रंगपंचमी साजरी करण्यात आली. येथील तुळशीवृंदावनाच्या समोरील बाजुस असलेल्या मोकळ्या पटांगणात रंगोत्सवास सुरुवात करण्यात आली. या रंगोत्सवात शहरातील प्रतिष्ठीत नागरिकांसह महिला, मुली तसेच बच्चे कंपनी देखील मोठ्या उत्साहात सहभागी होवून रंगोत्सवाचा आनंद घेत असताना दिसत होती. या वेळी तरुणाई अक्षरश: डीजेच्या तालावर थिरकलेली होती.

## संक्षिप्त वृत्त



### डॉ. अनिल कांबळे यांना समाजभूषण पुरस्कार

**सांगोला, दि. १९ मार्च-**

महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळ, मुंबई यांच्यावतीने व श्री देवांग समाज इचलकरंजी, श्री देवांग कोष्टी समाज चौंडेश्वरी मंदिर कोल्हापूर यांच्या सहकार्याने सांगोल्यातील चौंडेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अनिल विठ्ठलराव कांबळे यांना २०२५ चा मानाचा समजला जाणारा कोष्टी समाजभूषण पुरस्कार कोल्हापूर येथे प्रदान करण्यात आला. डॉ.अनिल कांबळे यांचे कोष्टी समाजातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत सदर पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### युटोपियन कारखान्यावर आज शेतकरी आयडीसाठी शिबीराचे आयोजन

**मंगळवेढा दि.१९ मार्च**

कचरेवाडीच्या युटोपियन साखर कारखाना कार्यस्थळावर गुरूवारी दि. २० मार्च रोजी सकाळी अकरा ते दुपारी दोन वाजेपर्यंत शेतकरी आयडी अर्थात शेतकरी ओळखपत्र काढण्याचे शिबीर होणार आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन नायब तहसिलदार शुभांगी जाधव यांनी केले आहे. कारखाना येथील कर्मचारी, विविध विभागातील मंडल अधिकारी व तलाठी, सीएससी केंद्र यांच्या सहकार्याने हे शिबीर होणार आहे. फार्मर आयडी काढल्याशिवाय शासनाचा कुठलाही निधी मिळणार नसल्याने शेतकऱ्यांनी ते काढणे बंधनकारक आहे. त्यासाठी शेवटची मुदत दि.३१ मार्च आहे. यासाठी आधार कार्ड, ७/१२ उतारा, मोबाईल नंबर आधारलिंक असणे आवश्यक आहे.

### बँक ऑफ महाराष्ट्रच्या कर्मचाऱ्यांचा आज देशव्यापी लाक्षणिक संप

**बार्शी, दि. १९ मार्च -**

ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनच्या वतीने दि. २० मार्च रोजी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी देशव्यापी लक्षणिक संप पुकारण्यात आला आहे. या संपातील प्रमुख मागण्यांमध्ये टेम्परररी पीटीएस ना सामावून घेऊन पीटीएस ची भरती करणे, सब-स्टाफ आणि लिपिक संवर्गात पुरेशी नोकर भरती करणे, कराराप्रमाणे विशेष सहाय्यक पदे भरणे, द्विपक्षीय संबंध पद्धतीची पुन्हा स्थापना करणे, संघटना कार्यालये संघटनांना पुन्हा उपलब्ध करून देणे, डी-ज्यूरे कराराचे काटेकोर पालन करणे इत्यादी मागण्यांचा समावेश असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा लातूर रोड बार्शीच्या सरिता कुलकर्णी यांनी सांगितले.



### मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची वळसंगच्या ऐतिहासिक विहिरीला भेट

**वळसंग, दि. १९ मार्च-**

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे १८ मार्च रोजी स्थानिक स्वराज संस्था जिल्हा परिषद सोलापूर स्थापन झाल्या पासून एकमेव व प्रथम मुख्य कार्यकारी अधिकारी ज्यांनी या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या ऐतिहासिक विहीरीस अविस्मरणीय ग्रेट भेट दिली. ऐतिहासिक विहिरीच्या स्थळास आजपर्यंत जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडून एकही रुपयाचा निधी अद्यापही मंजूर नाही असे कुलदीप जंगम यांना भेटीच्या प्रसंगी सांगितले. आपण या कामास जि.प.सेस मधून निधीची तरतूद मंजूरी देवून उपलब्ध करून द्यावे अशी वळसंग भीमसैनिकाकडून मागणी करण्यात आले. यावेळी सुनील कटकधोंड, सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे,सिद्धाराम वाघमारे, मोहसीन फुलारी, ग्रामपंचायत सदस्य श्रीशैल भुसणगी उपस्थित होते.

# शहीद मेजर कुणाल गोसावी यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१९ मार्च -**

भारतमातेचे थोर सुपुत्र शौर्यचक्र प्राप्त शहीद मेजर कुणाल गोसावी यांच्या ४२ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादनासह माजी सैनिकांचा विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, साहित्य परिषद अध्यक्ष सिद्धार्थ ढवळे, वीरपिता मुन्ना गिरी गोसावी, वीरमाता वृंदादेवी गोसावी व सर्व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी श्री.घोडके ज्यांनी देशाची सेवा केली त्या सर्व माजी सैनिकांचा सन्मान माझ्या हातून झाला हे मी माझे भाग्य समजतो असे सांगितले. यावेळी सिध्दार्थ ढवळे यांनीही मागदर्शन केले. यावेळी कान्हापुरी (ता.पंढरपुर) येथील नववीत शिकणाऱ्या



श्रीनाथ गोसावी याने सुंदर मनोगत व्यक्त केले. त्याने रचलेल्या शहीद मेजर कुणाल गोसावी यांच्या कवितेची प्रतिमा वीरमाता व वीरपिता गोसावी दाम्पत्याकडे सुपूर्त केली. यावेळी श्रीनाथ गोसावी याचा सन्मान वरिष्ठ पोलीस निरीक्षक घोडके यांच्या हस्ते करण्यात आला. वीरपिता मुन्ना गिरी गोसावी यांनी प्रास्ताविक केले. महेश म्हेत्रे यांनी आभार मानले. सुहास कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

### या माजी सैनिकांचा झाला सन्मान

कांतीलाल बटाने (सुभेदार) ,हनुमंत खपाले (नायब सुभेदार), व्यंकटेश बाबर (नायब सुभेदार), श्रीविष्णू माळी (नायब सुभेदार ), मोहम्मदअली बोरी (नायक), दीपक क्षीरसागर (लान्स नायक), मुकुंद शिंदे (हवालदार), बी.एस. इंगोले (हवालदार), सदाशिव मोरे (एलआरओ), माजी सैनिक संघटना उपाध्यक्ष शंकर बागल, श्रीकृष्ण घाटोळे (एसपीआर), पोपट कुलकर्णी (हवालदार), ज्ञानेश्वर बागल, बाळू घळके, उत्तम कदम (नाईक), पांडुरंग माने (हवालदार), ज्ञानेश्वर गोसावी (सिग्नल प्रमुख) तसेच कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे एनसीसी कॅडीडेट मयुरेश गुजर व आदित्य वाघमारे.

# ट्रॅक्टर खरेदीसाठी पाच लाखाची मागणी; विवाहितेचा छळ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ मार्च-**

हुंड्यात कमी पैसे दिल्याने ट्रॅक्टर खरेदीसाठी पाच लाखांच्या मागणीने सासरी विवाहितेचा सतत छळ केल्याचा आरोप विवाहितेने पतीसह सासू, सासरे व दोन नणंदा यांच्या विरुध्द केला आहे.

निकिता किरण गायकवाड (वय २३ सध्या रा. बार्शी ) यांनी बार्शी पोलीस ठाण्यात पती किरण रमेश गायकवाड, सासु अनिता रमेश गायकवाड, सासरे रमेश सदाशिव गायकवाड (सर्व रा. देवळाली, ता. जि. धाराशिव) तर नणंद सुप्रिया अमोल गंगावणे व नेहा बालाजी सावंत या पाचजणांविरुद्ध फिर्याद दिली आहे निकिता यांचे लग्न ६ जून २०२१ रोजी देवळाली, जि. धाराशिव येथे किरण रमेश गायकवाड यांच्यासोबत बौद्ध पद्धतीने झाले. सुरुवातीचे तीन महिने सासरकडून व्यवस्थित वागणूक मिळाली. मात्र, १० सप्टेंबर २०२१ पासून सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी त्रास देण्यास सुरुवात केली. विवाहात दिलली दहा हजार रुपयांची रक्कम कमी असून नवीन ट्रॅक्टरसाठी माहेरहून ५ लाख रुपये आण असा तगादा लावला. तक्रारीनुसार, पती किरण रमेश गायकवाड यांनी वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण केली. सासरे रमेश गायकवाड दारु पिऊन पैशांसाठी तगादा लावत होते. सासू अनिता गायकवाड व दोन नणंदा सुप्रिया गंगावणे व नेहा सावंत यांनी अपमानास्पद शब्दांत टोमणे मारुन मानसिक छळ केल्याचा आरोप केला आहे. निकिता यांना वेळोवेळी उपाशी ठेवण्यात आले. तसेच स्वयंपाक चांगला येत नसल्याच्या कारणावरुन त्यांना सतत टोचून बोलण्यात आल्याचे म्हटले आहे. याविरोधात निकिता यांनी सुरुवातीला गप्प राहणे पसंत केले. मात्र, परिस्थिती न बदलल्याने त्यांनी पाच महिन्यांनी आई-वडिलांना हा प्रकार सांगितला. आई-वडिलांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु सासरच्या लोकांनी त्यांना उलट शिवीगाळ करत धमक्या दिल्याचे म्हटले आहे. अखेर ६ डिसेंबर २०२४ रोजी निकिता यांनी सासर सोडून माहेरी परतण्याचा निर्णय घेतला. निकिता यांना तीन वर्षांची मुलगी असूनही पतीकडून व सासरच्या लोकांकडून कोणतीही मदत मिळत नव्हती. शेवटी, सातत्याने होत असलेल्या छळाला कंटाळून त्यांनी बार्शी पोलीस ठाण्यात पतीसह पाचजणांविरुद्ध तक्रार नोंदवली. पोलीस प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकाने शांत राहणे गरजेचे

### आ. अभिजीत पाटील; माढा येथे इफ्तार पार्टी



**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि.१९ मार्च -**

सध्याच्या परिस्थितीत सामाजिक गढूळपणा वाढत चाललेला असून हे वातावरण चांगलं होण्यासाठी प्रत्येकाने शांत राहणे गरजेचे असल्याचे मत आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले.

आमदार अभिजीत पाटील यांच्या वतीने विस्तार पार्टीचे आयोजन संपर्क कार्यालय माढा येथे करण्यात आले होते. माणुसकीने वागणे हाच खरा धर्म असून ईश्वर, अल्ला यांनी एक शिकवण दिलेली आहे. त्यांच्या विचारावर आपण चालले पाहिजे असे आमदार पाटील यांनी सांगितले.

रमजान सणासाठी दीड कोटी लिटर भेसळयुक्त दूध विक्री करणारे विधिमंडळात प्रश्न उपस्थित करत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केल्याची माहिती आ. पाटील यांनी दिली.

यावेळी नगरसेवक शहाजी साठे, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव कानडे, राजाभाऊ चवरे, भाऊसाहेब देशमुख, शंभू साठे, आबा साठे, दिनेश जगदाळे, बागुल बागवान, बशीर आतार, मुजीब तांबोळी, जहीर मनेर, फारुख शेख, इसाक कुशेरी, शरीफ कुशेरी, जितू जमदाडे, वायजी भोसले, अभिजीत साठे, अभिजीत उबाळे उपस्थित होते.

### रेल्वे गाड्यांना थांबण्यासाठी प्रयत्नशील

माढा रेल्वे स्थानकावर जास्तीत जास्त रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा व सुखसुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी प्रयत्नशील असून या माढा स्टेशन ठिकाणाहून मी स्वतः मुंबईकडे प्रवास करत असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

# पंढरीच्या शिक्षक डॉक्टरांचा विदेशात डंका!

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ मार्च -**

येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात कार्यरत असणारे डॉ. प्रशांत ठाकरे यांच्या परदेशात म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्रात राबवण्यात येणाऱ्या वैविध्यपूर्ण व नाविन्यपूर्ण उपक्रमांची व विविध योजनांची माहिती जाणून घेऊन या उपक्रमांची आपल्या राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात कशी अंमलबजावणी करता येईल या अनुषंगाने डॉ. ठाकरे यांची निवड झाली आहे.

या अभ्यास दौ-याचा जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी नक्कीच फायदा होईल. या आंतरराष्ट्रीय अभ्यास दौ-यात डॉ. प्रशांत ठाकरे पंढरीचा नावलौकिक



नक्की वाढवतील. डॉ. ठाकरेंना यापूर्वीच येथील कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने विशेष गुणवत्ता पुरस्कार देऊन गौरविले आहे. त्यांच्या निवडीने कलासाधनाच्या शिरपेचात आणखी एका मानाच्या तु-याची भर पडली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील डॉ. ठाकरेंनी दिलेले योगदान हे खूप महत्वपूर्ण आहे. त्यामुळे पंढरीच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक देशाबरोबर परदेशातही पसरला आहे. त्यांचा दौरा यशस्वी झाल्यानंतर कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात येणार आहे.

# संकटातील हरिणाच्या पिलाला जीवदान

### मोहन राठोड यांचे प्रयत्न यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १९ मार्च-**

कुमठे तांडा येथील सकाळी पहाटेच्या वेळी हरणाचा कलप धावतांना राठोड गुरुजी यांना दिसले, त्या प्रसंगी काही मोकाट कुत्रे, हरीण्याचे पाठलाग करीत होते, त्यांच्यावर आलेल्या संकटाला मात करण्यासाठी हरिण पळत होत्या परंतु जवळच शेतीला तारेचे कंपाऊंड असल्यामुळे वेगवान धावणारा हरीण त्या कंपाऊंडला धडकला आणि पायाला दु:खापत झाले. या वेदणामुळे त्या हरीणाला चालता सुद्धा येत नव्हते.

यावेळी राठोड यांनी त्यांचे मित्र अर्जुन चव्हाण यांच्याशी संपर्क साधून, वनविभागाशी फोन वर माहिती दिलं आणि वनकर्मचारी दाखल झाले,तत्काळ व हरिणाला पुढील तपासणी वन विभाग कर्मचारी घेऊन गेले, अशी माहिती राठोड सर यांनी दिले.



रखरखत्या उन्हाळ्यात पाण्याच्या शोधात पशु, पक्षी, हरीण, लांडगे, साबर, असे वनजीव अन्न आणि पाण्यासाठी भटकंती करीत असतात, सबंधीत विभागातील, अधिकारी, कर्मचारी यांनी वनजीव यांच्यासाठी पाण्याचे नियोजन करावे

**-मोहन राठोड**

## निधन वार्ता

### प्रा.महादेव कांबळे



**करमाळा, दि.१९ मार्च -**

येथील यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी पर्यवेक्षक प्रा.महादेव विठ्ठल कांबळे यांचे दि. ८ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले. प्रा.कांबळे हे मुळचे पिंपळखुंटे (ता. माढा) येथील रहिवाशी होत. २०१९ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. त्यांची सहकार आणि अकौटन्सी या विषयामध्ये तज्ञ प्राध्यापक म्हणून ओळख होती. विद्यार्थी त्यांना अकौन्टन्सी विषयाचा बादशहा असे संबोधत.

### धोंडीराम पांढरे



**पिलीव, दि.१९ मार्च -**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील धोंडीराम मधुकर पांढरे (वय-३०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार

### बाळकृष्ण गणगे



**सोलापूर, दि. १९ मार्च-**

बाळकृष्ण मुरलीधर गणगे यांचे (वय ७०) गुजरातमधील वापी येथे अल्प आजाराने निधन झाले. ते सोलापूर येथे एस.टी. महामंडळमध्ये लिपीक या पदावरुन निवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सध्याला गुजरातमधील वापी येथे वास्तव्यास होते.

# बिअर शॉपीच्या मॅनेजरकडून एकावर हल्ला

### बार्शीतील प्रकार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१९ मार्च -**

शहरातील एकविराई चौकातील मानसी बिअर शॉपीच्या मॅनेजरकडून एका व्यक्तीवर हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. या हल्ल्यात भंगार व्यवसायिक भुजंग चंद्रसेन मोरे (वय ४७, रा. कसबा पेठ, बार्शी) जखमी झाले असून त्यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी भुजंग मोरे हे रात्री १० वाजून २५ मिनिटाच्या सुमारास एकविराई चौकातील मानसी बिअर शॉपीसमोर राजेंद्र शिंदे यांच्यासोबत बोलत होते. त्याचवेळी बिअर शॉपीचा मॅनेजर मंथन जाधव हा त्यांच्या जवळ आला व तू माझ्या मालकांना शिवीगाळ का करतो? अशी विचारणा केली. फिर्यादीने गैरसमज असल्याचे सांगताच, मंथन जाधवने संतापाने आपल्या कंबरेचा पट्टा काढून त्यांच्या डोक्यात प्रहार केला. त्यामुळे त्यांना दुखापत झाली असून त्यांच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरु झाला.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी हस्तक्षेप करुन भांडण सोडवले. मात्र, हल्लेखोराने फिर्यादीला शिवीगाळ करत तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. जखमी भुजंग मोरे यांनी तात्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी त्यांना प्राथमिक उपचार घेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे पाठवले. उपचारानंतर त्यांनी मंथन जाधवविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

या प्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरु केला आहे.

# मरवडे फेस्टिव्हलचा डंका राज्यात सर्वदूर

### पत्रकारांची भूमिका महत्वाची - सावंत

### छत्रपती परिवारासह ग्रमस्थांकडून रौप्यमहोत्सवी आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १९ मार्च-**

मरवडे (ता. मंगळवेढा) येथील यात्रेनिमित्त आयोजित होणाऱ्या सांस्कृतिक व साहित्यिक उपक्रमांमुळे गावचा नावलौकिक संपूर्ण राज्यात गेला आहे. त्यात पत्रकारासह छत्रपती परिवाराची भूमिका महत्वाची असल्याचे गौरवोद्गार भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत यांनी काढले.

मरवडे येथील छत्रपती परिवाराच्या वतीने आयोजित रौप्यमहोत्सवी मरवडे फेस्टिव्हल सोहळ्यातील पत्रकार बांधवांच्या कृतज्ञतापूर्वक गौरव प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी सावंत यांनी छत्रपती परिवाराने आजवर अनेक उपक्रम राबविले असून त्यास पत्रकारांसह समाज माध्यमाने राज्यात नेल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष अँड नंदकुमार पवार होते. यावेळी स्व. रतनचंद शहा अर्बन बँकेचे चेअरमन राहुल शहा, उद्योजक हणमंतराव दुधाळ, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मंगळवेढा शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी, माजी सरपंच दादासाहेब पवार, दामोदर घुले, रयत सेवक बँकेचे माजी चेअरमन साहेबराव पवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राहुल शहा यांचेही भाषण झाले. यावेळी मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील तीस पत्रकार बांधवांचा सन्मानचिन्ह, ऋणपत्र, फेटा, शाल, पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विरेंद्र केंजळे प्रस्तुत 'साज सातारा' ही गीत संगीताची सुरेल मैफल संपन्न झाली.

या कार्यक्रमाला रसिकांची उत्तम दाद मिळाली. संयोजक सुरेश पवार यांनी प्रास्ताविक केले. सचिन कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय मासाळ यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## शहरातील रंगोत्सव


अंध व अपंग पुनर्वसन केंद्रातील रंगोत्सव.


उत्तर कसबातील युवक रंग खेळताना.


जिल्हा परिषदेतील महिला कर्मचाऱ्यांनी एकमेकांना रंगवुन उत्साहात रंगपंचमी साजरी केली.


तरुण भारतच्या कर्मचाऱ्यांनी रंगपंचमी साजरी केली.


अवंती नगर परिसरात आधुनिक रंग पिचकारीसह रंग खेळताना लहान मुले


महिलांनी उत्साहात साजरी केली रंगपंचमी.


विविध रंगात रंगलेले युवक.


विविध रंगात चिंब भिजलेल्या महिला.

# कर्जमाफीच्या अफवा; सव्वालाख शेतकऱ्यांचे ३ हजार ९६० कोटींचे 'पीककर्ज' थकीत

**● कर्जाचे 'नूतनीकरण' करून सीबील चांगला ठेवा**
**● जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखरडे**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

जिल्ह्याच्या ११ तालुक्यातील १ लाख २४ हजार ७८१ शेतकऱ्यांचे ३ हजार ९६० रूपयांचे पीककर्ज थकले असल्याने बँकांची आर्थिक अडचण आणि शेतकऱ्यांचेही सीबील खराब होत असल्याची खंत सोलापूर जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक राम वाखरडे यांनी 'खास' दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.

दरम्यान, कर्जमाफीची घोषणा परवाच्या अर्थसंकल्पात झाली नसल्याने सध्या कर्जमाफीचा सरकारचा विचार नसून, कोणत्याही अफवांना बळी न पडता शेतकरी बांधवांनी आपले कर्ज भरून बँकांना सहकार्य करावे आणि आपलेही सीबील चांगले ठेवावे, असा सल्लाही शेतकरी बांधवांना त्यांनी दिला.

कर्जमाफी होईल या आशेने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी पीककर्ज भरले नाही. यामुळे अनेकांचे सीबील खराब होवून त्यांना इतरही बँकांतून कर्ज दिले जात नाही. कर्जाचे नूतनीकरण (नवं-जुनं) वेळेवर झालं तर शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३ टक्के आणि राज्य सरकारकडून ४ टक्के व्याजाचा परतावा मिळतो. इतकेच नाहीतर इतरही कर्ज मिळते. मात्र काही पुढाऱ्यांकडून किंवा वॉटस्‌ॲपवरील अफवांवरून कर्जमाफीची चुकीची माहिती मिळते; यामुळे शेतकरीबांधव घेतलेले पीककर्ज भरत नाहीत. यामुळे त्यांचे सीबील खराब होवून बँकांचीही आर्थिक अडचण होत आहे. यंदा दुष्काळी स्थिती नसल्याने शेतकऱ्यांकडे शेतातील मालाचे थोडे पैसे आले आहेत; मात्र यंदा कर्जमाफी होणार...या पसरलेल्या अफवांमुळे अनेकांनी पीककर्जाचे नूतनीकरण केले नाही. यामुळे अशा शेतकऱ्यांना नवीन पीककर्जही मिळत नाही. किमान आतातरी शेतकरी बांधवांनी बँकांना सहकार्य करावे आणि कर्जाचं नवं-जुनं करून घ्यावं, अशी अपेक्षाही वाखरडे यांनी शेवटी व्यक्त केली.

### जिल्ह्यातील ५४ टक्के शेतकऱ्यांकडे कर्ज थकीत

या जिल्ह्यासाठी यंदा ४ हजार ६०० कोटीचे पीककर्जाचे टार्गेट होते. मात्र जिल्ह्यातील ११ तालुक्यात ३ हजार ६१७ कोटी कर्जवाटप झाले आहे. शेतकरी बांधवांनी पीककर्जाचे वेळेवर नूतनीकरण केले असते तर अजून कर्ज वाटप बँकांनी केले असते. सध्या जिल्ह्यासाठी राष्ट्रीयकृत ११ बँका, खाजगी १४, जिल्हा मध्यवर्ती, विदर्भ कोकण अशा तब्बल ३४ बँकांतून पीककर्ज दिले जाते. याचा फायदा शेतकरी बांधवांनी घ्यावा. अन् दरवर्षी कर्जमाफीची वाट न पाहता कर्जाचे नूतनीकरण करून बँकांना सहकार्य करावे आणि आपलीही आर्थिक उन्नती साधावी.

**- राम वाखरडे, व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक**

### यंदा कर्ज वसुलीस कमी प्रतिसाद

विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधकांकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. निवडणूक झाल्यानंतर महायुतीची सत्ता आली. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीची प्रतीक्षा करू लागले. शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड करण्यासाठी पुढेच आले नसल्याने कर्ज वसुलीस प्रतिसाद मिळाला नाही. परिणामी रब्बी हंगामातील पीककर्ज वितरणावर त्याचा परिमाण झाला. त्यामुळे रब्बी हंगामातील पीक वितरणाची टक्केवारी कमी झाली आहे. तरीही सोलापूर जिल्ह्यात ८५ टक्केपर्यंत बँक अधिकाऱ्यांनी कर्ज वाटप केले आहे.

## सात रस्ता परिसरातून दुचाकी लंपास

**सोलापूर :** सात रस्ता येथील नाना नानी पार्क येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच १३ बी पी ६४७७ ही चोरून नेल्याची घटना १६ मार्चला घडली. याप्रकरणी विकास हुनप्पा जाधव वय ४४, रा. मंत्री चंडक कॉम्प्लेक्स, सम्राट चौक यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## भांडणाच्या रागातून केली मारहाण

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

पश्चिम मंगळवार पेठ येथे सकाळी झालेल्या भांडणाच्या रागातून दहा जणांनी मारहाण केल्याची घटना अठरा मार्चला घडली. याप्रकरणी गोविंदा अशोक केकडे वय ३७, रा. पश्चिम मंगळवार पेठ यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.

त्यांच्या फिर्यादीवरून महेश जगदाळे, जय जगदाळे, शिव जगदाळे, संजय कोळी, प्रशांत मुद्दे, उमेश बंडगर व इतर अनोळखी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादीच्या भावाचा मुलगा रुद्र हा मित्र अनमोल भडंगे याचा नमन दासरी याच्यासोबत ट्युशनमधील मुली सोबत बोलत होता. यावरून शिवीगाळ व भांडण केल्याने त्याच रागातून संशयित आरोपींनी फिर्यादी गोविंद केकडे यांच्या भावाचा मुलगा रुद्र याला खल्लास करतो अशी धमकी देत फिर्यादीस मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या दुकानातील कामगार आबा माने यास काठीने मारहाण करून दुकानासमोरील लावलेल्या इलेक्ट्रिक मालवाहतूक गाडीवर संशयित आरोपी महेश जगदाळे याले दगड मारून नुकसान केले. गेट समोरील ग्राहकाच्या वाहनावर वीट मारून नुकसान केल्याची फिर्यादीत नमूद आहे.

## चाटी गल्लीत तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

चाटी गल्ली येथील व्ही. आर. पवार दुकानासमोर सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणास मारहाण केल्याची घटना १८ मार्चला घडली.

याप्रकरणी उमेश माधव बंडगर (वय २८, रा. पश्चिम मंगळवार पेठ)यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून रुद्र केकडे, राज केकडे, प्रथमेश भडंगे, प्रणित जोगधनकर, अनमोल भडंगे, अमोल केकडे सर्व (रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी हे चाटी गल्ली येथून जाताना फिर्यादीचा मित्र शिवराज जगदाळे, जयराज जगदाळे, संजय कोळी, प्रशांत मुद्दे तसेच त्याच्या शाळेतील इतर मित्र यांच्यात वाद सुरू होता. यावेळी फिर्यादी भांडण सोडवण्यासाठी गेले. त्यावेळी फिर्यादीच्या ओळखीचा संशयित आरोपी अमोल केकडे तेथे आला व त्याने काही एक न बोलता मारहाण केली.




## मेहता शाळेत पर्यावरणपूरक रंगपंचमी साजरी

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

जुळे सोलापूरातील कै. वि. मो.मेहता माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक रंगपंचमी साजरी केली. पर्यावरण पूरक रंगपंचमी साजरी करण्यासाठी मेहता माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध शाळांमध्ये जाऊन नैसर्गिक पद्धतीने रंग कसे बनवायचे हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे पटवून सांगितले.

पळसाच्या फुलापासून नारंगी रंग, हळदी, झेंडूच्या फुलांपासून पिवळा रंग,बीट व गुलाब पाकळ्यांपासून लाल रंग, पालक, कोथिंबीर पासून हिरवा रंग, अशा विविध भाज्या, फुलं, पानं, वापरून ओला व कोरडा रंग बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

रंगपंचमीला रासायनिक रंगांपासून आरोग्यास होणारी हानी टाळण्यासाठी प्रबोधन केले. १० शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी ही कार्यशाळा राबविली. शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभागातील शिक्षकांनी परिश्रम घेतले.



## जिल्हाधिकारी कार्यालयात रंगपंचमी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

सोलापूर येथील जुने जिल्हाधिकारी कॅम्पस आणि नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रंगपंचमी सण उत्साहात साजरा केला. जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील सर्वच शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही रंगपंचमीनिमित्त एकमेकांना रंग लावून आपला आनंद द्विगुणीत केला.

आपल्या देशात हिंदू धर्मातील महत्त्वाच्या सणांपैकी एक असलेल्या होळीच्या अवघ्या पाच दिवसांनी रंगपंचमीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. विशेषत: महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये रंगपंचमीचा हा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो.

या सणाशी संबंधित प्रचलित समजुतीनुसार, रंगपंचमीच्या दिवशी देवी-देवतांची श्रद्धेने आणि भक्तिभावाने पूजा केल्याने इच्छित परिणाम प्राप्त होतात. हिंदू कॅलेंडरनुसार, रंगपंचमी हा सण फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या पाचव्या दिवशी साजरा केला जातो. या सणानिमित्त सोलापूर शहरासह विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकत्रित येवून रंगोत्सव साजरा केला. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) विणा पवार यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# प्रारूप शहर विकास आराखड्यावरील हरकतींवर सुनावणीसाठी समिती स्थापन

**● शासनाच्या नगररचना विभागातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसह चौघांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

पुढील २० वर्षांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप शहर विकास आराखड्यावर तब्बल ४ हजार हरकती आणि दावे महापालिका प्रशासनाकडे दाखल झाले आहेत. यावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाकडून राज्य नगररचना विभागाच्या तीन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसह ४ जणांची समिती तयार करून महापालिकेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.



प्रारूप शहर विकास आराखड्यावर आलेल्या तक्रारी आणि दाव्यांवर सुनावणी घेऊन निर्णय देण्यासाठी आणि हा आराखडा अंतिम करण्यासंदर्भात महापालिकेकडून पुणे येथील नगर रचना विभागीय कार्यालयाकडे समिती स्थापन करण्यासंदर्भात दि. २५ जानेवारी रोजी मागणी पत्र पाठविले होते. यानंतर पुणे विभागीय कार्यालयाने राज्य नगररचना विभागाकडे पुढील कार्यवाही संदर्भात पत्राद्वारे आदेश होण्यासंदर्भात पत्रव्यवहार केला होता. यावरून शासनाच्या निर्देशानुसार विभागाने सोलापूर शहर विकास आराखड्यावरील प्राप्त हरकती, दाव्यांच्या सुनावणीसाठी समिती जाहीर केली आहे.

लवकरच ही समिती सोलापुरात येऊन प्रथम प्राप्त हरकती आणि दाव्यांचा आणि शहरातील आरक्षणे टाकलेल्या विविध ठिकाणाची पाहणी करून अभ्यास करणार आहेत. महापालिका प्रशासनाकडून तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखड्यात शहरातील विविध भागातील ९२१ जागांवर आरक्षण टाकण्यात आले आहे. मात्र या संदर्भात शहरातून तब्बल ४ हजारांहून अधिक हरकती आणि दावे महापालिकेकडे दाखल झाले आहेत. या शहर विकास आराखड्यावर शहरातील विकासात जागामालक आणि शहरवासीयांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत. तर हा शहर विकास आराखडा रद्द करून पुन्हा एकदा नव्याने जागेवर जाऊन पाहणी करूनच विविध आरक्षणे टाकावीत यासाठी जोरदार विरोध झाला आहे.

या संदर्भातील तीव्र प्रतिक्रिया शासनाकडे गेल्या आहेत. मात्र यानंतरही शासनाकडून शहर विकास आराखड्यावरील हरकतींच्या सुनावणीसाठी समिती जाहीर केली आहे. यामुळे सोलापूर महापालिकेने तयार केलेला प्रारूप शहर विकास आराखडा रद्द होण्याची आशा मावळली आहे.

### ▸▸ यांचा आहे या समितीमध्ये सहभाग

नगररचना विभागाचे सेवानिवृत्त उपसंचालक संजय सावजी, सेवानिवृत्त उपसंचालक दत्तात्रय पवार, सेवानिवृत्त सहाय्यक संचालक अनिलकुमार पाटील आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. श्रीकांत जहागीरदार चौघांची नावे समितीमध्ये देण्यात येऊन या संदर्भातील विशेष पत्र महापालिकेकडे प्राप्त झाले आहे. हरकती आणि दाव्यांवरील सुनावणी घेऊन निर्णय देण्यासाठीच्या प्रक्रियेला तब्बल दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे.

### ▸▸ विकास आराखड्यासंदर्भात नागरिकांनी बाजू मांडावी

सोलापूर महापालिकेने प्रारूप शहर विकास आराखडा जाहीर केला आहे. या संदर्भात कुणाची हरकत, सूचना अथवा अन्याय झाल्याची भावना असेल त्यांनी संबंधित समिती समोर आपली बाजू मांडावी. त्याचा संपूर्ण अहवाल ही समिती महापालिकेकडे सादर करणार आहे.यानंतर पुढील कार्यवाही होणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले आहे.



## कचरा डेपो, बायो एनर्जी प्लांटची मनपा आयुक्तांनी केली पाहणी

### वीज, खत निर्मिती प्रक्रियेची घेतली माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

तुळजापूर रोडवरील कचरा डेपो, बायो एनर्जी प्लांट,ट्रान्स्फर स्टेशनची आज महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली.

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज शहरातील एचएसआर टाकी जुळे सोलापूर , रुपाभवानी चौक या ठिकाणी ट्रान्स्फर स्टेशनचीं पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिकारी अनिल चराटे आदी उपस्थित होते. शहरातील घरोघरी घंटागाडी द्वारे कचरा कशा पद्धतीने गोळा करण्यात येतो.रोज किती टन कचरा जमा केला जातो. नंतर तो ट्रान्स्फर स्टेशन या ठिकाणी ओला व सुका विलगिकरण करून त्या ठिकाणीहुन मोठ्या आरसी हुक लोडर वाहनातून कचरा डेपोला जाते. तसेच दैनंदिन येणाऱ्या कचऱ्यावर बायो -एनर्जी प्लांट येथे प्रकीया करून या ठिकाणी वीज निर्मिती व खत निर्मिती केली जाते. या ठिकाणी कशा पद्धतीने कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते या संदर्भात माहिती घेतली.

**बायो -एनर्जी प्रकल्पात ३ मेगा वॅट वीज निर्मिती**

बायो -एनर्जी या ठिकाणी ३ मेगा वॅट वीज निर्मिती तर २०/२५ टन दररोज कपोस्ट खत तयार केले जाते. तुळजापूर रोड येथील नवीन तयार करण्यात आलेल्या मृत प्राण्यांसाठीच्या विद्युत दाहिनीची पाहणी करून त्यांनी माहिती घेतली.


हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बारा दिवसांतच निंबाळकर पुन्हा परतले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक रखडल्याने प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. प्रशासक मोहन निंबाळकर यांच्या विरोधात तक्रार केल्याने त्यांची उचलबांगडी करण्यात आली होती. नाट्यमय घडामोडी होऊन ते पुन्हा १२ दिवसांतच प्रशासकाच्या खुर्चीवर विराजमान होणार आहेत.

राष्ट्रवादी अजित पवार गट ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष बसवराज बगले यांनी प्रशासक मोहन निंबाळकर यांच्या विरोधात तक्रार केली होती. हा विषय त्यांनी लावून धरला होता. अनियमित व बेकायदेशीर कामांचा उल्लेख तक्रारीत केली होती. याची दखल घेऊन त्यांची उचलबांगडी करण्यात आली होती. त्यांच्या जागी बागल यांची नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यान नाट्यमय घडामोडी होऊन एका विद्यमान आमदाराच्या शिफारस पत्राने पुन्हा त्यांनी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक पद पटकविण्यात यश मिळविले आहे. ते गुरुवारी २० मार्च रोजी पदभार घेणार आहेत.

## ▶▶ शहरातील रंगपचमी उत्साहात...


महिलांनी एकत्रित येत रंगोत्सव साजरा केला.


अरिहंत कॉम्प्लेक्समध्ये महिला रंग लावण्याचा आनंद घेताना


काशीकापडी गल्ली येथील श्रीकृष्ण मंदिरातील रंगोत्सव.


भवानी पेठेत बाराबंदी वेशभूषेत रंग खेळताना युवक


गोयल परिवारातील मुली रंगोत्सव साजरा करताना.


भवानी पेठ रस्त्यावर चिमुकले बालगोपाल रंग खेळताना.


डब्ल्यू आय टी कॉलेज परिसरातील रंगपंचमी


बच्चे कंपनीची रंगपंचमी.

# सहकार पंढरीतील सहकारी संस्थांवर प्रशासक राज्य

## ● काही संस्थांना उभारी, तर काहींची होईना प्रगती
## ● संचालक मंडळाच्या कारभाराचे लागू लागले वेध

**तभा वृत्तसेवा । जगन्नाथ हुक्केरी**
**सोलापूर, दि. १९ मार्च–**

**महाराष्ट्रात सर्वाधिक साखर कारखान्यांसह सहकारी संस्था सोलापूर जिल्ह्यात असल्याने सहकाराची पंढरी म्हणून जिल्ह्याची ओळख आहे. याच जिल्ह्यातील बहुतांश सहकारी संस्थांवर प्रशासक राज्य आहे. यामुळे लोकनियुक्त संचालक मंडळाची निवडणूक कधी होणार आणि जनतेच्या हिताचे कामे कधी सुरु होणार याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत. प्रशासकांचे कार्य चांगले असले तरी लोकाभिमुख कारभारासाठी संचालक मंडळाची गरज भासतेच ही वस्तुस्थिती देखील नाकारता येणार नाही.**

शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळख असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने बळीराजांच्या जीवनामध्ये अर्थक्रांती करण्याबरोबरच साखर कारखान्यांना मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप केले. यामुळे बँक तोट्यात गेली. वसुलीचा तगादा लावण्यात आला. बँकेचे कारभारीच कर्जदार असल्याने वसुलीला मोठ्या प्रमाणात अडचणी येऊ लागल्या. त्या अडचणी सोडवताना अनेक प्रश्न उद्‌भवू लागले. त्यात शेतकऱ्यांना कर्जरोखे देणे बंद झाले. अनेक सोसायट्यांचे काम रखडले. बँक आणि शेतकऱ्यांमधील दुवा म्हणून काम करणाऱ्या सोसायट्यांच्या सचिवांचे तब्बल ४२ महिन्यांपासून पगार रखडले. अशात बँकेला उभारी देण्यासाठी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. शैलेश कोतमिरे यांनी पदभार घेऊन जिल्हा बँकेचे आर्थिक पत सुधारण्यासाठी अनेक योजना राबविल्या. त्यातून बड्या थकबाकीदारांबरोबरच छोट्या-छोट्या थकबाकीदांची वसुली केली आणि बँक पूर्वपदावर आली. आता कुंदन भोळे प्रशासक म्हणून काम पहात आहेत.




दूध पंढरीने सोलापूरच नव्हे तर राज्यासह सीमा भागाला दुधासह आपल्या उत्पादनाने भुरळ घातली होती. अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करुन शेती आणि शेतकऱ्यांना जोडधंदा देण्यात ज्या जिल्हा दूध संघाने पुढाकार घेतला होता. त्याही दूध संघावर आता प्रशासक आहे. दूध संघाची परिस्थिती ही सुकाणू नसलेल्या होडीप्रमाणे झाली आहे. त्या होडीला प्रगतीच्या किनाऱ्यावर पोहचविण्यासाठी प्रशासक श्रीनिवास पांढरे यांनी शर्थीचे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे दूध संकलन वाढले. बंद पडलेली काही उत्पादने सुरु झाली. पूर्वी १६ हजार लिटर दूध संकलन होत होते. आता फक्त आणि फक्त २ हजार ३०० लिटर दूध संकलन होत असून, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन बंद आहे. मध्यंतरी दूध संघाला उभारी देण्यासाठी प्रशासक श्रीनिवास पांढरे यांनी वरवडेवरुन दूध आणले. नवनवीन प्रयोग करुन जिल्हा दूध संघ वाचविण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. दूध उत्पादकांना वेळेवर बील मिळत नसल्याने दूध संकलन मोठ्या प्रमाणात घटले आहे. अनेक अडचणींतून वाट शोधू पाहणाऱ्या दूध संघावर काही केल्या प्रगतीची साय येत नसल्याने संघ दुधाप्रमाणे फुटणार की टिकणार, या प्रश्नाचे उत्तर काळच ठरविणार आहे.

दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूरसाठी असलेली श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती. या बाजार समितीची निर्मिती, प्रगती फारच रंजक आहे. स्व. बाबुरावअण्णा चाकोते, वि. गु. शिवदारे, भीमराव पाटील यांच्या काळात शेतकरी आणि व्यापारी हित जपले जायचे. तो काळ वेगळा होता. माणुसकी जपली जायची. पण त्यातही आता राजकारण आले. त्यात स्वार्थ बोकाळल्याने समितीचा कारभार रामभरोसे बनला. या संस्थेवरदेखील प्रशासक राज्य आहे.

अनेक तक्रारीनंतर प्रशासक बदलले. पुन्हा त्याच प्रशासकाकडे कारभार सोपविण्यात आला. प्रशासनाच्या काळात ना शेतकरी हित पाहण्यात आले ना व्यापाऱ्यांचे. बाजार समितीतील विशेषतः कांदा बाजारात कित्येक शेतकऱ्यांचे पैसे अडकल्याच्या तक्रारी आहेत. शेतकऱ्यांसाठी ना निवारा शेड उभारले, ना त्यांना कोणत्या सुविधा दिल्या. सार्वजनिक स्वच्छतागृहांबरोबरच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोयीही प्रशासकांनी केल्या नाहीत. संचालक मंडळानेही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे समोरे येते. केवळ जिल्हा मध्यवर्ती बँक, जिल्हा दूध संघ सावरण्याचे काम प्रशासकांनी केल्याचे स्पष्ट होत असले तरी बाजार समितीच्या कारभारात प्रशासकांनी चमत्कार केल्याचे अद्याप तरी काही दिसत नाही. यामुळे बाजार समितीची तात्काळ निवडणूक होऊन लोकनियुक्त संचालक मंडळाच्या हातात कारभार देण्याची मागणी असल्याची चर्चा आहे.

### प्रशासकाचे तोटे

- नियमांनुसारच काम करणार
- मी कायमस्वरुपी नाही. ठराविक काळानंतर बदली होणार ही भावना
- जीआर माझ्यासाठी प्रमाण आहे
- हितासाठी तडजोड करणार नाही
- स्थानिक प्रश्न, अडचणींची माहिती नसणे
- अडचणींवर मात न करता सतत नियमांची उजळणी करत राहणे

### संचालक मंडळ का हवे?

- समस्या, अडचणींची माहिती असल्याने तात्काळ निर्णय होणे
- नियमांचे बंधन न डावलता एखाद्याला मदत करण्याचा अधिकार
- महत्त्वाच्या प्रसंगी ठरावाद्वारे निर्णय घेता येणे
- नियमांची काथ्याकुट न करता मार्ग काढता येणे
- लोकनियुक्त संचालक असल्याने परिस्थितीची जाणीव, तोडगा काढणे शक्य

### आतापर्यंत पाचवेळा प्रशासक

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर आतापर्यंत चेअरमन भीमराव पाटील यांच्या कार्यकाळात, २०११ मध्ये सहा महिने, २०१६-१८ यासह अन्य दोनवेळा प्रशासकांनी कारभार केला आहे. आता निवडणूक घेण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. आता निवडणूक कधी होणार आणि व्यापारी, शेतकरी हित जपणारी संचालक मंडळ कधी येणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था लोकशाहीच्या आत्मा

लोकशाहीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसह सहकारी संस्थांना फार मोठे महत्त्व असून, या संस्था लोकशाही बळकट करण्याचे काम करतात. त्या लोकशाहीच्या आत्माच आहेत. राजकारणाचे बाळकडू याच माध्यमातून मिळतात आणि एखादे नेतृत्व याच संस्थांमधून उदयास येत असते. यामुळे या संस्थांच्या निवडणुका होणे महत्त्वाचे आहे.


प्रशासक नियमानुसार काम करतात. बदली होणार मी काय या ठिकाणी कायमस्वरुपी नसणार आहे, ही भावना त्यांच्या मनात असल्याने ते लोकहित जपत नाहीत. जीआर आणि नियमांवर बोट ठेवून कामे करतात. यामुळे सहकारी संस्थांशी संबंधित व्यक्ती आणि इतर घटकांना वेळेत न्याय देता येत नाही. संचालक मंडळ मार्ग काढून ठराव करुन एखादी अडचण दूर करु शकते.

**- सुरेश हसापुरे,**
माजी उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर


जबाबदारी घेतल्यानंतर मूलभूत सोयीसुविधा देण्याबरोबरच सहा सेल हॉलची गळती थांबविणे, रस्ते, सुरक्षा, स्वच्छतेबरोबरच सेस गळती शंभर टक्के बंद केली. ३ कोटी ७० लाख रुपये शेतकऱ्यांचे अडकलेले पैसे दिले. साडेपाच कोटी सेसमध्ये वाढ झाली. बाजार समितीमधील अतिक्रमणाला पायबंद घातला. यापुढेही व्यापारी, शेतकऱ्यांचे हित व प्रगतीसाठी काम करणार आहे.

**- मोहन निंबाळकर,**
प्रशासक, श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर


निवडून दिलेल्या लोकांविषयी संचालकांच्या मनामध्ये तळमळ असते. यामुळे त्यांना मदत करण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेत असतात. संचालक असो वा प्रशासक हित जोपासत प्रगतीचा आलेख चढता ठेवला पाहिजे. केवळ कामापुरते काम करुन वेळ मारुन नेऊ नये.

**- बसवराज इटकळे,**
माजी संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर


प्रशासकामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वाचली. निवडणूक होऊन चुकीचे संचालक आले की बँक पुन्हा अडचणीत येईल. बँकेला वाचविण्यासाठी प्रशासकाचीच गरज आहे. त्याच पद्धतीने जिल्हा दूध संघासाठी एक चांगला प्रशासक येण्याची गरज आहे. याशिवाय या संस्था टिकू शकणार नाहीत.

**- राजेंद्र राऊत**
माजी आमदार, बार्शी विधानसभा मतदारसंघ

# रंगोत्सवात चिंब-चिंब न्हाले सोलापूरकर!

## ● लोधी समाजाने पारंपारिकता जपत काढली रंगगाड्यांची मिरवणूक ● आबालवृद्धांसह मुलींनी, महिलांनी व दिव्यांगानी उधळले सप्तरंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

उत्सव प्रिय शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात आज रंगपंचमीचा मोठा उत्सव आणि उत्साह पर्व दिसून आला. मध्यवर्ती बाजारपेठेपासून सुरू झालेला रंगोत्सव विविध चौकाचौकात, गल्लीबोळात आणि मोठमोठ्या कॉलनीत उत्साहाच्या भरती ओहोटीने साजरा झाला. शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठा मधला मारुती, टिळक चौक येथे सकाळी इको फ्रेंडली रंग घेण्यासाठी आबालवृद्धांची एकच गर्दी झाली होती. पारंपरिक रंगपंचमीचा हा सण इको फ्रेंडली रंगांनी साजरा झाला. सप्तरंगी रंग आकाशात उधळून बच्चे कंपनीने रस्त्यावर कॉलनीमध्ये रंगांचा धुमधडाका साजरा केला.

नुकतीच दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षा संपली असून, त्याचा आनंद विद्यार्थ्यांनी रंगोत्सवातून साजरा केला. परीक्षेचे कालावधी अत्यंत तणावात गेल्यानंतर रंगांचा हा सण उत्साहात साजरा झाला. मित्र कंपनीने एकमेकांना कोरडा रंग तसेच ओला रंग लावून ''बुरा ना मानो होली है ! हॅपी होली'' म्हणत शुभेच्छा दिल्या. तर बच्चे कंपनीने देखील पिचकारीच्या साह्याने एकमेकांवर रंगांची मुक्त उधळण केली. यावेळी सारे वातावरण सप्तरंगमय झालेले दिसून आले. त्याचपद्धतीने शहरातील भवानी पेठ, कर्णिक नगर, नवीपेठ, मराठागल्ली, काशीकापडी गल्ली, कुंभारवेस, चाटीगल्ली, मधला मारुती, टिळक चौक, दत्त चौक, सम्राट चौक, महेश सोसायटी, प्रभाकर सोसायटी, जुळे सोलापूर, विजापूर रोड परिसर, अशा विविध ठिकाणी रंगपंचमीचा दणदणीत उत्सव साजरा केला गेला. डॉल्बीच्या तालावर अनेकांनी फेर धरला. तर काहींनी पाण्याचा फवारा मारून रंगात आनंद आणला.



रंगपंचमीनिमित्त शहरातील बाजारपेठा बंद होत्या. त्यामुळे नवीपेठ येथे सर्व रस्ते निर्मनुष्य दिसून आले. बाजारपेठेतील दुकानदार कामगार यांनी देखील रंगोत्सवात सहभाग नोंदवला. वर्षातून एकदा येणाऱ्या रंगपंचमीनिमित्त दुकाने बंद ठेवून रंगपंचमीचा आनंद लुटला. महिलांनीही एकमेकींच्या कॉम्प्लेक्समध्ये जाऊन एकमेकींना रंग लावून शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रौढांनी देखील आपल्या मित्र बांधवांना रंग लावत रंगपंचमीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सारे वातावरण रंगीतमय झालेले होते.

त्याचप्रमाणे कर्णिक नगर येथील जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रामध्ये देखील रंगपंचमीचा उत्साह दिसून आला. येथे शिक्षण घेणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांसोबत शिक्षक वृंदांनी रंगपंचमी साजरी केली. अंध आणि अपंग विद्यार्थ्यांना रंग लावून सप्तरंगांची ओळख करून दिली. आनंदमय वातावरणात रंगपंचमीचा सण साजरा करून गोडाधोडाचे मिष्ठांन्न देण्यात आले. यावेळी अंध व अपंग प्रौढ विद्यार्थ्यांनी रंगपंचमीचा सण उत्साहात साजरा केल्याचे सांगितले. आपल्या परिवारापासून दूर असणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्याची व आनंदाची लकेर दिसून आली. दरम्यान, आपल्या परिवारापासून दूर असणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांना प्रत्येक सणसमारंभात सामावून घेऊन उत्साहात रंगपंचमीचा सण साजरा केला जातो. त्यांच्या कुटुंबाची आठवण येऊ नये, यासाठी विविध उपक्रम पुनर्वसन केंद्रात आयोजित केले जातात अशी माहिती अधीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले. एकंदरीत शहराच्या विविध भागात रंगपंचमीचा उत्साह कायम होता. मात्र वाढत्या उन्हामुळे शहरवासीयांनी कमी कालावधीसाठी रंग खेळण्यास पसंती दर्शवल्याचे दिसून आले.

**लोधी समाजाची रंगगाड्यांची मिरवणूक**

गेल्या अनेक वर्षांपासून रंगपंचमी सणानिमित्त निघणारी लोधी समाजाची शंभर रंगगाड्यांची मिरवणूक निघाली. श्री बालाजी मंदिरात श्रींची आरती करून मिरवणुकीला दुपारी सुरुवात झाली. त्यानंतर खऱ्या अर्थाने शंभर बैलगाडीच्या माध्यमातून समाज बांधवांवर सप्तरंगांचा वर्षाव केला जातो. शहरातील तसेच आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून १०० बैलगाडी मागवले जातात. मंदिरातील श्रींची आरती संपन्न झाल्यानंतर, बेडर पूल येथून मिरवणुकीस मोठा उत्साहात सुरुवात झाली. समाजाचे अध्यक्ष श्री बालाजी मंदिराचे अध्यक्ष व ट्रस्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही मिरवणूक मार्गस्थ झाली. भल्या मोठ्या पिचकारीच्या माध्यमातून एकमेकांवर रंगांची उधळण करण्यात आली.

### मुस्लिम बांधवांनी जपली एकात्मिक भावना

लोधी समाजाच्या वतीने सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षीही रंगपंचमी निमित्त रंगगाडी मिरवणूक काढण्यात आली होती. बैलगाडीत रंगांचे टीप ठेवले गेले, त्यातून समाज बांधवांवर सप्तरंगांचा वर्षाव करत सदरची मिरवणूक पुढे मार्गस्थ होत होती. जेव्हा ही मिरवणूक शास्त्री नगर परिसरात आली, तेव्हा एक वेगळेच चित्र दिसून आले. मुस्लिम बांधवांनी या पारंपारिक रंगगाडी मिरवणूकीवर पुष्पवृष्टी करून सणाचा आनंद द्विगुणित केला. वाहिद विजापुरे आणि त्यांच्या मित्र परिवाराकडून गुलाब पुष्प उधळून मिरवणुकीचे जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत केले. यावेळी विजापूर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना हिंदू-मुस्लिम हम सब एक है ! लहानपणापासून लोधी समाज बांधवांची निघणारी रंगगाडी मिरवणूक ही एक वेगळ्या प्रकारचे आकर्षण होते. हिंदू-मुस्लिम बांधवांचा सण एकत्रितपणे आम्ही साजरा करत आहोत. यामध्ये कोणताही रंग कुठल्या समाजाचा नसून सर्वधर्मसमभाव आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.तर माजी नगरसेवक भारतसिंग बडरूवाले यांनी देखील आपले आपल्या भावना व्यक्त करताना या माध्यमातून मुस्लिम समाज बांधवांनी एकोपा जपला आहे. सुमारे दीडशे वर्षांच्या रंग गाड्यांच्या मिरवणुकीला अनोखी परंपरा आहे. परंपरा आज तागायत चालू असून, याचे स्वागत मुस्लिम बांधवांच्या वतीने होत आहे. याहून आनंदाचा क्षण नाही. आम्ही सर्वजण एकत्र आहोत. मुस्लिम बांधवांच्या या स्वागतासाठी आम्ही आभारी आहोत. असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६१

**विश्व रागें झालें वन्ही।**
**संती सुखें व्हावें पाणी।।**

चांगल्या तसेच सरळ माणसाला लोक अकारण त्रास देत असतात. दुसऱ्यांना त्रास देऊन आनंद मिळवणाऱ्यांची संख्या कमी नाही. कारण नसतानाही काहींची छेडछाड केली जाते. समोरच्याला चिडवून, डवचून त्याची खोडी करून त्याला रागावण्यास भाग पाडण्यातही काहींना आनंद वाटतो. असे लोक संत, सज्जनांनाही सोडत नाहीत. खरे म्हणजे खूप काही सहन करून तसेच बऱ्याचशा सुख, सुविधांचा त्याग करून संतत्व प्राप्त झालेले असते. तरीही पुन्हा-पुन्हा स्वार्थी, अहंकारी लोकांच्या त्रासाला तोंड देण्याची वेळ संतावर येते. श्री ज्ञानेश्वर महाराजही यास अपवाद राहू शकले नाहीत. कसल्याही प्रकारची कोणाची हानी न होऊ देता व नम्रपणे वागत असतानाही त्यांना काही अहंकारी पंडितांच्या क्रुर स्वभावी वृत्तीचा शिकार व्हावे लागले. सहनशीलता संपल्यात जमा झाल्याने नाराजी विचारात स्वतःला गुरफटून घेऊन ज्ञानदेव बसले. तेव्हा मुक्ताई त्यांना नकारात्मक व नाराजी विचारातून बाहेर काढताना म्हणाली,

**विश्व रागें झालें वन्ही।**
**संती सुखें व्हावें पाणी।।**

दादा, आपला दोष नसतांनाही लोक अकारण छेडतात, आपल्यावर रागावतात, संन्याशाची पोरं म्हणून त्रास देतात. आपणास त्रास सहन करून घेण्याशिवाय पर्याय नाही. हे लोक दगडाप्रमाणे आहेत. आपणास ठेच लागली म्हणून जर आपण त्या दगडास लाथ मारण्याचा प्रयत्न केला तर दगडाला काही होणार नाही, उलट आपणासच त्रास होईल. दादा, या लोकांसहीत आपणास जगाचे कल्याण करायचे आहे. हे आपले कर्तव्य आहे. यांना विरोध करून, शिक्षा देऊन नाही तर शिक्षण देऊन नीट करायचे आहे. हे



लोक जरी क्रोधी असले, आग ओखत असले, तरीही आपण आग, क्रोध भडकवण्यासारखे न वागता व स्वतःवर राग न काढता शांत चित्ताने पाण्यासारखे थंड, निर्मळ वागायला हवे. आपणही यांच्याप्रमाणे वागू लागलो तर यांच्यात आणि आपल्यात काय फरक राहिल. मुक्ताईचे हे बोल ज्ञानदेवांसाठी तर होतेच, पण काही प्रमाणात का होईना आपल्यासाठीही आहेत. अर्थात, प्रसंगानुरूप माघार घेणे, प्रसंगाला शांत चित्ताने सामोरे जाणे हे बहुतांश वेळी योग्यच असते. अन्यायाविरुध्द लढले पाहिजे, हे खरे असले तरीही विरोधापेक्षा काही पर्याय आहे का? याचाही शोध घेतला पाहिजे. मुक्ताईने ज्ञानदेवांना नाराजीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला नसता तर आपण ज्ञानापासून बरेच दूर राहिलो असतो. थोडक्यात ज्ञानदेवादी भावंडांनी विविध ग्रंथांच्या माध्यमातून जे ज्ञान उपलब्ध करून दिले आहे, त्या ज्ञानाचा मुक्ताई आधारस्तंभ आहेत, असे म्हटले तर योग्यच होईल.

जय जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २० मार्च २०२५ | संत एकनाथ षष्ठी, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | विषुव दिन, |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. षष्ठी (२६.४५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अनुराधा (२३.३०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वज्र (१८.१८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (१३.४३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष द्या.

**वृषभ :** अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

**मिथुन :** आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**कर्क :** व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रमात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

**सिंह :** शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कन्या :** विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

**तुळ :** कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

**वृश्चिक :** कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षमतेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

**धनु :** धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** चांगल्या व्यक्तींचा संप ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल. मानसिक ताण कुटूंबाचा खूप राहील. आर्थिक फटका बसेल.

**कुंभ :** व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मीन :** रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल.

# महिलांचा सन्मान हा अविस्मरणीय क्षण

### ज्येष्ठ समाजसेविका यशोदाबाई डागा यांचे प्रतिपादन

### ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने ५० वीरशैव वकील महिलांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

संस्थेने सभागृहात शहरातील पन्नास वकिल महिलांना एकत्र आणून जो आगळा वेगळा सोहळा घडवून आणला आणि माझ्या हातून वकिल महिलांचा जो सन्मान करण्यात आले ते अविस्मरणीय क्षण आहे, असे विचार वीरशैव ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने जागतिक महिलादिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला बालविकास प्रकल्पातील विधी व परिविक्षा अधिकारी ॲड. सारिका कोरे-हुक्केरी यांच्यासह ५० महिला वकिलांच्या गौरव समारंभात बोलताना ज्येष्ठ समाजसेविका यशोदाबाई डागा यानी व्यक्त केले.

अक्कनबळगचे रंजिता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या समारंभात व्यासपीठावर ॲड. आर. एस. पाटील, निलेश ठोकडे, एस.आर.पाटील, मल्लिनाथ विभूते, आप्पासाहेब कनाळे, सिदराया दुलंगे, लिलावती मडकी, ताराबाई कोनापुरे, शांताबाई मरगूर, मंगला कोनापुरेख संस्थाध्यक्ष नीलकंठप्पा कोनापुरे, कार्याध्यक्ष राजेंद्र मायनाळ उपस्थित होते.

रमा कनाळे यांच्या भक्तीगीतानंतर अतिथींनी श्री सिध्दरामांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन केले. संस्थाध्यक्ष नीलकंठप्पा कोनापुरे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी ॲड. नंदिनी किणीकर, नेहा ठोकडे, सरोजिनी तमशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सपना पाटील यांनी केले. आभार शांताबाई मरगूर यांनी मानले. समारंभास सर्वश्री सिध्देश्वर बमणी, काशिनाथ दर्गोपाटील, विजयकुमार थळंगे, नष्टे, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. निराळे, नागनाथ लिगाडे, सुभाष कुलकर्णी, सचिन सोळसे यांनी परिश्रम घेतले.

# सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या बिझनेस मीटमध्ये गुंतवणूक वाढीबाबत झाली चर्चा

### भारत मर्चंट चेंबरचे अध्यक्ष नरेंद्रभाई पोद्दार यांची एकत्रित काम करण्याची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च -**

येथील सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज व एग्रीकल्चरच्यावतीने भारत मर्चंट चेंबरसोबत झालेल्या बिझनेस मीट मध्ये सोलापूरात अत्याधुनिक सुत गिरणीच्या उभारणीसह गुंतवणूक वाढीबाबत चर्चा करण्यात आली.





यावेळी भारत मर्चंट चेंबरचे अध्यक्ष नरेंद्रभाई पोद्दार व त्याचे १५ सहकारी, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, सचिव धवल शहा, माजी आमदार नरसिंग मेंगजी, प्रवक्ता पशुपति माशाळ, चेंबरचे उपाध्यक्ष मनोज जलान, सदस्य विजय लोहीया, उद्योजक रतन पोद्दार, संचालक गिरीश देवरमणी, शैलेश बच्चूवार, सुकुमार चंकेश्वरा, कौस्तुभ करवा, चेतन बाफना, ताराचंद आहुजा, प्रकाश कलकोटे, दयासागर सालुटगी, संतोष आकुल, रामप्रसाद दरगड, सोलापूर कापड व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरज राठी, इंदरलाल होतवाणी, महेंद्र कटारिया, सोलापूर कंझ्यु. असो.चे विनोद अग्रवाल, हर्षवर्धन शहा, सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघाचे सहखजिनदार व भाजपा उद्योग आघाडीचे अध्यक्ष अंबादास बिंगी, ,पंचरूढ कापड संघाचे नितीन चव्हाण, गिरीश पवार, राजू दर्बी, आनंद मेंगजी, श्री.झाड, प्रशांत राठी, तसेच रेडिमेड गारमेंटचे प्रतिनिधी उपस्थित होते

सोलापूर चेंबरचे सचिव धवल शहा यांनी स्वागत केले. अध्यक्ष राजू राठी यांनी नरेंद्रभाई पोतदार यांचा परिचय करून दिला. भारत मर्चंट चेंबरच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सोलापुरात गुंतवणूक करून सहकार्य करावे व सोलापूरात अत्याधुनिक सुत गिरणी उभारण्यात आणावी तसेच येथील टेरीटॉवेल व रेडीमेड उत्पादकांना जॉबवर्कवर काम द्यावे असे आवाहन केले. माजी आमदार मेंगजी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. भारत मर्चंट चेंबरचे अध्यक्ष नरेंद्रभाई यांनी येथून पुढे व्यावसायिक संबंध वृद्धिंगत करून एकमेकांच्या सहकार्याने भविष्यात व्यापारवृद्धी, व्यावसायिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी पूर्णतः सहकार्य भावनेने एकत्रित काम करू असे जाहीर केले. यावेळी नरेंद्रभाई पोद्दार व त्यांचे सर्व सहकाऱ्यांचा टेरीटॉवेल व टॉवेल बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पशुपती माशाळ यांची फाम या संस्थेचे उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे सत्कार करण्यात आला. श्री माशाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# युगंधर फाऊंडेशनतर्फे आजपासून पर्यावरण सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

युगंधर फाऊंडेशच्या वर्धापन दिनानिमित्त पर्यावरण सप्ताहाचे आयोजन २० ते २६ मार्च दरम्यान पर्यावरण सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार आहे.



यामध्ये २० मार्च जागतिक चिमणी दिन, २१ मार्च वन दिन, २२ मार्च जल दिन, २३ मार्च जागतिक हवामान दिन या दिनाचे औचित्य साधून विविध उपक्रमाचे आयोजन सोलापूर जिल्हा तसेच परिसरात करण्यात येणार आहे. संस्थेच्या माध्यमातून चिमणी दिनाच्या निमित्ताने मोफत चिमण्यांच्या घरट्यांचे वाटप तसेच वन दिनाच्यानिमित्ताने वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा प्राध्यापक रेश्मा माने यांनी दिली. युगंधर फाउंडेशनच्या वतीने लवकरच सोलापूरमध्ये निसर्ग अभ्यास केंद्राचे उद्घाटन करून शहर आणि जिल्ह्यात पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या युवकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मानस या केंद्राच्या माध्यमातून असल्याची माहिती संस्थेचे सचिव प्रियदर्शी माने यांनी दिली. युगंधर फाउंडेशन या बहुद्देशीय संस्थेची स्थापना २१ मार्च २०१६ रोजी प्राध्यापक रेश्मा माने यांनी केली संस्थेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम मागील नऊ वर्षापासून सोलापूर जिल्हा तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये राबविले जातात. पर्यावरण क्षेत्रामध्ये युगंधर फाऊंडेशन सोलापूरचे कार्य भरीव स्वरूपात आहे फाऊंडेशनच्या माध्यमातून पर्यावरण जनजागृतीचे आणि पर्यावरण रक्षणाचे विविध उपक्रम संस्थेने वेळोवेळी राबविले आहे.

# सर्वकष लैंगिकता शिक्षण विषयावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

प्रिसिजन फाउंडेशन सोलापूर, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शहर व जिल्ह्यातील २४ शाळेतील ४४ शिक्षक तर दहा सामाजिक संस्थांच्या २० प्रतिनिधींची सर्वंकष लैंगिकता शिक्षण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन श्रीमती गोपाबाई दमानी रक्त संकलन केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले.






प्रिसिजन फाउंडेशनच्या सहाय्यक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी डॉ. राजीव प्रधान, डॉ. शिरीष कुमठेकर, प्रा. डॉ. एन. बी तेली, आयेशा रंगरेज, अविनाश पाटील, डॉ. विजया महाजन, अश्विनी लोणी, सचिन अंबलगी, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात सायबर क्राईम विषयी अविनाश पाटील यांनी माहिती दिली. डॉ. राजीव प्रधान यांनी किशोरवयीन मुला मुलीं करिता गर्भाशयाचा कॅन्सर रोखण्यासाठी एच.पी. व्ही. व्हॅक्सिनेशनचे महत्व विषद केले. कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी उपस्थित शिक्षक व सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधीं करिता ग्रुप वर्कच्या माध्यमातून सर्वंकश लैंगिकता शिक्षण प्रकल्पातील प्रशिक्षकांची भूमिका व कार्य स्पष्ट केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ञ तथा अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान कोल्हापूरच्या अध्यक्षा डॉ. गौरी कहाते यांनी किशोरावस्थेतील होणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावनिक बदलांविषयी माहिती सांगितली.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.




**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक :- (८३) जीवित कर्तव्य

श्री गुरुजी प्रवासात एका शिक्षणाधिकाऱ्याकडे गेले होते. तिथे त्यांचा मुलगा गुरुजींना म्हणाला जन्माष्टमी का साजरी करतात. आम्हाला शाळेत शिकवतात, हा कृष्ण व्याभिचारी होता. त्यापेक्षा येशू ख्रिस्ताचा जन्मदिन पाळा. गुरुजी म्हणतात असा प्रश्न एक आठ नऊ वर्षाचा मुलगा विचारेल अशी आपण कल्पना तरी करू शकतो का ? जीवन हे वासना आणि विकार यांचे केवळ गाठोडे नाही तर आपल्यात जे एक शिवतत्व आहे, त्या तत्त्वाचे ज्ञान व त्याचे प्रकटीकरण हे हिंदू शिक्षण पद्धतीचे मूलभूत उद्दिष्ट असले पाहिजे. हे ध्यानी धरूनच संघ स्वयंसेवकांनी रामायण, महाभारत किंवा आपल्या इतिहासातील राष्ट्रीय महापुरुषांचे स्मरण करून देणारे प्रसंग शाखेत किंवा विविध शाळेत, महाविद्यालयात सांगणे - शिकवणे आवश्यक आहेत. भारताची ओळख ही तिची सांस्कृतिक विरासत आहे. याचा अर्थ भारत निर्माणात ऋषी-मुनी, संत- महंत, आचार्य धर्माचार्य, दर्शनीक, ज्ञानी- विज्ञानी, शिक्षक, सेवा देणारे, ध्येयप्राप्तीसाठी झटणारे या सर्वांचा हात आहे. त्यांचे स्मरण करून त्यांचे दर्शन घडवणे हे आपले जीवित कर्तव्य समजावे. आपल्या पंतप्रधान मोदींनी२०२२च्या स्वातंत्र्यदिनी जे पाच प्रण सांगितले त्यातील दोन इतिहास विषयकच आहेत. (१) गुलामी के एहसास का कोई अंश ना रहे (२) हमे अपनी विरासत पर गर्व हो आणि हे दोन्हीही प्रण गुरुजी नेहमीच सांगत असत.

**क्रमशः**

# एक खिळा आणि ९० वर्षांचे पुण्य !





एका संध्याकाळी सांगोल्याच्या एका अस्थिरोग तज्ञाचा फोन आला. त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीच्या दहा वर्षांच्या मुलाला खूप तीव्र त्रास होत होता. त्याची पाठ अचानक असह्य दुखायला लागली होती. गोळ्यांचा काहीच उपयोग होत नव्हता. त्यांनी त्याला एका बालरोग तज्ज्ञाकडे पाठवले. पण त्याचा त्रास प्रत्येक तासागणिक वाढत होता. आता त्याला दर मिनिटाला संपूर्ण शरीराला मरणप्राय वेदनांचे अटॅक येत होते व त्याचे हात पाय दगडासारखे कडक होत होते. आता मात्र सांगोला येथील त्या अस्थिरोग तज्ज्ञाने त्याला सी एन एस हॉस्पिटलला हलवण्याचा निर्णय घेतला होता.

सांगोल्याहून येथे आल्यावर रात्री एक वाजता पाहायला गेलो. त्याला पाहिल्यावर एका क्षणात मी निदान केले पण त्या निदानाने माझ्याच हृदयाचा ठोका चुकला. प्रचंड पाठदुखीच्या अटॅकमध्ये त्याचे शरीर धनुष्यासारखे होत होते. जबडे घट्ट होऊन आ करता येत नव्हते. आजच्या काळात हा आजार दिसणे अशक्य नव्हे पण हा सोडून दुसरा आजार शक्य नव्हता. या दुर्दैवी मुलाला धनुर्वात झाला होता!! मी वडिलांशी बोललो. त्याला पंधरा वीस दिवसांपूर्वी एक खिळा टाचेत घुसला होता आणि आज त्याची आज ही हालत झाली होती. फक्त कानात आवाज पडला किंवा डोळ्यात लाईट पडली तरी त्याला तीव्र स्पाझम येत होते. या स्पाझम मुळे त्याचा श्वास कमी होत चालला होता. त्याला आम्ही ताबडतोब व्हेंटिलेटरवर घेतले. त्याच्या डोळ्यांवर पट्टी लावली, कानात कापसाचे बोळे घातले. शरीराचे स्पाझम कमी करण्यासाठी त्याला विविध प्रकारचे paralysing औषधे चालू केली. Claustridium Tetani नावाचा जंतू ज्यामुळे त्याला हा आजार झाला होता, त्याच्यासाठी metronidazole नावाचे अँटिबायोटिक चालू केले.

आजारामुळे त्याच्या हृदयाच्या क्षमतेवर परिणाम चालू झाला होता. utonomic dysfunction या कॉम्पलिकेशनमुळे त्याच्या मृत्यूची दाट शक्यता होती. विशेष म्हणजे एवढ्या मरणप्राय वेदनेमध्ये तो संपूर्ण शुद्धीवर होता. मी त्याच्या आई वडिलांशी या आजाराबद्दल डिटेल चर्चा केली. या आजाराची सुधारणा फार सावकाश होते. काही आठवडे लागू शकतात. या काळात हृदयामध्ये ठोके चुकून किंवा न्युमोनियामुळे त्याचा मृत्यूही होऊ शकतो, हे त्यांना सांगितले. या केसमध्ये संयमाची गरज असल्याचे त्यांना सांगितले. ट्रीटमेंटमुळे त्याच्यात हळूहळू सुधारणा होऊ लागली. पण एक दिवशी अचानक त्याची हृदयगती थांबली. काही क्षणात आमची कोड ब्लू टीम ॲक्टिवेट झाली व cardiopulmonary resuscitation करून त्याचे हृदय लगेच चालू केले. परिस्थिती अत्यंत खालावलेली असूनही आम्ही धीर सोडला नाही. सुदैवाने हळूहळू पुन्हा त्याच्या परिस्थितीत सुधारणा होत गेली व जवळजवळ सव्वा महिन्यांनी त्याचा व्हेंटिलेटर यशस्वीपणे काढला. कालांतराने संपूर्ण सुधारणा करून त्याला डिस्चार्ज दिला.

प्रत्येक आयुष्य महत्त्वाचे आहे. एखाद्या ८० वर्षाच्या रुग्णाला जर वाचवले, तर त्याचे आयुष्य आम्ही काही वर्षांनी वाढवतो. पण एका १० वर्षाच्या मुलाचे जीव वाचवणे म्हणजे जवजवळ ९० वर्षांचा बोनस मिळतो. आजच्या जमान्यात सर्वत्र लसीकरण होत असताना धनुर्वातासारखा आजार फार दुर्मिळ आहे, पण त्याचे योग्य निदान व अचूक उपचार यामुळे माझ्या या छोट्या पेशंटला मला चालत घरी पाठवताना झालेला आनंद अवर्णनीय होता. टीम सीएनएसला आज ९० वर्ष वय वाढवण्याचे पुण्य मिळाले होते. या केसच्या ट्रीटमेंटमध्ये मला सीएनएस हॉस्पिटलच्या पर्शीश्रळसळीं डॉ. मधुरा विभुते आणि बालरोगतज्ञ डॉ. अतुल झवर यांची देखील साथ लाभली.

**- डॉ प्रसन्न कासेगावकर**
**सीएनएस हॉस्पिटल,**
**सोलापूर**

## संक्षिप्त वृत्त



### बणजगोळ गावात सिद्धी समाधी योग ग्राम शिबीर

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील बणजगोळ गावात सिद्ध समाधी ग्राम शिबीराचे आयोजन आले होते. यावेळी श्री ऋषी संस्कृती विश्या केंद्र बेंगलोरचे योगगुरु सुनिल गुरुजी बहुमोल मार्गदर्शन लाभले. या शिबीरातून ग्रामस्थांना शारिरीक, मानसिक, भावनिक सामाजिक व अध्यात्मिक विकास, जीवनातील कठीण समस्येतून सकारात्मक मार्ग काढणे तसेच ग्रामविकास संदर्भात गुरुजीनी मार्गदर्शन केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी सरपंच नागबाई व्हासुरे, तंटामुक्तीचे अध्यक्ष मल्लिनाथ पाटील, माझी सरपंच राम मातोळे, अरुण मुळे, महादेव मुळे, सचीन मचाले, सुरेश तळवार, उपसरपंच स्वाती चव्हाण, सुरेखा पाटील, संदीप शिंदे, श्रीशैल पाटील, किसन महाराज, राधिका शिंदे, रेवप्पा व्हसुरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी विठ्ठल पाटील, विश्वास मातोळे यांनी परिश्रम घेतले. किसन मोरे महाराज योनी भजन सेवा सादर केली. राम मातोळे, मालिनाथ पाटील, बाबासाहेब मातोळे, नागबाई व्हसुरे, महादेव मुळे, सुरेश पाटील, सचीन मचाले सुरेश तळवार, रामभाऊ शिंदे यांच्याकडून महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. माणिक चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. रावसाहेब राठोड यांनी आभार मानले.



### अभिनंदन प्री स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**अक्कलकोट, दि. १९ मार्च-**

अक्कलकोट शहरातील अभिनंदन प्री स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अलका जन्मेजय भोसले, अर्पिता अमोल भोसले, लायन्स क्लबचे विठ्ठल तेली, शिवशरण खुबा, सतीश पाटील, महेश पाटील, अमर पाटील, सागर दोशी, शिरीष पंडित, अरिजंय गांधी, सुखदा गांधी, अभिनंदन गांधी, राहुल गांधी, केतकी गांधी संजना गांधी, माजी मुख्याध्यापक बीजी शिंदे, अरविंद शिंदे, श्रीदेवी शिंदे आदींची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेतील प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनींचा प्रशस्तीपत्र व मेडल देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनींनी विविध मराठी, हिंदी गीतांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रास्ताविक श्रीदेवी शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन तेजस्विनी शिरसाट ,सरिता पाटील, अश्विनी महिंद्रकर, प्रियांका बिराजदार, गायत्री स्वामी यांनी केले. कार्यक्रमास साधना मोरे चौडेश्वरी बबलाद, मंजिरी बाग, आशा पाटील, आरती हळगोदे, स्वामीराव गायकवाड, प्रज्ञा गायकवाड, विजय माने, किशोर महिंद्रकर सतीश महिंद्रकर हरकुड, छकडे कुरले, मिनगले, जोजन, भस्मे, मलगोंडा, जमगे येरटे, कुंभार, येणगूरे , वाकडे, ढंगे, जकापुरे, भास्कर उपस्थित होते.



### प्रा. सुजाता भोरे यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार


**करमाळा, दि.१९ मार्च-**

करमाळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्रा. सुजाता भोरे यांनी महिला दिनाचे औचित्य साधून स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. सुजाता भोरे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल संस्थेचे सचिव मा. विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी अभिनंदन केले. हा पुरस्कार वितरण सोहळा उपमुख्यमंत्री कार्यालयाचे वैद्यकीय कक्षाचे राज्याचे प्रमुख मंगेश चिवटे साहेब यांच्या हस्ते व शिवसेना जिल्हाप्रमुख संस्थापक सेवा फाउंडेशनचे मनीष अण्णा काळजे यांच्या अध्यक्षतेखाली व सचिन जगतापसाहेब शिक्षण अधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद सोलापूर, सचिन चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

### माजी सैनिक कै. तुकाराम कांबळे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त व्याख्यान, वृक्षांचे वाटप

**करकंब, दि. १९ मार्च-**

करकंब येथे कै. तुकाराम बापू कांबळे (माजी सैनिक ) यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सोमवार दि. २४ मार्च रोजी सायं. ६ वाजता



सद्गुरू भजलिंग महाराज मठाच्या प्रांगणात ख्यातनाम व्याख्याते वसंत हंकारे यांचे व्याख्यान होणार असून सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये हभप गणेश बर्गे यांचे फुलांचे कीर्तन होणार आहे. यावेळी त्यांचे सुपुत्र धनाजी कांबळे यांचेवतीने करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीम तसेच करकंब येथील विविध शाळांना ३६५ विविध प्रकारच्या झाडांचे वाटप करण्यात येणार आहे. पर्यावरण रक्षणासाठी या झाडांचे वाटप करून कांबळे कुटुंबीय मा. सैनिक कै. तुकाराम कांबळे यांच्या स्मृति जपणार आहेत. व्याख्यान व वृक्षांचे वाटप कार्यक्रमासाठी करकंबमधील ग्रामस्थांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करकंब गावच्या लेकीचे झाड अभियान टीमचे संकल्प ज्ञानेश्वर दुधाणे व करकंब गावच्या लेकीचे झाड अभियान टीमच्यावतीने करण्यात आले आहे.

# विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या पूजेची ऑनलाईन नोंदणी

**कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती**

**दि. १ एप्रिल ते ३१ जुलै मधील पूजांची होणार नोंदणी**

**घरबसल्या करता येणार नोंदणी**

**चंदनउटी पूजेचा देखील समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मार्च -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. १ एप्रिल ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि.२५ मार्च रोजी स.११.०० पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

याबाबत मंदिर समितीच्या दि. ३ मार्च रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या



सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि. ७ ऑक्टोबर ते३१ डिसेंबर २०२४ व दुसऱ्या टप्प्यात दि.१ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता, तिसऱ्या टप्प्यात दि. १ एप्रिल ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, पाद्यपूजा व चंदनउटी पूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६-२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा.

> श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५ हजार, रू.११ हजार तसेच पाद्यपूजेसाठी पाच हजार - व तुळशी अर्चन पूजेसाठी रू.२१००/- तसेच श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या चंदनउटी पूजेसाठी अनुक्रमे रु.२१,०००/-, रू.९,०००/- इतके देणगी मूल्य आहे.

ग्रीष्मऋतूतील वाढत्या उन्हापासून श्रीविठुरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून पासून सुरुवात होत आहे, या चंदनउटी पूजेची नोंदणी देखील ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे, असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

## सोने, चांदीच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १९ मार्च-**

सध्या सोन्याच्या दराने एक लाख रुपयाकडे आगेकूच केल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. सोन्याच्या दरवाढीबरोबरच चांदीचे दरही वाढत आहेत. सध्या लग्नसराईचा हंगाम जोरात सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी सोन्याचा दर ६० ते ६२ रुपये इतका होता चालू वर्षात मात्र सोन्याच्या दर ८४ हजार रुपयांवर पोहोचला होता तो आता ९० हजार रुपयांवर गेला आहे.

सोन्याचे दर गगनाला भिडल्याने सर्वसामान्य कुटुंबातील वधू पित्याचे बजेट एकदमच कोलमडले जात आहे. सध्या लग्नाच्या बोलचालीत हुंडयाऐवजी सोन्याचीच बोलणी होते. लग्नात आपल्या मुलीला कोणता तरी दागिना प्रेमाने घालायचा अशी इच्छा वधुपित्याची असते परंतु वाढत्या दरवाढीमुळे वधूपित्याला मात्र मोठी कसरत करावी लागत



> सोन्याचे दर वाढले असले तरी, आगामी लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर ग्राहकाकडून सोने खरेदी केली जात आहे. सोने चांदीच्या दरात वाढ झाली असली तरी खरेदीवर मात्र कमी प्रमाणात परिणाम झाला नाही. ज्यांच्याकडे पैसा आहे ते नागरिक बारामती, पुणे अशा मोठ्या शहराच्या ठिकाणी जाऊन सोने खरेदी करत आहेत.
>
> **- राजेंद्र वाशिंबेकर, ज्वेलर्स ,करमाळा**

आहे. घर पहावे बांधून आणि लग्न पहावे करून अशी आपल्याकडे म्हण आहे याचा प्रत्येय सर्वसामान्य नागरिकांना सोन्याच्या दरवाढीने अनुभवास येत आहे. गेल्या पाच वर्षात सोन्याच्या दरात ४२ हजारांची म्हणजेच दुप्पटीपेक्षा जास्त वाढ झाली आहे.सध्या सोन्याच्या दराने ९० हजारच्या टप्पा ओलाडला असून,एक लाख रुपयेकडे वाटचाल सुरू केली आहे. चांदीच्या दराही लाखाच्यापुढे गेला आहे यामुळे सर्वसामान्य गोर गरीब नागरिकांना सोने खरेदी करणे म्हणजे मोठी अवघड बाब झाली आहे. सोने चांदीच्या वाढत्या बाजारभवामुळे बहुतांश गोरगरीब नागरिकांना सोन्याचे वाढते बाजारभाव एकूणच अंगाला घामाच्या धारा फुटत आहेत. जगभरात राजकीय अस्थिरता तसेच आर्थिक अस्थिरता निर्माण झाली आहे यामुळे बहुतांश नागरिक आपल्याजवळील गंडगंज संपत्ती सुरक्षित राहावी यासाठी सुरक्षित गुंतवणूक म्हणून जगभरातील अनेक देश सोन्याला पसंती देत आहेत त्यामुळे सोन्यासह चांदीचे दरही कमालीचे वाढले आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये अनादी काळापासून सोन्याला अतिशय मोलाचे स्थान दिले जात आहे. यामुळे मुलीच्या लग्नात मुलीचे वडील आपल्या ऐपतीप्रमाणे मुलीसाठी सोन्याचे दागदागिने कसल्याही परिस्थितीत करतातच.सध्या सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिली जाते तसेच अडचणीच्या काळात सोने गहाण ठेवून पैसे उपलब्धही होतात. वाढत्या महागाईच्या काळात सोने खरेदी करणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत परंतु सोन्याचे दर आणखी वाढतील म्हणून ग्राहक थोडे थोडे सोने खरेदी करत आहेत. सरलेल्या वर्षात (२०२४)सोन्याचे दर उच्चांकी पातळीवर गेले होते मात्र तरीही, भारतातील नागरिकांनी ८०२ . ८ टन सोने खरेदी केले असल्याची माहिती जागतिक सुवर्ण परिषदेने दिली आहे. आगामी लग्नसराईचा लग्नसराई सोहळे मोठ्या धुम धडाक्यात उत्साहात साजरे होत आहेत.

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे आरटीएस परीक्षेत यश

**पिलीव, दि.१९ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाच्या विदयार्थीनी २०२४-२५ मध्ये झालेल्या आर टी एस परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले. या परीक्षेसाठी विद्यालयातील ७९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी पाच विदयार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले. यामध्ये (१) घोंगडे धनश्री माधव १५४ गुण,(२) यादव रुद्र सोमनाथ १५२ गुण (३) पाटील राजवर्धन सचिनकुमार १४६ गूण, (४) जगदाळे समृद्धी अभय १४४ गुण (५) वाघ सार्थक शहाजी १३४ गुण हे विदयार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक शिवाजी कापसे, पर्यवेक्षीका मोरे, वरिष्ठ लिपिक भोरकडे, विभाग प्रमुख आठरे, सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे स्थानिक स्कूल कमीटीने अभिनंदन केले.

## झिंजेवस्ती येथे तुकाराम महाराज बिज साजरी

**पिलीव, दि. १९ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील लहु पाटील यांच्या निवास्थानी दरवर्षी प्रमाणे यंदाही तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बिजोस्तव निमीत्त पिलीव येथील सुनिल सुतार व त्यांच्या भजनी मंडळाने भजनाचा कार्यक्रम सादर केला. यावेळी विठोबा रुकमाई अन ज्ञानोबा तुकारामाचा निनाद घूमला. यावेळी लहु पाटील व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते आरती करणयात आली. यावेळी पिलीव, झिंजेवस्ती, चांदापुरी येथील भाविक भक्त गण मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## पोषण आहाराची तालुकास्तरीय सुसंवाद सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत तालुक्यातील ५० शाळा सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट) शासन नियुक्त सोसायटी फॉर एज्युकेशन इन व्हॅल्यू अँड ॲक्शन (सेवा) छत्रपती संभाजीनगर या संस्थेकडून करण्यात आले होती. त्या अनुषंगाने शाळास्तरावर तपासणीदरम्यान आढळलेल्या मुद्यांचे वाचन करुन त्यावर संवाद साधण्यासाठी तालुकास्तरीय जनसुनावणी मंगरुळे प्रशाला अक्कलकोट येथे आयोजित करण्यात आली असून यामध्ये विविध मुद्यांवर सखोलपणे चर्चा करुन योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत सूचना देण्यात आल्या.

सदर जनसुनावणीस गटशिक्षणाधिकारी अरबाळे, अधीक्षक सोमशेखर स्वामी, केंद्रप्रमुख धडके, मुख्याध्यापक कदम, पंडित गुरव, सोसायटीचे अधिकारी थोरात, भोसले, गायकवाड व तालुक्यातील सोशल ऑडिट झालेले सर्व मुख्याध्यापक उपस्थित होते. या जनसुनावणी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अभिजीत सुर्डीकर यांनी केले.

## डॉ. पालके यांच्या मुलाखतीचा विद्यार्थ्यांना लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ मार्च-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे प्रा. डॉ. राहुल भगवान पालके यांची प्रसार भारती आकाशवाणी सोलापूर व धाराशिवमार्फत सेट व नेट परीक्षासंबंधी मार्गदर्शनपर मुलाखत संपन्न झाली. ही मुलाखत एफएम १०३. ४ व एफ एम १०१. ३ मेगाहर्टझ वर प्रसारित झाली. या मुलाखती दरम्यान त्यांनी सेट व नेट परीक्षेचे स्वरूप, पात्रता, अभ्यासक्रम, वयोमर्यादा, संदर्भ पुस्तके इ. संबंधी माहिती विचारण्यात आली. सेट व नेट परीक्षांचे व्यक्तीगत अनुभव यावर बोलताना त्यांनी श्री शिवाजी महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालय, कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व इंग्रजी विभागाचे योगदान स्पष्ट केले.वृत्तपत्रे व मासिके यांची या परीक्षेत कशी मदत होते यावरही त्यांनी प्रकाश टाकला आहे. या मुलाखती दरम्यान त्यांना १५ प्रश्न विचारण्यात आलेले होते. या प्रश्नांची त्यांनी उत्कृष्टपणे उत्तरे देऊन विद्यार्थ्यांमध्ये सेट व नेट तसेच स्पर्धा परीक्षाविषयी आत्मविश्वास निर्माण केलेला आहे. पालके हे एकूण पाच विषयात मराठी, हिंदी इंग्रजी अर्थशास्त्र व वुमेन स्टडीज या विषयात नेट उत्तीर्ण असून दोन विषयात इंग्रजी व मराठी या



विषयात त्यांचे सेट झालेले आहे. एकूण सोळा वेळा सेट व नेट ही परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केलेली आहे. या मुलाखती दरम्यान त्यांनी इंग्रजी विषयाच्या ट्रिक्स सांगितलेल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाबाबतची भीती कशी दूर करता येईल यासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. मार्गदर्शन करताना त्यांनी परीक्षेच्या ट्रिक्स कशा लक्षात घ्याव्यात यावरही विशेष भर दिलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये अनाठायी व अनावश्यक असलेली इंग्रजी व गणित या दोन विषयांची भीती दूर कशी करता येईल हे याप्रसंगी सांगितले. या मुलाखतींचे मार्गदर्शक सुजीत बनसोडे, विद्या जोशी व किशोर पवार हे होते. याप्रसंगी पालके यांचे विद्यार्थी आनंद लोंढे व स्वप्निल वाघमारे हे उपस्थित होते. त्यांच्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे अध्यक्ष डॉ. बी. वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार व सांस्कृतिक विभाग प्रमुख बापूसाहेब शितोळे, प्राचार्य डॉ. ए बी शेख, डॉ. समाधान पवार, सहकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# शिखर शिंगणापूरच्या यात्रेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**30 मार्च पासून यात्रा**

**गट विकास अधिकारी आबासाहेब पवार यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १९ मार्च-**

अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूरच्या मोठ्या महादेवाची यात्रा ३० मार्चपासून सुरू होत असून या यात्रेतील भाविकांना सोयी,सुविधा देण्यासाठी माळशिरस तालुक्याची प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली. यावेळी सहा गटविकास अधिकारी किरण मोरे,पाणी पुरवठा उपभियंता डी.एन.हन्नुरे ,तालुका वैद्यकीय अधिकारी प्रियांका शिंदे,आदी उपस्थित होते.



दरवर्षी प्रमाणे पाणी शुद्धीकरणासाठी व तपासणीसाठी आरोग्य खात्यातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात्रेमधील भाविकांना पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी चार पाण्याचे टँकर उपलब्ध करण्यात येणार आहेत. या टँकरला पाणी भरण्यासाठी कारुंडे येथील पाणीपुरवठा विहीर मधून पाणी भरले जाणार आहे या टँकरद्वारे शिंगणापूर घाट पिंपरी परिसर परिसर कोथळे परिसर मुंगी घाट येथील भाविकांना पाणी पुरविण्यात येणार आहे या टँकरच्या दररोज चार ते पाच खेपा करण्यात येणार आहेत. तसेच शिंगणापूर भवानी घाट येथील घाटातील दोन शासकीय टाक्या व दोन खाजगी टाक्या मध्ये पाणीपुरवठा केला जाणार आहे.त्याचबरोबर घाटात पाण्याचे टँकर उभे करण्यात येणार आहेत.या यात्रेत पाणीपुरवठा करण्यासाठी पाणीपुरवठा विभागातील सर्व शाखा अभियंता ग्राम सेवक व आरोग्य कर्मचारी यांची नेमणुक करण्यात आली आहे .

कोथळे ग्रामपंचायत नळ पाणीपुरवठा विहीरीवर पाणी भरण्याची व्यवस्था करून टँकर मध्ये पाणी भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.त्याचबरोबर कोथळे येथील ओढ्यातील कावड भेटीच्या ठिकाणी नळ कोंडाळे चालू ठेवावेत व पाण्याच्या टाक्या स्वच्छ करून पाणीपुरवठा सुरू ठेवावा तसेच हातपंप दुरुस्त करून चालू ठेवावेत. कारुंडे ग्रामपंचायत पाणी भरण्याच्या ठिकाणी कर्मचारी नेमून वीजपुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेण्याची व वीजपुरवठा खंडित झाल्यास इंजिन द्वारे टँकर भरण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत .ग्रामपंचायत पिंपरी यात्रा कालावधीमध्ये शिंगणापूर उंबरदेव नांद्रुक येथील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या स्वच्छ करून टँकरद्वारे पाणी भरून यात्रेकरूंना शुद्ध पाणीपुरवठा करावा यासाठी सज्ज राहावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सार्वजनिक विहीर नातेपुते बुचडे विहीर धर्मपुरी सार्वजनिक विहीर या ठिकाणी टँकर भरण्याची सोय करण्यात आली आहे .

> **'या' ठिकाणी प्रथमोपचार केंद्र तैनात**
>
> मुंगी घाटातील सोहळा ९ एप्रिल रोजी असून या ठिकाणी दोन ॲम्बुलन्ससह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच १०८ रुग्णवाहिका उपलब्ध राहणार आहे. ग्रामीण रुग्णालय नातेपुते, प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोची व प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवे या ठिकाणी यात्रा कालावधीमध्ये २४ तास आंतररुग्ण विभाग सुरू ठेवण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवे येथे वैद्यकीय अधिकारी एक, आरोग्य सहाय्यक दोन, आरोग्य सेवक चार, आरोग्य सेविका सात, आरोग्य सहाय्यीका दोन, तर प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोची येथे वैद्यकीय अधिकारी दोन, आरोग्य सहाय्यक एक, आरोग्य सेवक सात, आरोग्य सेविका आठ व आरोग्य सहायिका एक, यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. नांद्रूक हद्द पिंपरी, ग्रामपंचायत कोथळे, मुंगी घाट या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र तैनात ठेवण्यात येणार आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवे, मोरोची व ग्रामीण रुग्णालय नातेपुते येथे चोवीस तास अत्यावश्यक सेवा ठेवण्यात येणार आहे. यात्रेतील भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे आबासाहेब पवार यांनी सांगितले.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**एक रंग मैत्रीचा..**
**एक रंग आनंदाचा..**
रंगपंचमी उत्सव साजरा करताना सांगोला शहरातील बालगोपाळ.
(छायाचित्र : दिपक भाकरे)



## संक्षिप्त वृत्त...



### करकंबमध्ये रंगपंचमी उत्साहात

**करकंब, दि.१९ मार्च-**

हिंदू धर्मातील महत्त्वाच्या सणांपैकी एक असलेला रंगपंचमीचा सण मोठ्या थाटामाटात उत्साहाने साजरा केला जातो. हिंदू कॅलेंडरनुसार रंगपंचमी हा सण फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या पाचव्या दिवशी साजरा केला जातो.रंगपंचमीच्या या सणानिमित्त रंगात रंगूनी जाऊ सुखात चिंब न्हाऊ,जीवनात राहू दे रंग सौख्याचे अक्षम तरंग अशा प्रकारच्या शुभेच्छा एकमेकांना देत पर्यावरणपूरक नैसर्गिक विविध रंगांची उधळण करत करकंब येथे बालगोपाळांकडून रंगपंचमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.द्वापार युगात गोकुळात बाळकृष्ण आपल्या गोपाळ सवंगड्यांबरोबर रंगपंचमी साजरी करत.त्याप्रमाणे करकंब येथील बालगोपाळांनीही या सणानिमित्त एकमेकांना पर्यावरणपूरक रंग लावून, विविध रंगांची उधळण करत रंगपंचमी मोठ्या आनंद व उत्साहाने साजरी केली. रंगपंचमी हा सण वसंत ऋतूशी संबंधित सण असून उन्हाळ्याचा तडाखा कमी व्हावा, शरीरास थंडावा मिळावा या उद्देशानेही हा सण साजरा केला जातो.



### हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश

**करमाळा, दि.१९ मार्च-**

करमाळा तालुक्यातील जेऊर येथे संभाजी ब्रिगेडतर्फे रमजाननिमित्त अलिफ मस्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. यावेळी पुणे विभागीय अध्यक्ष नितीन खटके म्हणाले संभाजी ब्रिगेड ही संघटना सर्व जाती धर्मातील लोक एकत्रित घेऊन चालणारी आशी एकमेव संघटना आहे. व जाती जातीत तेड निर्माण न करता सर्व जातीतील लोकांना एकत्रित घेऊन काम करणारी व विचारधारेवर सर्व समाज बांधवांचं संघटन करणारी संघटना आहे. व काही समाजकंटक जाती जातीमध्ये तेढ निर्माण करीत आहेत. व स्वतःच्या राजकीय स्वार्थापोटी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी समाजकंटकांचा वापर करीत आहे. तरी काही समाज बांधवांनी अशा चेतावणी कोर लोकांपासून सर्व समाज बांधवांनी सावध राहावे. हा द्वेष रोखण्याचे काम व जातीय सलोखा राखण्याचे काम गेली कित्येक वर्षापासून मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड ही संघटना काम करत आहे. यावेळी कार्यक्रमास संभाजी ब्रिगेड पुणे विभागीय अध्यक्ष नितीन खटके, बाळासाहेब झोळ, निलेश पाटील, ता.अध्यक्ष सुहास पोळ, शहअध्यक्ष अतुल निर्मळ, पिंटू जाधव, आदिनाथ माने, धनंजय गारुडी, सचिन कसबे, सागर कोठावळे,सागर साखरे,अजित उपाध्ये,अविनाश घाडगे, विठ्ठल जाधव, बनकर, नानासाहेब पोळ, अशितोष कसबे आदी कार्यकर्ते व बहुसंख्येने सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते.



### सह्याद्री कॉलेजमध्ये प्रथम एज्युकेशन फौंडेशनतर्फे व्याख्यान

**सांगोला, दि.१९ मार्च-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, (ता.सांगोला) येथे प्रथम एज्युकेशन फौंडेशन मार्फत विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील, प्रा.एस. एस.काळे, प्रा.एस.पी.जोकार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. फौंडेशनचे बापूसाहेब ठोकळे, किशोर बनसोडे यांनी मनोगतात गरीब होतकरू मुलांना सर्व प्रकारचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने २५ वर्षांपूर्वी मुंबईत स्थापन झालेली प्रथम ही एक नाविन्यपूर्ण शिक्षण संस्था आहे जी भारतातील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी काम करते. प्रथमने भारतातील ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात वीसपेक्षा अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील लाखो मुलांपर्यंत पोहोचले आहे. कौशल्य कार्यक्रमाचे उद्दिष्ट आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीतील तरुणांना कौशल्य-आधारित प्रशिक्षण देणे, त्यांना नोकरी किंवा स्वयंरोजगारासाठी तयार करणे आणि मूलभूत जीवन कौशल्ये तयार करण्यास मदत करणे आहे. २००९ मध्ये सुरू झालेल्या कार्यक्रमात ऑटोमोटिव्ह मेकॅनिक, सौंदर्य आणि कल्याण, आदरातिथ्य, बांधकाम, आरोग्यसेवा नर्सिंग इत्यादी अनेक उद्योग क्षेत्रांचा समावेश झाला आहे. कौशल्य कार्यक्रमांचा भाग म्हणून उद्योजकता समर्थन कार्यक्रम देखील चालवले जातात. या कौशल्य प्रशिक्षणासहित असणाऱ्या अभ्यासक्रमांचा लाभ घेऊन यशस्वी उद्योजक होऊन राष्ट्रीय विकासामध्ये योगदान द्यावे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.आर.के.कदम यांनी तर आभार प्रा.एस.पी.जोकार यांनी मानले.

### सांगोला तहसिलदार यांना अभ्यागतांनी भेटण्याचे वेळापत्रक

**सांगोला, दि.१९ मार्च-**

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय तरतुदीनुसार तहसिल कार्यालयातील कामकाजाबाबत व अडीअडचणी दुर करणेकामी अभ्यागतांना तहसिलदार सांगोला यांना प्रत्येक आठवडयातील सोमवार, बुधवार व शुक्रवार रोजी दु.३ ते ५ या कालावधीत भेटता येईल असे सांगोला तालुक्यातील सर्व नागरिकांना प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

## अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. १९ मार्च -**

भारताची दक्षिण काशी व महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले तिर्थक्षेत्र पंढरपूर हे श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान म्हणून प्रसिध्द आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात बुधवारी रंगपंचमी मोठ्या उत्साहात व पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. विठूरायावर केशर आणि गुलालाची उधळण केल्यावर अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग या अभंगाची प्रचिती आली. रंगपंचमी दिवशी दुपारी साडेचारच्या सुमारास श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची पाद्यपुजा विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आली. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते. या उत्सवाचे सर्व नियोजन विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे व नित्योपचार विभागातील कर्मचाऱ्यांनी केले होते.

**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमी उत्साहात साजरी**





### विठुरायाच्या मूर्तीवर केशरयुक्त रंग व गुलाल

रंगपंचमी निमित्त विठुरायास पांढऱ्या रंगाचा पोशाख परिधान करण्यात आलेला होता. देवाला सोन्याच्या मुकुटा ऐवजी पांढऱ्या रंगाचे पागोटे बांधण्यात आलेले होते. त्या नंतर देवाच्या अंगावर केशरयुक्त रंग व गुलाल टाकण्यात येऊन देवाची रंगपंचमी साजरी करण्यात आली. त्यामुळे रंगाची उधळण करण्यात आल्यावर मुळातच राजस सुकुमार मदनाचा पुतळा असे साक्षात संतमहात्म्यांनी वर्णिलेल्या विठुरायाचे रुप अधिकच लोभस दिसत होते.

### पारंपारिक पध्दतीने ढफाची मिरवणूक

मंदिरात देवाची रंगपंचमी साजरी करण्यात आल्या नंतर डफाची पुजा करुन नामदेव पायरी- तुकाराम भवन - पश्चिमद्वार - चौफाळा - पश्चिम द्वार - व्हीआयपी गेट-नामदेव पायरी अशी मंदिर प्रदक्षिणा करून डफाची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये रंगाची उधळण करून व मानकऱ्यांना प्रसाद देवून वसंतोत्सवाची सांगता करण्यात आली.

### देवाच्या रंगोत्सवाची सांगता

वसंतोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे रंगपंचमी. वसंतपंचमी पासून ते रंगपंचमी पर्यंत दररोज विठूरायाला पांढऱ्या पोशाखावर गुलाल टाकून पूजा केली जाते. सलग महिनाभर हा दिनक्रम सुरु असतो. या उत्सवाची रंगपंचमीला सांगता होते.

## देवाक काळजी रे...म्हणत सुरु आहेत रुग्णांवर उपचार

- गुळवंची आरोग्य उपकेंद्रालाच उपचाराची गरज
- ग्रामपंचायतीने दिली नवीन इमारतीस १० गुंठे जागा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १९ मार्च-**

दि. उत्तर सोलापूर तालुक्यातील गुळवंची येथे असलेल्या आरोग्य उपकेंद्राचे इमारतीच्या भिंतीस पडलेल्या भेगा, परिसराची दुरावस्था,अशा इमारतीत देवाक काळजी रे म्हणत जिव धोक्यात घालुन उपचार करणारे कर्मचारी व उपचार घेणारे रुग्ण पहाता या आरोग्य केंद्रालाच उपचाराची गरज आहे.ग्रामपंचायतीने नवीन ईमारत बांधकामासाठी १० गुंठे जागा उपलब्द करुन दिली आहे. या जागेवर प्रशासनाने इमारत उभी करुन रुग्णांची सोय करावी अशी मागणी होत आहे

सरकारी दवाखाने हे गरीब रुग्णासाठी देवदुत आहेत,केंद्र, राज्य शासनामार्फत अनेक योजनाव्दारे लहान मोठ्या,दुर्धर आजारावर उपचार करुन पुर्नजिवन देणारी मंदीर मानली जातात.मात्र अशा आरोग्य केंद्रास प्रशासनाने आवश्यक सोयी सुविधा देणे,लक्ष देणे आवश्यक आहे. गुळवंची. येथी प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची ईमारत ४० वर्षापुर्वीची असुन या गावासह गुळवंची तांडा,खेड,परीसरातील रुग्णासाठी सोयीचे ठरले आहे.मात्र सद्या या इमारतीचा स्लाबचे प्लास्टर,भिंतीस पडलेल्या भेगा, वाढलेल्या झाडामुळे इमारत, कपौडवॉल, इमारत कधी कोसळेल याची भिती घेऊन या ठिकाणी आरोग्य कर्मचारी, आशा सेविका रुग्णांना सेवा देत आहेत.



वास्तविक जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने नवीन इमारत बांधकाम करणे गरजेचे असताना दुर्लक्ष केले यामुळे या उपकेंद्रात काम करणारे कर्मचारी व आजारी रुग्णांना आजारपणापेक्षा इमारतीच्या धोक्याची भिती आहे.

**नवीन जागेत उपकेंद्र बांधणे करणे आवश्यक**

गुळवंचीसह परिसरातील गावे, वस्तीवरील रुग्णांना सोयीचे असणाऱ्या आरोग्य उपकेंद्राची दुरावस्था पहाता प्रशासनाने दुर्घटना घडण्याअगोदर प्रस्तावित जागेत बांधणे गरजेचे आहे. ग्रामपंचायतीने उपकेंद्रासाठी १० गुंठे जागा नावावर नोंद करुन दिली आहे.

**- सुनिल जाधव, सरपंच गुळवंची**

## महारक्तदान शिबीरात ९०३ जणांनी केले रक्तदान

- नातेपुते पोलीस स्टेशनचा विक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि.१९ मार्च -**

नातेपुते पोलीस ठाणे येथे दि. १८ मार्च रोजी घेण्यात आलेल्या महारक्तदान शिबीरात ९०३ रक्तदात्यांनी रक्तदान करत मानवतेचा अनोखा विक्रम नोंदविला. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून तसेच अप्पर पोलीस अधिक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली हे शिबीर घेण्यात आले.

यासाठी प्रभारी अधिकारी महारूद्र परजने, पीएसआय विक्रांत डिगे, पीएसआय ओमासे, नातेपुते पोलीस स्टेशनचा सर्व स्टाफ, होमगार्ड व सर्व पोलीस पाटील यांनी अथक परिश्रम घेतले. रक्तदानासाठी ५० कॉट व ५५ प्रशिक्षीत स्टाफ, डॉक्टर यांची व्यवस्था होती. एरवी खाकी वर्दीचा हिसका दाखविणाऱ्या पोलिसांनीच स्वतः रक्तदान करून शिबीराची सुरवात केली. त्यामुळे अनेक तरुणांनी या शिबिरात सहभाग नोंदऊन पोलिसांच्या या उपक्रमास साथ दिली.



शिबीरात सहभागी होणाऱ्या नागरिकांचा पोलीसांतर्फे सत्कार करण्यात आला. ३१ गावातील लोकांनी उत्सुर्तपणे सहभाग नोंदवला. सामाजिक संस्था, पत्रकार, सर्व गावातील गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळाचे पदाधिकारी, आर्ट ऑफ लिव्हींगचे पदाधिकारी, हिंदु व मुस्लीम संघटनांचे पदाधिकारी, तृतीयपंथी लोक, ग्रामीण भागातील १३ महिला, मजुर, शेतकरी वर्ग यांनीही रक्तदान केले.

### विवाहितेचा छळ; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

माहेरुन ५० हजार रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ केल्याची घटना २० जुलै २०२३ ते ४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान सासरी घडली. याप्रकरणी निकिता राकेश बोल्ली (रा.जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून पती राकेश,सासरे रवी, सासू रमा, स्वाती माळी (रा. शेळगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. संशयित आरोपींनी मिळून फिर्यादीच्या आई-वडिलांकडून ५० हजारांची मागणी केली. फिर्यादीस वारंवार चारित्र्यावर संशय घेऊन घटस्फोट दे असे म्हणून शिवीगाळ करीत मारहाण करून जाचहाट केल्याचे नमूद आहे.

## गुढीपाडव्यासाठी 'दामाजी' कडून २४ मार्चपासून साखर वाटप

- सभासदांसाठी ३४ केंद्राची केली व्यवस्था, चेअरमन शिवानंद पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.१९ मार्च -**

श्रीसंत दामाजी सहकारी साखर कारखान्यातर्फे गुढीपाडवा सणासाठी सभासदांना सवलतीच्या दरात दिल्या जाणाऱ्या साखरेचे वाटप दि.२४ ते २९ मार्च दरम्यान सकाळी दहा ते पाच या वेळेत प्रतिशेअर्स २५ किलो या प्रमाणात प्रतिकिलो वीस रुपये दराने संबंधित ३४ केंद्रावरून करण्यात येणार असल्याची माहिती चेअरमन शिवानंद पाटील यांनी दिली.

साखर वाटप केंद्र असे : १) कारखाना साईट-उचेठाण, बठाण, मुढवी, २) मंगळवेढा नागणेवाडी ऑफीस - मंगळवेढा शहर, ३) खोमनाळ नाका -खोमनाळ, फटेवाडी, अकोला, धर्मगांव, कचरेवाडी ४) ब्रम्हपूरी-ब्रम्हपूरी, मुंढेवाडी ५) माचणूर-रहाटेवाडी, तामदर्डी, माचणूर, ६)बोराळे ७)सिध्द्‌पूर-सिध्द्‌पूर, तांडोर ८) अरळी ९) डोणज १०) नंदुर ११) मरवडे-मरवडे, येड्राव, बालाजीनगर, कागष्ट, कात्राळ, कर्जाळ, डिकसळ १२)हुलजंती- हुलजंती, पौट१३) भोसे १४) रड्डे- रड्डे, जालिहाळ, सिध्द्रकेरी, १५)नंदेश्वर-नंदेश्वर, खडकी, जुनोनी १६) हुन्नूर- हुन्नूर मानेवाडी, रेवेवाडी, १७) लोणार- लोणार, पडोळकरवाडी १८) पाटखळ-पाटखळ,डोंगरगांव, हाजापूर, खुपसंगी, १९) शिरसी २०) आंधळगांव- आंधळगांव, गणेशवाडी, शेलेवाडी, गुंजेगांव २१) लक्ष्मी दहिवडी- लक्ष्मी दहिवडी, महमदाबाद शे। २२) मारापूर-मारापुर २३) मल्लेवाडी- घरनिकी, मल्लेवाडी, देगांव, ढवळस २४)सलगर बु।- सलगर बु।, सलगर खु।, जंगलगी २५) मारोळी २६) निंबोणी- निंबोणी, खवे, जित्ती, बावची २७) तळसंगी- तळसंगी, भालेवाडी, हिवरगांव, भाळवणी २८) गोणेवाडी २९) शिरनांदगी ३०) चिक्कलगी ३१) लें।चिंचाळे ३२)लवंगी ३३) महमदाबाद (हु।)३४) सोडड्डी-येळगी चौक - सोड्डी,शिवणगी,येळगी,आसबेवाडी इत्यादी केंद्रावर सभासदांचे सोईनुसार साखत वाटप करण्यात येत आहे. तसेच संबंधीत केंद्रावर कारखान्याने ठरवून दिलेल्या वेळेत उचल न केलेल्या सभासदांची साखर कारखाना साईटवर सुट्टीचे दिवस सोडून दर शुक्रवारी सकाळी दहा ते पाट डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत वाटप केली जाणार असल्याची माहिती चेअरमन श्री. पाटील यांनी दिली. कारखान्याचे अपूर्ण शेअर्स, ऊस बिल ॲडव्हान्स येणे, बेणे ॲडव्हान्स येणे, बेसल डोस येणे, ऊस तोडणी वाहतूक येणे तसेच अन्य प्रकारची कारखान्याची येणेबाकी असणाऱ्या सभासदांची साखर शासनाच्या धोरणानुसार देता येणार नसल्याची माहिती प्र.कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी दिली. सभासदांनी ठरवून दिलेल्या साखर विक्री केंद्रावर आपले साखर कार्ड नोंद करुन वेळेत साखर घेवून जावी असे आवाहन व्हाईस चेअरमन तानाजीभाऊ खरात यांनी केले आहे. यावेळी संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसमोर वाढत्या मजुरीचे संकट

- अवाढव्य मजुरीमुळे शेती खर्चात वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १९ मार्च-**

शेतमजुरांच्या भरमसाठ मजुरीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत नसताना शेतमजुरीचे वाढते दर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी घट करत आहेत.

शेतीसाठी शेतमजुरांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे, मात्र पुरवठा कमी असल्यामुळे शेतमजुरांचे दर झपाट्याने वाढले आहेत. यामुळे शेती परवडेनाशी झाली असून शेतकऱ्यांनी शासनाकडे शेतमजुरी दरावर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे. काही ठिकाणी शेतमजुरांना दलाल किंवा मध्यस्थाद्वारे काम दिले जाते. हे दलाल शेतकऱ्यांकडून अधिक मजुरी घेऊन आपला हिस्सा घेतात. यामुळे शेतकऱ्यांचा खर्च अधिक वाढतो. तसेच शेतमजुरांमध्ये



संघटनात्मक एकता नसल्यामुळे दर नियंत्रित करणे कठीण झाले आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च वाढले असताना शेतीमालाला हमीभाव मिळत नाही. परिणामी, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले आहे. वाढत्या शेतमजुरीच्या दरामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अनेक शेतकरी शेतीमध्ये तोटा सहन करत असून, शासनाकडे शेतमजुरीदरांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांच्या मते, मागणी आणि पुरवठा यातील असमतोल आणि वाढत्या महागाईमुळे शेतमजुरीचे दर प्रचंड वाढले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाने यावर उपाययोजना करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

**स्वतःच्या गरजेपोटी अधिक शेतमजुरी देण्याचा फटका इतर शेतकऱ्यांना**

काही शेतकऱ्यांना पेरणी, खते टाकणे, कापणी किंवा इतर शेती कामांसाठी तातडीने शेतमजूर हवे असल्यास ते गरजेपोटी अधिक शेतमजुरी देतात. यामुळे शेतमजुरांमध्ये अधिक मजुरी घेण्याची सवय निर्माण झाली आहे. परिणामी, इतर शेतकऱ्यांनाही त्याच दराने मजुरी द्यावी लागते. काही शेतमजूर या सवयीचा गैरफायदा घेत अधिक मजुरीची मागणी करतात. त्यामुळे वारंवार शेतमजूर लागणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

**मागणी करण्यात येणारे दर**

- महिला शेतमजूर :
- अर्धा दिवस - ३०० रुपये
- पूर्ण दिवस - ५०० रुपये
- अतिरिक्त खर्च - गाडी भाडे किंवा येणे-जाणे खर्च

- पुरुष शेतमजूर :
- अर्धा दिवस - ५०० रुपये
- पूर्ण दिवस - ७०० रुपये
- अतिरिक्त खर्च - गाडी भाडे किंवा येणे-जाणे खर्च

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# हर्षल वाळके यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ मार्च -**
देशाची राजधानी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात उत्कृष्ट व्यवस्थापनाचे काम केल्याबद्दल तुळजापुर येथील हर्षल दत्ता वाळके यांना विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला आहे. आपल्या उत्कृष्ट कार्याच्या जोरावर हर्षलने देशाची राजधानी दिल्लीत धाराशिव जिल्ह्याचे नाव अजरामर केले आहे.

देशाची राजधानी दिल्ली येथे २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. या संमेलनात अनेक जणांनी विविध कामांसाठी आपले योगदान दिले. तुळजापुर येथील हर्षल वाळके यांच्याकडे या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात व्यवस्थापनाची जबाबदारी होती. एवढेच नव्हे तर हर्षलच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जिल्ह्याचा बोलबाला झाला आहे. हर्षल वाळके यांनी दिल्ली येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात व्यवस्थापनाचे काम उत्कृष्टपणे पार पडल्याबद्दल त्यांना या संमेलनात मान्यवरांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### पूजारी नगर सोसायटीत रंगपंचमी साजरी

**तुळजापूर, दि.१९ मार्च -**
शहरातील पूजारी नगर सोसायटी परिसरात बुधवार १९ रोजी पारंपारिक पध्दतीने नैसर्गिक रंग वापरून आनंदी वातावरणात रंगपंचमी सण साजरा करण्यात आला. पूजारी नगर सोसायटी फाउंडेशनच्या आधारस्तंभ शुभांगी गणेश पूजारी यांच्या पुढाकाराने महिला वर्गासाठी वंश लॉन्स येथे संगीतमय जल्लोषात एकमेकांना रंग लावत रंगप साजरी करण्यात आली.



### जयप्रकाश विद्यालयत रंगाची उधळण

**धाराशिव, दि.१९ मार्च -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे विद्यालयात रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयात प्रत्येक सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे हाच उद्देश समोर ठेवून सर्व महापुरुषांच्या जयंती, सण, विविध कार्यक्रम साजरी केले जातात. त्यातीलच एक भाग म्हणून रंगपंचमी सर्वशिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी आनंद उत्साह साजरी केला. डॉ. आंबेडकर बालिक विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्याकडून अशा उत्साहाला प्रोत्साहन देऊन सर्वांना आनंद लुटण्याचा क्षण देत असतात.



### सृष्टी बंडगर हिस सायकल भेट

**इटकळ, दि.१९ मार्च -**
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ येथील इ. ६ वर्गातील विद्यार्थीनी सृष्टी दिनेश बंडगर या विद्यार्थिनीस गेम्स २४-७ फाऊंडेशन कडून मोफत सायकल भेट देण्यात आली आहे. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा नेहा सिंगवी, शिक्षणाधिकारी अशोक पाटील व गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव यांच्या उपस्थितीत मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. सदरील सायकल प्रस्ताव वर्ग शिक्षक सतिश ढोणे यांनी केंद्रप्रमुख बळवंत सुरवसे यांच्याकडे दिला होता. या दोघांनीही पाठपुरावा करून सृष्टी बंडगर हिस मोफत सायकलीचा लाभ मिळवून दिले. या सायकल वाटप प्रसंगीरविंद्र गायकवाड उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांनी सृष्टी बंडगर हिचा शाळेच्या वतीने सत्कार केला.



### जळकोट प्रशालेत रंगोत्सव साजरा

**जळकोट, दि.१९ मार्च -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या विद्यार्थिनींनी रंगपंचमी दिवशी शाळेत मुक्तपणे रंगांची उधळण करून शैक्षणिक संदेश दिला. जळकोट प्रशालेत विद्यार्थिनींनी रंगपंचमी साजरी केली. ही रंगपंचमी साजरी करताना रंगाच्या उधळणमधून शैक्षणिक संदेश देण्यात आले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी. यासाठी शासनाने विविध शैक्षणिक उपक्रम चालू केले आहेत. इनईपी २०२०, एफएलएन, स्कार्फ, निपुण भारत, गुढी पाडवा-पट वाढवा असे संदेश शाळेतील विद्यार्थिनींनी हातावर रंगाने रंगवून रंगपंचमीनिमित्त शालेय गुणवत्ता वाढीसाठी शुभेच्छात्मक संदेश देण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, शिक्षिका यांनी मदत केली.

### बोरमन शाळेत प्रवेश वाढवा अभियान

**जळकोट, दि.१९ मार्च -**
जळकोट ग्रामपंचायत हद्दीतील बोरमन तांडा येथील जि.प. प्राथमिक शाळेत जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, शाखा धाराशिव यांच्यावतीने गुढी पाडवा, पट वाढवा हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत बोरमन तांडा येथे दि.१८ मार्च रोजी तांड्यात प्रवेश दिंडी काढण्यात आली. इयत्ता पहिलीत येणाऱ्या मुलांचे आधार कार्ड घेऊन प्रवेश निश्चित करण्यात आले व त्यांचे फुगे व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक समीर जाधव, सहशिक्षक महेश कुंभार, गायत्री कलशेट्टी, ज्योती चंदे, गुलाब राठोड, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य तसेच पालक उपस्थित होते.

# संतश्रेष्ठ गोरबाकाकांच्या समाधी मंदिरासमोर महाद्वाराचे भूमिपुजन



## प्रत्यक्ष कामासही सुरुवात...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**
वारकरी संप्रदायात प्रतिपंढरपूर म्हणून ख्याती असलेल्या संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांच्या समाधीमंदिर परिसराला आता नवी झळाळी मिळणार आहे. संत गोरोबाकाका मंदिर व परिसराच्या विकास आराखड्याची आता प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली असून, समाधीमंदिर परिसरात भव्य महाद्वार उभारणीच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायाच्या लौकिकाला साजेसे हे महाद्वार भाविकांना मोठा आत्मिक आनंद देईल असा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

आ. पाटील यांच्या उपस्थितीत गावातील ज्येष्ठ मंडळींच्या हस्ते नुकतेच या भव्य महाद्वाराच्या कामाचे भूमीजन करण्यात आले. याबरोबरच तेर आणि परिसरात आणखी काही विकासकामे सुरू आहेत. आराखड्यातील उर्वरित कामेही येणाऱ्या काळात लवकरच सुरू होतील.

ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर प्राचीन तेर नगरीच्या सौंदर्यात आणखी भर पडणार असल्याचे आ. पाटील यांनी नमूद केले आहे. वारकरी संप्रदायात संतश्रेष्ठ म्हणून गोरोबा काका यांच्या नावाची ख्याती आहे. तेरणा नदीच्या तीरावर वसलेल्या नगरीत श्री संत गोरोबाकाका यांचे प्राचीन समाधी मंदिर आहे. या मंदिर परिसरातील महाद्वाराचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

चैत्र महिन्यातील वार्षिक यात्रोत्सव या परिसरातील नागरिकांचे आकर्षन असते.

त्याचबरोबर तेर नगरीत असलेल्या अनेक प्राचीन वास्तूंमुळे देखील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासक आणि पर्यटकांचीदेखील सतत वर्दळ असते.

ही बाब लक्षात घेऊन आपण मंदिर व परिसर विकास आराखडा तयार करण्यात केला. या माध्यमातून पहिल्या टप्प्यात विकासकामांसाठी १३ कोटी निधी उपलब्ध झाला असून, त्यातून महाद्वार, नगारखाना, संरक्षक भिंत, शौचालय, दर्शनबारी, भक्तनिवासाचे उर्वरित काम, छोट्या व्यावसायिकांसाठी दुकाने, विद्युतीकरण आदी कामे केली हाती घेण्यात आली आहेत.

यावेळी पद्माकर फंड, नवनाथ नाईकवाडी, जुनेद मोमीन, बालाजी पांढरे, विलास रसाळ, सुभाष कुलकर्णी, सतीश कदम, भूजंग खांडेकर, प्रजोत रसाळ, गणेश फंड, तानाजी बंडे, रजनीकांत पेठे, बिभीषण लोमटे, मज्जित मणियार, ग्रा.पं. सदस्य अजित कदम, नवनाथ पसारे, प्रवीण साळुंखे आदी उपस्थित होते.

### तेरला जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र करण्यासाठी प्रयत्न...

सध्या तेर येथील कोट टेकडीवर उत्खननाची जिवंत प्रात्यक्षिक प्रयोगशाळा विकसित करण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी आपण मोठा पाठपुरावा करून १३ कोटी ३८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. प्राचीन तीर्थकुंडासाठी ५ कोटी ११ लाख, बौद्ध स्तूप विकसित करण्यासाठी २ कोटी २१ लाख रुपये निधी उपलब्ध झाला आहे. राज्यातील सर्वात पुरातन मंदिर अशी ख्याती असलेल्या चौथ्या शतकातील त्रिविक्रम मंदिराचे रु.२ कोटी ९० लाख निधीतून जतन आणि संवर्धनाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. प्राचीन वास्तू आणि मंदिरांना गतवैभव मिळत आहे. एक व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून सुरू केलेल्या प्रयत्नांना येत असलेला आकार आत्मिक समाधान देणारा आहे. हजारो वर्षांपासून तेरच्या भूमीवरुन एक समृद्ध नागरी वस्तीची साक्ष पटेल अशी अनेक अभिमानस्थळे आजही याठिकाणी पहायला मिळतात. दोन हजार वर्षांचा हा वारसा अनुभवता यावा यासाठी तेरला जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

# रंगपंचमीनिमित्त श्री तुळजाभवानी मंदिरात सप्तरंगाची उधळण

### तुळजाभवानी देवीसह महंत, पुजारी भाविक भक्त नवरंगात रंगले

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ मार्च -**
महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिरात तुळजाभवानी माते सोबत महंत पुजारी आणि भाविकांनी मंदिरात मोठ्या उत्साहात रंगपंचमी साजरी केली.



आई राजा उदे उदे सदानंदीचा उदे उदे, जय भवानी जय शिवाजीच्या घोषणा देत पुजारी बांधवांनी देवीच्या गाभाऱ्यासह मंदिर परिसरात विविध नैसर्गिक कोरड्या रंगाने एकमेकाला रंग लावून रंगपंचमीच्या शुभेच्छा दिल्या सप्तरंगाने आई तुळजाभवानी मातेचे मंदिर नवरंगात भिजून गेले. रंगपंचमी निमित्त आई तुळजाभवानी मातेस पांढरे बदामी आणि गुलाबी सोनेरी काटाच्या रंगाचे वस्त्रालंकार चढवण्यात आले होते. रंगपंचमीनिमित्त तुळजाभवानी देवी लिंबूची माळ आणि सफरचंदाची आकर्षक सुंदर हार घालण्यात आला होता. रंगपंचमी निमित्त नैसर्गिक सप्तरंगाची उधळण करीत तुळजाभवानीच्या महावस्त्रावर नैसर्गिक सप्तरंग टाकून तुळजाभवानीची पारंपारिक पद्धतीने रंगपंचमी साजरी करण्यात आली.

यावेळी महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, पुजारी विशाल पाटील, संकेत पाटील, सागर गंगणे, सुहास कदम, रुपेश परमेश्वर, गजानन परमेश्वर, अभिजीत कुतवळ, गणेश हंगरगेकर, सुदर्शन पवार, बालाजी गंगणे, किरण अंदुरकर, दुर्गे छत्रे, निलेश टोले, विशाल जाधव यांच्यासह मंदिर अधिकारी व कर्मचारी सेवेकरी, गोंधळी, देवी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बुधवारी सकाळी रंगपंचमीनिमित्त नित्योपचार पंचामृत अभिषेक पूजा झाल्यानंतर तुळजाभवानीची अलंकार महापूजा मांडण्यात आली.

# जिल्ह्यात एम.डी. ड्रग्जच्या वाहतुकीवर कठोर कारवाई करा : ओमप्रकाश राजेनिंबाळकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**
धाराशिव जिल्ह्यातील परांडा आणि तुळजापूर तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात एम.डी. ड्रग्जची वाहतूक आणि विक्री होत असल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. या आमली पदार्थांच्या सेवनामुळे विशेषतः तरुण वर्गाच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असून, त्यांची पिढी उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.

यावर खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे पत्र लेखून तातडीने आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी सुचवले की, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (उछइ) मार्फत जिल्ह्यातील ड्रग्ज सिंडिकेट पूर्णपणे नष्ट करण्यासाठी सखोल चौकशी करण्यात यावी आणि गुन्हेगारांची सर्व पाळेमुळे शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई केली जावी. तसेच, सोलापूर, मुंबई आणि स्थानिक ड्रग्ज पेडलर्सच्या माध्यमातून एम.डी. ड्रग्जच्या वाहतुकीत सहभागी असलेल्या गुन्हेगारांवर नार्कोटिक्स विभागांतर्गत कारवाई करावी.



खा. राजेनिंबाळकर यांनी संबंधित यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याचे आवाहन केले.

# सिना कोळेगाव धरणातून साकत धरणात सोडलेले पाणी बंद करा

### सोनारी येथील हरणवडा रस्त्यावर शेतकऱ्यांचे रस्ता रोको व जलसमाधी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ मार्च -**
पाण्यासाठी शेतकरी आक्रमक झाले असुन सिना कोळेगाव धरणातून साकत धरणात कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आले आहे त्यामळे भोंजा, कुंभेजा, सोनारी, डोंजा, आलेश्वर, कौडगाव, खानापूर व डोमगाव या परिसरातील समस्त शेतकऱ्यांनी पाणी बंद करा या मागणीसाठी दि.१९ मार्च रोजी शासनाच्या विरोधात सकाळी ११ वाजता हरणवडा या ठिकाणी रस्ता रोको व जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे.

त्यामुळे परंडा तालुक्यात एकच खळबळ उडाली असून आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी म्हणंटले आहे की, सिना कोळेगाव धरणातून मागील दोन महिन्यापासून कालव्याद्वारे साकतकडे पाणी चालू आहे. परंतु धरणामध्ये आम्हाला दोन महिने पण पुरणार नाही एवढाच पाणीसाठा शेतीसाठी उपलब्ध आहे तरी नियोजन नसताना व साकत तलाव सिना कोळेगाव लाभ क्षेत्रात नसताना त्यांना पाणी देण्याचे चालू आहे. कालव्याचे काम पूर्ण रित्या झाले नसतानाही आपण पाणी सोडले आहे. त्यामुळे आम्ही लावलेल्या ऊस पिकाचे आतोनात नुकसान होणार आहे व त्यासाठी आपण सर्वजण जबाबदार राहणार आहात जर यातून आमचे नुकसान झाल्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल शेतकऱ्यांच्या हितासाठी सोडलेली पाणी बंद करा, अशी मागणी शेतकरी करीत आहेत पाणी बंद करा या मागणीसाठी शेतकरी आक्रमक झाले असून भर उन्हात आंदोलन करण्यात आले आहे.



तर काही शेतकरी जलसमाधी आंदोलन करीत आहेत.

यावेळी परिसरातील आठ ते दहा गावचे शेतकरी आंदोलनास उपस्थित होते. काही काळ आंदोलन करते शेतकरी व अधिकारी यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## टॉवरवरील उपकरणे चोरणारा उच्चशिक्षित आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**
इंडस टॉवरवरील इलेक्ट्रॉनिक उपकरणांची चोरी करणाऱ्या एका उच्चशिक्षित आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. राजेश आचार्य असे या आरोपीचे नाव असून तो पूर्वी रिकाम कंपनीत अभियंता (इंजिनियर) म्हणून कार्यरत होता.

दिनांक १७ मार्च २०२५ रोजी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. येडशी येथील इंडस टॉवर कंपनीच्या टॉवर क्रमांक १०६९८६२ वरील एअरटेल कंपनीचा आय वेन डिवाइस डिश अँटेना अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता. या प्रकारानंतर धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांत टेलिकॉम टॉवरवरील उपकरणे चोरीचे गुन्हे दाखल झाले.

# नॅचरल डेअरीमार्फत दुध उत्पादन वाढीसाठी दुध उद्योगात क्रांती करणार : बी.बी. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**
नॅचरल उद्योग समुहातील नॅचरल डेअरीचा १४ वा वर्धापन दिन व दुग्धजन्य पदार्थ विस्तारीत प्रकल्पाचा शुभारंभ डॉ. शैलेश मदने, आंतरराष्ट्रीय विक्री व्यवस्थापक- पशु पोषण, ॲडव्हॉन्स्ड इन्झाइम्स टेक्नॉलोजीस लि. मुंबई यांचे शुभहस्ते व नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.१८ मार्च रोजी संपन्न झाला.

यावेळी बोलताना डॉ. शैलेश मदने यांनी सांगितले की, दुध धंदयाकडे व्यवसाय म्हणून पाहावे. दुध धंदा हा कष्टाचा असला तरी त्यामधील कष्ट कमी करणेसाठी अभ्यासपुर्ण लहान लहान बाबींचा विचार करून हा व्यवसाय करावा. शास्त्रीय पध्दतीने



नियोजन केले तर दुध व्यसायात २० टक्के दुध उत्पादन वाढते. दुध व्यवसायात ५ तत्वाचा वापर अत्यंत महत्वाचा असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामध्ये जनावरांना पिण्याचे पाणी शुध्द असले पाहिजे. जनावरांसाठी मुरघास वापर केला पाहिजे. गोठयातील तापमान संतुलीत असले पाहिजे, त्यासाठी शेडवरील पत्र्यांना वरून पांढरा रंग लावून गोठयातील तापमान कमी केले पाहिजे. जनावरांना दर तीन महिन्यानी जंताचे औषध दिले पाहिजे व जनावरांच्या आजाराचे रेकॉर्ड ठेवले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुध काढणेसाठी मशिनचा वापर करणे या बाबी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना कृषिरत्न ठोंबरे म्हणाले की, नॅचरल डेअरीचे माध्यमातून सर्व सामान्य जनतेला आर्थिक स्थैर्य देण्याचे मोठे काम केले आहे. ऊस उत्पादन वाढीसाठी वापरण्यात येणारी ए आय टेक्नॉलॉजी (कृत्रिम बुध्दीमता) यापुढे नॅचरल डेअरीमध्ये दुध उत्पादन वाढीसाठी वापरण्यात येणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होणेसाठी उत्पादकांचे अभ्यास दौरे नॅचरल डेअरीमार्फत आयोजित केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दुध संकलक व दुध उत्पादक यांचेसाठी ५० टक्के सबसिडीवर एसएस कॅन देण्यात येणार असल्याचेही याप्रसंगी सांगितले.

प्रास्ताविक श्रीपाद ठोंबरे, डेअरी समन्वयक यांनी केले. सुत्रसंचलन कृषीभूषण पांडूरंग आवाड यांनी केले तर अनिल ठोंबरे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, सभासद दुध उत्पादक, कर्मचारी उपस्थित होते.

# तहसीलात रंगपंचमी जोमात; नागरिकांचे कामे कोमात

### कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्या...

### इमारतीत सर्वत्र सप्तरंगाचा सडा...

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.१९ मार्च -**
येथील तहसील कार्यालयामधील कर्मचारी रंगपंचमी दिवशी कार्यालयीन वेळेत तहसील कार्यालयाच्या परिसरातच रंगपंचमी खेळण्यात दंग असल्याचे चित्र तहसील कार्यालयात कामकाजासाठी आलेल्या नागरिकांना दिसून आले आहे. तहसील कार्यालय इमारत परिसरात मोठ्या प्रमाणात रंग खेळण्यात आल्याने सर्वत्र रंगाचे सडे पडल्याचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होऊन धुमाकूळ घालत आहेत.

**कारवाईवर नागरिकांचे लक्ष**

तालुक्यातून ग्रामीण भागातील शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने कामानिमित्त तहसील कार्यालयात दररोज येत असतात. अशा नागरिकांचे कामे करण्याऐवजी तहसील कार्यालयाचे कर्मचारी रंग खेळण्यात दंग असल्याचे बघून नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. तहसील कार्यालयाच्या इमारतीत पार्किंग एरियासह पायऱ्या आणि कामकाजाच्या ठिकाणी रंग पडलेले दिसून येत आहेत तर कर्मचाऱ्यांचे दालन रिकामे दिसत आहेत. शासकीय कार्यालयात रंग आल्याने महत्त्वाच्या कागदपत्रांवर देखील रंग पडू शकतात. कार्यालयातील नागरिकांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांसह शासकीय कागदपत्रे देखील रंगाने खराब होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. नागरिकांच्या कामापेक्षा रंग खेळण्यात कर्मचारी वेळ घालत असल्याचे चित्र तहसील कार्यालयात दिसून आल्याचे नागरिकांनी सांगितले.

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडिओ नंतर वरिष्ठ अधिकारी रंगात माखलेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.





तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा-अशोक पटवर्धन

**बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून शिवसेना महायुतीचा एक भाग आहे. यामुळे आपण सर्वजण सत्तेत आहोत. या सत्तेचा लाभ जनते पर्यंत पोहचवा. काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आतापासूनच तयारीला लागा असे नवनिर्वाचित शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन केले. याबरोबरच पुढील महिन्यात पुन्हा एकदा तालुका निहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये सर्वांनी आपआपल्या कामाचा अहवाल घेऊन उपस्थित राहायचे आहे असे देखील अशोक पटवर्धन यांनी सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांना सांगितले.



दि. १८ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत अशोक पटवर्धन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याबरोबरच बीड जिल्हा शिवसेनेची पुढील वाटचाल दिशा ध्येय धोरण सविस्तरपणे समजून सांगितले. यानंतर शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी महाराष्ट्र संपर्कप्रमुख किरण चव्हाण, युवसेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे आणि ऋषि जगताप यांचे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा सत्कार करून बीड जिल्हा शिवसेनेच्या अभिष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी माजी सरपंच पदाधिकारी लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा-जगताप, मुळूक गलधर

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्यांच्या मनातील आवडत नेतृत्व आहेत. कार्यकर्त्यांना जपणे त्यांना आधार देणे ही शिंदे साहेबांची सवय बनलेली आहे म्हणूनच शिंदे साहेबांच्या नेतृत्वात अवघ्या महाराष्ट्रभरात शिवसेनेची ताकद वाढत चालली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. आपल्या आगामी निवडणुकात संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकवायचा असून आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात देखील आपल्याला बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागायाचे आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आढावा बैठकीत अवाहन केले.



गेवराई : रब्बी हंगामातील पिकांची काढणी अंतिम टप्प्यात असून सिरसदेवी येथे मळणीयंत्राद्वारे गव्हाचे खळे सुरु आहे. मेहनतीने पिकविलेल्या धान्याची रास गोळा करताना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. (छाया: कृष्णा शिंदे)

# विकास बनसोडे याच्या मारेकऱ्यास तात्काळ अटक करून फाशी द्या-मोरे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

ट्रक चालवुन आपली व कुटूंबीयांची उपजिविका भागविणाऱ्या विकास बनसोडे या २५ वर्षीय तरूणास मारणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शासन करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केली आहे.



मुळचा जालना येथील विकास बनसोडे हा पिंपरी घुमरी ता. आष्टी येथील भाउसाहेब क्षीरसागर यांच्या ट्रकवर चालक म्हणुन काम करत होता. भाउसाहेब क्षीरसागर यांच्या मुलीशी त्याचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून क्षीरसागर कुटुंबीयाने बनसोडे यास पकडून घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये बांधुन टाकत दोन आणि वायाराच्या सहाय्याने विकासला बेदम मारहाण केली. यातच त्याचा मृत्यु झाला आहे.त्याच्या शरीरावर मोजता येणार नाहीत एवढे वळ आहेत. त्यामुळे विकास बनसोडे यास मारणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून शासनाने कठोर कारवाई करून त्यांना फाशिची शिक्षा द्यावी अशी मागणी उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी केली आहे.

# सौ.संजीवनी जाधव व डॉ.प्रियांका डाके ठरल्या मिसेस माजलगावच्या मानकरी

## रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुल च्यावतीने मिसेस माजलगाव कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ मार्च**

दिनांक १६ मार्च रोजी रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुलच्या वतीने मिसेस माजलगाव या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धचे आयोजन इगलवूड स्कूल फुले पिंपळगाव येथे करण्यात आले होते.कार्यक्रमात प्रथम क्रमांक सौ.संजीवनी जाधव तर द्वितीय क्रमांक डॉ.सौ.प्रियांका डाके यांनी मिळवला. तृतीय क्रमांक सौ.शीतल मालानी यांनी मिळवला तर सौ शुभांगी आनंदगावकर यांनी चौथ्या स्थानावर येण्याचा मान मिळवला.या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बक्षिसे जिंकली.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे, प्रकल्प प्रमुख डॉ.अर्चना पवार व रोटरियन अशोक बजाज, लक्ष्मीनारायण मुंदडा, शशी किरण गडम, सुरेश भानप, पंडित तिडके, डॉ.स्वानंद कुलकर्णी, जगदीश साखरे, गवारे सर, दिगंबर महाजन, डॉ.अंजली अकोलकर, डॉ.अर्चना मोरे, सौ.स्मिता लिमगावकर, शोभा वर्मा, सौ.सोळंके उपस्थित होते.

त्याचप्रमाणे इनरव्हील क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्ष सौ.प्राजक्ता गुंडेवार, सेक्रेटरी सौ.स्मिता कानडे व इनरव्हील क्लबच्या सर्व मेंबर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.जान्हवी वाघ आणि कु.प्रांजल देशमुख या विद्यार्थीनिंनी केले. मिसेस माजलगाव या सौंदर्य स्पर्धेचे सूत्रसंचालन सौ.प्रणिता मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन सत्यजित सरांनी केले. सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव शहर व परिसरातील शेकडोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे सर्व सदस्य, ईगलवूड इंग्लिश स्कूल व श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा सर्व स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

# गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतनानिमीत्त रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ मार्च**

प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर च्या वतीने श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. १९ मार्च बुधवार रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर येथे सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. या रक्तदान शिबीरात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले आहे.

दि. १९ मार्च ते ३० मार्च दरम्यान सध्या मुळव्याध, भगंदर, नासर, बालरोग, सर्व महिला रोग, मासिक पाळी चे आजार, वंध्यत्व, पोटाचे विकार, वृध्दपकाळातील आजार, मधुमेह, पंचकर्म यासह विविध प्रकारच्या आजारांचे मोफत तपासणी शिबिर चालू आहे या शिबीराचा माजलगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल चे अध्यक्ष पांडुरंग चांडक, सचिव प्रभाकर शेटे तसेच श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे तालुका प्रतिनिधी शिवशंकर भंडारे, केंद्र प्रतिनिधी दिगंबर सोळंके, अमोल सोळंके, रामराजे रांजवण, लक्ष्मण चुंबळे, सदाशिव ढगे, काशिनाथ काटकर, गजु चौधरी, डॉ अशोक घुबडे, डॉ शशिल पाचपोर, लक्ष्मण सोळंके, विशाल देवकते, शरद रुचके, रामप्रसाद गोळेकर, गजानन गोळेकर, गोरख मेंडके आदींनी केले आहे..

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

## आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**



आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

# मनोजदादा जरांगे यांची शिवाजीराव पंडित यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१८ मार्च**

मराठा आरक्षणासाठी लढणारे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. मराठा आरक्षणाशिवाय मराठा समाजाचा उद्धार होऊ शकत नाही, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी जो लढा उभारला तो योग्यच आहे. आपण आणि शिवछत्र परिवर मराठा आरक्षणासाठी आग्रही राहीलो. यापुढील काळात आपण मनोज जरांगे यांच्या सोबतच राहू असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी केले.

माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांनी आज संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. आपण तब्येत सांभाळावी, मराठा समाजाला आपली गरज आहे. तुमच्या छायेखाली मराठा समाज एक झाला असून ही वज्रमूठ आता कोणीही रोखू शकत नाही. मराठा आरक्षणासाठी आपण कायम रस्त्यावर उतरलो. या वयातही आपण मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष केला. यापुढील काळात मराठा आरक्षणासाठी आपण कायम मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी त्यांच्या सोबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अठरापगड जातींना सोबत घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढणार-राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**



राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाची बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे पार पडली, यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रांत अध्यक्ष पंडित कांबळे सर यांच्या उपस्थितीत बैठक बोलण्यात आली होती. यावेळी मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के असे म्हणाले की राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारधारेवर चालतो त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे, मराठवाड्याच्या विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी पुढाकार घेणारा नेता म्हणून पवार साहेबांची ओळख आहे,नामांतरांच्या वेळेला राजकीय किंमत मोजावी लागली तरी चालेल परंतु मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे काम पवार साहेबांनी केले आहे, पवार साहेब नेहमीच पुरोगामी विचार जोपासणारा नेता आहे अशा नेत्याच्या नेतृत्वाखाली आपण सर्व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करतो, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये देखील वंचित समाजाला प्रतिनिधित्व देण्याचे काम राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष करणार असल्यास मत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रांताध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांनी असे सांगितले की माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील व्यक्तीला पवार साहेबांनी सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी दिली आहे, ती योग्यरित्या मी पार पाडत आहे श्री कांबळे यांनी बाळासाहेब शिनगारे यांना जिल्हा कार्याध्यक्षाची जबाबदारी दिली होती, त्यांचे काम पाहून बाळासाहेब शिनगारे यांची सामाजिक न्याय विभागाच्या बीड जिल्हाअध्यक्ष पदाचे नव्याने घोषणा केली आहे. बाळासाहेब शिनगारे हे बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष वाढवण्यासाठी दिनदलित वंचित घटकांना एकत्र करून पवार साहेबांचे हात बळकट करणार आहेत, अशा भावना श्री कांबळे यांनी व्यक्त केल्या.

यावेळी केज मतदार संघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे , सामाजिक न्याय विभागाचे पतीश उपाध्यक्ष संजय गायकवाड,भिमराव जी,रविभाऊ खिल्लारे, तूप सौंदर साहेब,प्रदेश सचिव के के वडमारे , राहुल बनसोडे, भास्कर कुन्हे, लक्ष्मण कांबळे, तुकाराम साळुंखे, अंकुशराव दोडके,तानाजी लांडगे, सुधाकर जोगदंड, महादेव हजारे, श्रीमती मगरे ताई ,श्रीमती भोसले ताई, श्रीमती ज्योतीताई,अमोल पारवे, खुर्शीद आलम, आबा करडुले, शफिक काजी, सुधाकर चव्हाण, महेश सावंत, पंकज धांडे, अनिल शेळके, सचिन आगाम, महेश भिसे, बद्रीनाथ जटाळ, राकेश बिराजदार,सह आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीड जिल्हा कारागृह येथे प्रिझन टू प्राईड कार्यक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड संभाजीनगर यांच्यामार्फत बीड जिल्हा कारागृह येथे प्रिझन टू प्राईड कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कारागृहातील बंद्यासाठी कॅरम व बुद्धिबळ खेळाचे साहित्य पुरविण्यात आले. तसेच सदर खेळाचे प्रशिक्षित प्रशिक्षकामार्फत बंदयाना एक महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर खेळाचे प्रशिक्षणासाठी ४० बंद्यानी सहभाग घेतला आहे.सदर कार्यक्रम विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्य विभाग छत्रपती संभाजी नगर यांच्या परवानगीने व इंडियन ऑइल कंपनीचे चीप मॅनेजर एलपीजी इक्बाल सिद्दिकी संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाने घेण्यात येत आहे.सदर कार्यक्रमास इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड संभाजीनगर येथील श्री अमित विकास बोरसे, जयसिंग, इफ्तेकार, वाघमारे उपस्थित होते तसेच बीड जिल्हा कारागृह येथील प्र.अधीक्षक बक्सार मुलानी, संजय राऊत, ज्ञानेश्वर डोईफोडे, सुधाकर मुंडे, कृष्णा ढाकणे, राहुल राठोड कर्मचारी उपस्थितीत होते तसेच कारागृहातील बंदी बांधव उपस्थित होते.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वसई येथील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी

## गावातील महिलांनी पोलिस अधीक्षकांना दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

शहरापासून १० किलो मीटरवर असलेल्या वसई गावात अवैध देशी, विदेशी तसेच हातभट्टीच्या दारूची सर्रास विक्री होत असून दारू विक्रेता दारूड्यांना घरपोच दारू व्रिकी करीत आहे. त्यामुळे गावातील तरूण पिढी व्यसनाधीन होत असून अनेकांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अनेकवेळा अवैध दारू विक्रेत्याला येथील महिलांनी विनवणी केली परंतु माझे कोणीच काही करू शकत नाही. अशी अरेरावीची भाषा अवैध दारू विक्रेता महिलांना वापरत असून दि १९ मार्च रोजी अखेर गावातील महिलांनी अवैध दारूविक्री बंद करण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची भेट घेत त्यांचेपुढे संपूर्ण व्यथा मांडली.

वसई या गावात कोरोना काळापासून अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. गावातील पुरूष मंडळी, तरूण या दारू अड्ड्यावर पहाटेपासून दारू पिण्यासाठी जात आहेत. शेतात काम करण्याऐवजी तरूण पिढी दारूच्या दुकानावर जाऊन दारू पित आहेत. तसेच विवाहीत पुरूष सुध्दा या दारूच्या नशेत कुटुंबातील स्त्रीया आणि मुलाबाळांना त्रास देत आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबे दारूमुळे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक महिलांनी गावातील अवैध दारू बंद करण्यासाठी सरपंचासह गावातील प्रतिष्ठीत लोकांकडे तक्रारी केल्या परंतु अवैध दारू विक्रेता दररोज गावात देशी, विदेशी, हातभट्टी प्रत्येक प्रकारची दारू आणून विक्री करीत आहे. दिवसेंदिवस दारू पिणाऱ्यांची संख्या गावात वाढत असल्यामुळे या गावातील शांतता तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

दरम्यान बुधवारी गावातील महिलांनी हिंगोली येथील पोलिस अधीक्षक कार्यालय गाठून गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी करीत त्यांच्या व्यथा पोलिस अधीक्षक कोकाटे यांचेसमोर मांडल्या. गावातील अवैध दारूविक्री बंद न केल्यास आमरण उपोषण करण्याचा वेळप्रसंगी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा द्वारकाबाई सावळे, कुंताबाई सावळे, लताबाई सावळे, सुनीता सावळे, ज्योत्स्ना सावळे, गिरजाबाई सावळे, सुनीताबाई पांडुरंग सावळे, बायनाबाई सावळे, सुनंदा कुगावकर, त्रिशला सावळे, रत्नमाला उगावकर, छायाबाई कदम, सुशीलाबाई कदम, इंदूबाई कदम, राजामती कदम, भागाबाई शिंदे, रेणुका सावळे, प्रयागबाई सावळे, द्वारकाबाई रंगराव सावळे, भागेरथी कुगावकर, सरपंच उत्तमराव कदम, उपसरपंच सुधाकर सावळे, गणेशराव सावळे, कैलास सावळे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# वाळूचा ट्रक रोखण्यासाठी गेलेल्या महसूलच्या पथकावर हल्ला

## वसमत ते मालेगाव मार्गावरील घटना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

वसमत ते मालेगाव मार्गावर वाळूचा ट्रक रोखण्यासाठी गेलेल्या महसूल पथकावर वाळू माफीयांनी केलेल्या हल्ल्यामध्ये एक तलाठी गंभीर जखमी झाला असून त्यांना तातडीने उपचारासाठी वसमत येथील खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मंगळवारी दि १८ मार्च रोजी रात्री साडे अकरा ते बारा वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, वसमत तालुक्यातून अवैधरित्या होणारा वाळू उपसा व वाहतुक थांबविण्यासाठी महसूल विभागाने पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून दिवसा कामकाज करून रात्रीच्या वेळी वाळू घाटाच्या परिसरात तसेच वाहतुक मार्गावर गस्त घातली जात आहे. यावेळी वाहनांची तपासणी केली जात असून अवैधरित्या वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जात आहे.

दरम्यान, मंगळवारी रात्री तलाठी नागनाथ राऊत, गजानन नागोरे आणि दोन कोतवाल असे चौघे वसमत ते मालेगाव मार्गावर गस्तीवर होते. यावेळी एका ट्रकमधून वाळू वाहतुक होत होती. पथकाने ट्रक चालकास थांबण्याचा इशारा केल्यानंतरही त्याने ट्रक पळविला. त्यामुळे पथकाने पाठलाग सुरू केला. यावेळी ट्रक चालकाने निळा जि नांदेड शिवारात ट्रक थांबवला. यावेळी पाठलाग करणाऱ्या पथकाला तिथे थांबलेल्या काही वाळू माफीयांनी घेरले. यावेळी वाळू माफीयांना मागचा पुढचा विचार न करता तलाठी राऊत यांच्यावर हल्ला चढविला. बेल्ट, वायर तसेच लोखंडी रॉडने त्यांना मारहाण केली. मात्र यावैळी तलाठी नागोरे व इतर दोघांनी माफीयांच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घेतली. त्यानंतर वाळू माफीया फरार झाले. या मारहाणीत राऊत यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांना उपचारासाठी वसमतच्या खाजगी रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची माहीती मिळताच वसमतच्या तहसीलदार शारदा दळवी यांनी राऊत यांची भेट घेऊन त्यांची चौकशी केली.

दरम्यान, सदर घटना नांदेड जिल्ह्यातील भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असून वसमत पोलिसांनी घटनेची माहीती भाग्यनगर पोलिसांना कळविली आहे. वाळू माफीयांकडून होणाऱ्या हल्ल्यामुळे महसूल पथकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यात वाळू माफीयाची लॉबी मोठी असून त्यांना राजकीय पाठबळ मिळत आहे. त्यामुळे वाळू माफीया कोणालाही घाबरायला तयार नाही. महसूल किंवा पोलिस विभागाने जीव धोक्यात घालून पकडलेली वाळू, वाहने सोडण्यासाठी संबंधित पोलिस ठाण्यांना राजकीय पुढाऱ्यांचे कॉल येतात त्यामुळे महसूल, पोलिस हतबल झाले होत असल्याची चर्चा होत आहे.

# सेनगाव येथील वाळू माफीयाकडून रिल्स शेअर करीत दहशत माजविण्याचा प्रयत्न, कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील भाऊ कडून वाळू तस्करीतून आलेल्या नोटांचे बंडल दाखवत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

बीड जिल्ह्यातील खोक्या प्रकरण चांगलेच गाजत असतांना सेनगाव तालुक्यातील एका भाऊ वाळू माफीयाकडून वाळू तस्करीतून आलेल्या नोटांचे बंडल दाखवत रिल्स तयार केल्याचा प्रकार समोर येत आहे. सेनगाव तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा करून त्याची वाहतुक केली जात आहे. मात्र महसूल विभागाच्या भरारी पथकांना वाळू माफीयांना आवर घालतांना नाकीनऊ येऊ लागले असल्याचे चित्र आहे. महसूल विभागासह पोलिसांना वाळू माफीयांकडून वाळू उपसा करण्यासाठी वापरले जाणारे यंत्र व इतर साहीत्य जाळून टाकले. मात्र त्यानंतरही वाळू उपसा सुरूच आहे.

दरम्यान, सेनगाव तालुक्यातील एका भाऊ ने वाळू तस्करीमध्ये वारेमाप कमाई केल्याचा आरोप केला जात आहे. त्यातून मिळालेल्या रकमांमध्ये नोटांच्या गड्डया समोर ठेवून रिल्स बनविण्यात आल्या आहेत. समोरील टेबलवर पाचशे, दोनशे, शंभर रूपयांच्या गड्ड्या ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. या रिल्स सोशल मिडीयावर व्हायरल झाल्या आहेत. या रिल्सच्य माध्यमातून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

यासंदर्भात सेनगाव तालुक्यातील पिनू वाघमारे, विनोद आठवले, विकास सुतार, मारोती पवार, सचिन जाधव, धीरज सुतार यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयाकडे निवेदन दिले आहे. यामध्ये वाळू माफीया भाऊ कडून दहशत पसरविण्याचा प्रयत्न आहे. या भागात अवैध वाळू उपसा सुरू असून त्याला आवर घालणे आवश्यक आहे. प्रशासनाने या प्रकाराची दखल घेऊन त्वरीत कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. काही वाळू माफीया अंगावर सोने, काहीजण मंत्र्यांसोबतचे फोटो सोशल मिडीयावर टाकून दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत.



**हिंगोली– अ‍ॅपेक्स अर्बन को ऑप बँक ऑफ महाराष्ट्र आणि गोवा लि यांच्या मालमत्तेचा उपयोग सहकार क्षेत्र वाढीसाठी पुर्नवापर करण्यासाठी करावा अशी मागणी केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा यांचेकडे करण्यात आली. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रिझर्व बँकेचे संचालक सतीश मराठे, मिलींद काळे, संचालक सुनील देवडा, अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, उदय जोशी, संजय पाचपोर, कोकारे, कासार आदींची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### शहर पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक



हिंगोली– येथील शहर पोलिस ठाण्यात आगामी रमजान ईद व इतर सण, उत्सवाच्या निमित्ताने शांतता समितीची बैठक पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडली. यावेळी या काळात सर्व समाजाने सलोख्याने आणि बंधुभावाने सण, उत्सव साजरे करावेत तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे. कोणीही अफवा पसरवू नये, संदीग्ध काही आढळल्यास त्याची पोलिसांना तत्काळ माहीती द्यावी, मिरवणुका व इतर कार्यक्रम शांततेत पार पाडावेत अशा सूचना पोनि पाडळकर यांनी दिल्या.यावेळी शांतता समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत दोन आत्महत्या

कुरूंदा– वसमत तालुक्यातील कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत दोन वेगवेगळ्या घटनेत महागाव येथील शेतकऱ्याने नापिकीला कंटाळून तर कोर्टा येथील विद्यार्थीनीने अभ्यासाच्या तणावातून गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार महागाव येथील शेतकरी बालाजी सवंडकर वय ४५ यांना दोघा भावांमध्ये मिळून चार एकर शेती आहे. या शेतावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मात्र यावर्षी अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम हाती आला नाही तर रब्बी हंगामातील पिकांनाही उतारा आला नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा या विवंचनेत मागील काही दिवसांपासून ते अस्वस्थ होते. दरम्यान रविवारी दि १६ रात्रीच्या सुमारास शेतकरी बालाजी यांनी घरातील हॉलमध्ये गळफास घेवून आत्महत्या केली. या प्रकरणी विश्वनाथ सवंडकर यांनी दिलेल्या माहीतीवरून कुरूंदा पोलिस ठाण्यात दि १७ मार्च रोजी अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. सपोनि रामदास निरदोडे, जमादार भगीरथ सवंडकर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. मयत बालाजी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. कोर्टा येथील विद्यार्थीनी आयोध्या रणमाळ मुळगाव धारमाथा ही बीएस्सी प्रथम वर्षाला शिक्षण घेत होती. या अभ्यासाचा ताण आल्यामुळे तिने सोमवार दि १७ मार्च रोजी सायंकाळी घरी कोणी नसतांना गळफास घेऊन आत्महत्या केली. सायंकाळी तिची आई शेतातून आल्यानंतर आयोध्याचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे, उपनिरीक्षक आगलावे, सवंडकर, पोले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आत्माराम कदम यांच्या माहीतीवरून अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसलेंची अचानक आरोग्य केंद्रांना भेट




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अचानक सिरसम आणि फाळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट दिली. यावेळी कामकाजाची पाहणी करीत ग्रामीण भागातील रूग्णांना तातडीच्या आरोग्य सेवा देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राकडून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांची तपासणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अचानक भेट दिली. हिंगोली तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या सिरसम प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी रूग्णालयाच्या कामकाजाची पाहणी केली. तसेच दररोज किती रूग्णांची तपासणी केली जाते, किती रूग्णांना रेफर केले जाते, रेफर केल्याची कारणे योग्य आहेत की नाही याची पाहणीही केली. याशिवाय काही रूग्णांशी संवादही साधला. त्यानंतर त्यांनी थेट फाळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. यावेळी तिथे वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हते.मात्र अधिक चौकशी केल्यानंतर ते आरोग्य सेवेच्या कामासाठी बाहेर होते. तर दुसरे वैद्यकीय अधिकारी हजर असल्याचे दिसून आले. याठिकाणीही त्यांनी कामकाजाची पाहणी केली.

यावेळी ग्रामीण भागातील रूग्णांना तातडीच्या आरोग्य सेवा मिळवण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून काम करण्याच्या सूचना भोसले यांनी दिल्या. विनाकारण रूग्णांना रेफर करू नये त्यांच्यावर आरोग्य केंद्र स्तरावर उपचार करावेत. तसेच रूग्णांना त्यांच्या नातेवाईकांना योग्य वागणुक द्यावी. एकही रूग्ण उपचाराविना परत जाऊ नये याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिल्या.

# शिरड शहापूर येथे अ‍ॅग्रीस्टॅक अभियान संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १९ मार्च**

जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या आदेशावरून शिरड शहापूर येथील तलाठी कार्यालय शिरड शहापूर या ठिकाणी अँग्रीस्टॅक नोंदणी अभियान संपन्न झाले. शिरड शहापूर परिसरातील शेतकऱ्यांनी बऱ्यापैकी सहभाग नोंदविला. शेतकऱ्यामध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. बरेच लाभार्थी असे आहेत की ज्यांच्याकडे संपर्क होऊ शकत नाही, तरी तलाठी ज्योती स्वामी व शिरड शहापूर येथील सर्व केंद्र चालक यांनी शेतकऱ्यांना फोन करून बोलवून अँग्रीस्टॅक नोंदणी केली. शिरड शहापूर येथील सर्व शेतकरी तीन ते चार दिवसात नोंदणी पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे असे कृषी सहाय्यक अक्षय राठोड, ग्राम सेवक हलबुर्गे, तलाठी ज्योती स्वामी यांनी सांगितले सदरील शिबीरात आनंद ढेंबरे, सोनू लांडगे, सोमनाथ ठोंबरे, गणेश विभुते, रामकिशन बोंगणे, शेख अख्तर, प्रमोद ठोंबरे, हर्षद हजारे यांनी मदत केली.

# हिंगोलीतील आदर्श महाविद्यालयास करिअर कट्टाचे पाच पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत नांदेड विभागीय महाविद्यालयीन स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शारदा भुवन एज्युकेशन सोसायटीच्या शंकरराव चव्हाण मेमोरियल हॉलमध्ये नांदेड विभागीय पुरस्कार वितरण सोहळा व एकदिवसीय कार्यशाळा सन २०२५ संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री डी. पी. सावंत हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, डॉ. किरणकुमार बोंदर (सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग) डॉ. डी. डी. पवार (कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र), प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण (नांदेड विभागीय प्राचार्य प्रवर्तक), प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्यासह नांदेड विद्यापीठ परीक्षेत्रातील महाविद्यालयीन समन्वयक, तालुका समन्वयक, जिल्हा समन्वयक व प्राचार्य प्रवर्तक हे बहुसंख्येने उपस्थित होते.

या महाविद्यालयीन स्पर्धेत आदर्श महाविद्यालय, जिल्हास्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय प्रथम क्रमांक, प्राचार्य प्रो.डॉ. विलास आघाव यांना हिंगोली जिल्हा स्तरीय उत्कृष्ट प्राचार्य प्रथम क्रमांक, डॉ. दयाराम द. मस्के यांना उत्कृष्ट जिल्हा समन्वयक, डॉक्युमेंटरी मेकिंग जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांक तसेच नांदेड विभागातुन देखील प्रथम क्रमांक पटकावला आहे. दुर्घटनेची वाट या शिर्षकाची रस्ते वाहतूक या विषयावर विश्वभूषण फकिरा गायकवाड, उमेश गणेश चुनडे, संतोष नागोराव इंगोले, कृष्णा लक्ष्मण इंगोले, अर्जून गजानन हर्नेकर, शुभम शिवाजीराव चव्हाण, वैभव मारोती पवार, मंगेश प्रकाश शेळके या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या माहितीपटाला हिंगोली जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक तसेच नांदेड, लातुर, परभणी व हिंगोली या चारही जिल्ह्यांच्या विभागीय स्पर्धेत आदर्श महाविद्यालयाला प्रथम क्रमांक मिळाला आहे. सर्व पुरस्कार महाविद्यालयाला प्राप्त झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. विलास आघाव, स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र तसेच करिअर कट्टाचे संयोजक डॉ. दयाराम मस्के, यशस्वी स्पर्धक विद्यार्थी यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा, सचिव राम चन्द्र कयाल, उपाध्यक्ष गणेशप्रसाद चौधरी, सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन केले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## हर्षल वाळके यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ मार्च -**

देशाची राजधानी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात उत्कृष्ट व्यवस्थापनाचे काम केल्याबद्दल तुळजापुर येथील हर्षल दत्ता वाळके यांना विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला आहे. आपल्या उत्कृष्ट कार्याच्या जोरावर हर्षलने देशाची राजधानी दिल्लीत धाराशिव जिल्ह्याचे नाव अजरामर केले आहे.

देशाची राजधानी दिल्ली येथे २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. या संमेलनात अनेक जणांनी विविध कामांसाठी आपले योगदान दिले. तुळजापुर येथील हर्षल वाळके यांच्याकडे या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात व्यवस्थापनाची जबाबदारी होती. एवढेच नव्हे तर हर्षलच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जिल्ह्याचा बोलबाला झाला आहे. हर्षल वाळके यांनी दिल्ली येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात व्यवस्थापनाचे काम उत्कृष्टपणे पार पडल्याबद्दल त्यांना या संमेलनात मान्यवरांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### पूजारी नगर सोसायटीत रंगपंचमी साजरी

**तुळजापूर, दि.१९ मार्च -**

शहरातील पूजारी नगर सोसायटी परिसरात बुधवार १९ रोजी पारंपारिक पध्दतीने नैसर्गिक रंग वापरून आनंदी वातावरणात रंगपंचमी सण साजरा करण्यात आला. पूजारी नगर सोसायटी फाउंडेशनच्या आधारस्तंभ शुभांगी गणेश पूजारी यांच्या पुढाकाराने महिला वर्गासाठी वंश लॉन्स येथे संगीतमय जल्लोषात एकमेकांना रंग लावत रंगप साजरी करण्यात आली.



### जयप्रकाश विद्यालयत रंगाची उधळण

**धाराशिव, दि.१९ मार्च -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे विद्यालयात रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयात प्रत्येक सणाचे महत्त्व विद्यार्थ्यापर्यंत पोहोचावे हाच उद्देश समोर ठेवून सर्व महापुरुषांच्या जयंती, सण, विविध कार्यक्रम साजरी केले जातात. त्यातीलच एक भाग म्हणून रंगपंचमी सर्वशिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी आनंद उत्साह साजरी केला. डॉ. आंबेडकर बालिक विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्याकडून अशा उत्साहाला प्रोत्साहन देऊन सर्वांना आनंद लुटण्याचा क्षण देत असतात.



### सृष्टी बंडगर हिस सायकल भेट

**इटकळ, दि.१९ मार्च -**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ येथील इ. ६ वर्गातील विद्यार्थीनी सृष्टी दिनेश बंडगर या विद्यार्थिनीस गेम्स २४-७ फाऊंडेशन कडून मोफत सायकल भेट देण्यात आली आहे. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा नेहा सिंगवी, शिक्षणाधिकारी अशोक पाटील व गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव यांच्या उपस्थितीत मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. सदरील सायकल प्रस्ताव वर्ग शिक्षक सतिश ढोणे यांनी केंद्रप्रमुख बळवंत सुरवसे यांच्याकडे दिला होता. या दोघांनीही पाठपुरावा करून सृष्टी बंडगर हिस मोफत सायकलीचा लाभ मिळवून दिले. या सायकल वाटप प्रसंगीरविंद्र गायकवाड उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांनी सृष्टी बंडगर हिचा शाळेच्या वतीने सत्कार केला.



### जळकोट प्रशालेत रंगोत्सव साजरा

**जळकोट, दि.१९ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या विद्यार्थिनींनी रंगपंचमी दिवशी शाळेत मुक्तपणे रंगांची उधळण करून शैक्षणिक संदेश दिला. जळकोट प्रशालेत विद्यार्थिनींनी रंगपंचमी साजरी केली. ही रंगपंचमी साजरी करताना रंगाच्या उधळणमधून शैक्षणिक संदेश देण्यात आले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी. यासाठी शासनाने विविध शैक्षणिक उपक्रम चालू केले आहेत. इनईपी २०२०, एफएलएन, स्कार्फ, निपुण भारत, गुढी पाडवा-पट वाढवा असे संदेश शाळेतील विद्यार्थिनींनी हातावर रंगाने रंगवून रंगपंचमीनिमित्त शालेय गुणवत्ता वाढीसाठी शुभेच्छात्मक संदेश देण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, शिक्षिका यांनी मदत केली.

### बोरमन शाळेत प्रवेश वाढवा अभियान

**जळकोट, दि.१९ मार्च -**

जळकोट ग्रामपंचायत हद्दीतील बोरमन तांडा येथील जि.प. प्राथमिक शाळेत जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, शाखा धाराशिव यांच्यावतीने गुढी पाडवा, पट वाढवा हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत बोरमन तांडा येथे दि.१८ मार्च रोजी तांड्यात प्रवेश दिंडी काढण्यात आली. इयत्ता पहिलीत येणाऱ्या मुलांचे आधार कार्ड घेऊन प्रवेश निश्चित करण्यात आले व त्यांचे फुगे व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक समीर जाधव, सहशिक्षक महेश कुंभार, गायत्री कलशेट्टी, ज्योती चंदे, गुलाब राठोड, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य तसेच पालक उपस्थित होते.

## संतश्रेष्ठ गोरबाकाकांच्या समाधी मंदिरासमोर महाद्वाराचे भूमिपुजन



### प्रत्यक्ष कामासही सुरुवात...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

वारकरी संप्रदायात प्रतिपंढरपूर म्हणून ख्याती असलेल्या संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांच्या समाधीमंदिर परिसराला आता नवी झळाळी मिळणार आहे. संत गोरोबाकाका मंदिर व परिसराच्या विकास आराखड्याची आता प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली असून, समाधीमंदिर परिसरात भव्य महाद्वार उभारणीच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायाच्या लौकिकाला साजेसे हे महाद्वार भाविकांना मोठा आत्मिक आनंद देईल असा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

आ. पाटील यांच्या उपस्थितीत गावातील ज्येष्ठ मंडळींच्या हस्ते नुकतेच या भव्य महाद्वाराच्या कामाचे भूमीजन करण्यात आले. याबरोबरच तेर आणि परिसरात आणखी काही विकासकामे सुरू आहेत. आराखड्यातील उर्वरित कामेही येणाऱ्या काळात लवकरच सुरू होतील.

ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर प्राचीन तेर नगरीच्या सौंदर्यात आणखी भर पडणार असल्याचे आ. पाटील यांनी नमूद केले आहे. वारकरी संप्रदायात संतश्रेष्ठ म्हणून गोरोबा काका यांच्या नावाची ख्याती आहे. तेरणा नदीच्या तीरावर वसलेल्या नगरीत श्री संत गोरोबाकाका यांचे प्राचीन समाधी मंदिर आहे. या मंदिर परिसरातील महाद्वाराचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

चैत्र महिन्यातील वार्षिक यात्रोत्सव या परिसरातील नागरिकांचे आकर्षन असते.

त्याचबरोबर तेर नगरीत असलेल्या अनेक प्राचीन वास्तूंमुळे देखील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासक आणि पर्यटकांचीदेखील सतत वर्दळ असते.

ही बाब लक्षात घेऊन आपण मंदिर व परिसर विकास आराखडा तयार करण्यात केला. या माध्यमातून पहिल्या टप्प्यात विकासकामांसाठी १३ कोटी निधी उपलब्ध झाला असून, त्यातून महाद्वार, नगारखाना, संरक्षक भिंत, शौचालय, दर्शनबारी, भक्तनिवासाचे उर्वरित काम, छोट्या व्यावसायिकांसाठी दुकाने, विद्युतीकरण आदी कामे केली हाती घेण्यात आली आहेत.

यावेळी पद्माकर फंड, नवनाथ नाईकवाडी, जुनेद मोमीन, बालाजी पांढरे, विलास रसाळ, सुभाष कुलकर्णी, सतीश कदम, भूजंग खांडेकर, प्रजोत रसाळ, गणेश फंड, तानाजी बंडे, रजनीकांत पेठे, बिभीषण लोमटे, मज्जित मणियार, ग्रा.पं. सदस्य अजित कदम, नवनाथ पसारे, प्रवीण साळुंखे आदी उपस्थित होते.

### तेरला जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र करण्यासाठी प्रयत्न...

सध्या तेर येथील कोट टेकडीवर उत्खननाची जिवंत प्रात्यक्षिक प्रयोगशाळा विकसित करण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी आपण मोठा पाठपुरावा करून १३ कोटी ३८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. प्राचीन तीर्थकुंडासाठी ५ कोटी ११ लाख, बौद्ध स्तूप विकसित करण्यासाठी २ कोटी २१ लाख रुपये निधी उपलब्ध झाला आहे. राज्यातील सर्वात पुरातन मंदिर अशी ख्याती असलेल्या चौथ्या शतकातील त्रिविक्रम मंदिराचे रु.२ कोटी ९० लाख निधीतून जतन आणि संवर्धनाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. प्राचीन वास्तू आणि मंदिरांना गतवैभव मिळत आहे. एक व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून सुरू केलेल्या प्रयत्नांना येत असलेला आकार आत्मिक समाधान देणारा आहे. हजारो वर्षापासून तेरच्या भूमीवरुन एक समृद्ध नागरी वस्तीची साक्ष पटेल अशी अनेक अभिमानस्थळे आजही याठिकाणी पहायला मिळतात. दोन हजार वर्षाचा हा वारसा अनुभवता यावा यासाठी तेरला जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## रंगपंचमीनिमित्त श्री तुळजाभवानी मंदिरात सप्तरंगाची उधळण

### तुळजाभवानी देवीसह महंत, पुजारी भाविक भक्त नवरंगात रंगले

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिरात तुळजाभवानी माते सोबत महंत पुजारी आणि भाविकांनी मंदिरात मोठ्या उत्साहात रंगपंचमी साजरी केली.



आई राजा उदे उदे सदानंदीचा उदे उदे, जय भवानी जय शिवाजीच्या घोषणा देत पुजारी बांधवांनी देवीच्या गाभाऱ्यासह मंदिर परिसरात विविध नैसर्गिक कोरड्या रंगाने एकमेकाला रंग लावून रंगपंचमीच्या शुभेच्छा दिल्या सप्तरंगाने आई तुळजाभवानी मातेचे मंदिर नवरंगात भिजून गेले. रंगपंचमी निमित्त आई तुळजाभवानी मातेस पांढरे बदामी आणि गुलाबी सोनेरी काटाच्या रंगाचे वस्त्रालंकार चढवण्यात आले होते. रंगपंचमीनिमित्त तुळजाभवानी देवी लिंबूची माळ आणि सफरचंदाची आकर्षक सुंदर हार घालण्यात आला होता. रंगपंचमी निमित्त नैसर्गिक सप्तरंगाची उधळण करीत तुळजाभवानीच्या महावस्त्रावर नैसर्गिक सप्तरंग टाकून तुळजाभवानीची पारंपारिक पद्धतीने रंगपंचमी साजरी करण्यात आली.

यावेळी महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, पुजारी विशाल पाटील, संकेत पाटील, सागर गंगणे, सुहास कदम, रुपेश परमेश्वर, गजानन परमेश्वर, अभिजीत कुतवळ, गणेश हंगरगेकर, सुदर्शन पवार, बालाजी गंगणे, किरण अंदुरकर, दुर्गे छत्रे, निलेश टोले, विशाल जाधव यांच्यासह मंदिर अधिकारी व कर्मचारी सेवेकरी, गोंधळी, देवी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बुधवारी सकाळी रंगपंचमीनिमित्त नित्योपचार पंचामृत अभिषेक पूजा झाल्यानंतर तुळजाभवानीची अलंकार महापूजा मांडण्यात आली.

## जिल्ह्यात एम.डी. ड्रग्जच्या वाहतुकीवर कठोर कारवाई करा : ओमप्रकाश राजेनिंबाळकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील परांडा आणि तुळजापूर तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात एम.डी. ड्रग्जची वाहतूक आणि विक्री होत असल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. या आमली पदार्थांच्या सेवनामुळे विशेषतः तरुण वर्गाच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असून, त्यांची पिढी उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.

यावर खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे पत्र लेखून तातडीने आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी सुचवले की, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (उछइ) मार्फत जिल्ह्यातील ड्रग्ज सिंडिकेट पूर्णपणे नष्ट करण्यासाठी सखोल चौकशी करण्यात यावी आणि गुन्हेगारांची सर्व पाळेमुळे शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई केली जावी. तसेच, सोलापूर, मुंबई आणि स्थानिक ड्रग्ज पेडलर्सच्या माध्यमातून एम.डी. ड्रग्जच्या वाहतुकीत सहभागी असलेल्या गुन्हेगारांवर नार्कोटिक्स विभागांतर्गत कारवाई करावी.



खा. राजेनिंबाळकर यांनी संबंधित यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याचे आवाहन केले.

## सिना कोळेगाव धरणातून साकत धरणात सोडलेले पाणी बंद करा

### सोनारी येथील हरणवडा रस्त्यावर शेतकऱ्यांचे रस्ता रोको व जलसमाधी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ मार्च -**

पाण्यासाठी शेतकरी आक्रमक झाले असुन सिना कोळेगाव धरणातून साकत धरणात कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आले आहे त्यामळे भोंजा, कुंभेजा, सोनारी, डोंजा, आलेश्वर, कौडगाव, खानापूर व डोमगाव या परिसरातील समस्त शेतकऱ्यांनी पाणी बंद करा या मागणीसाठी दि.१९ मार्च रोजी शासनाच्या विरोधात सकाळी ११ वाजता हरणवडा या ठिकाणी रस्ता रोको व जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे.

त्यामुळे परंडा तालुक्यात एकच खळबळ उडाली असून आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी म्हणंटले आहे की, सिना कोळेगाव धरणातून मागील दोन महिन्यापासून कालव्याद्वारे साकतकडे पाणी चालू आहे. परंतु धरणामध्ये आम्हाला दोन महिने पण पुरणार नाही एवढाच पाणीसाठा शेतीसाठी उपलब्ध आहे तरी नियोजन नसताना व साकत तलाव सिना कोळेगाव लाभ क्षेत्रात नसताना त्यांना पाणी देण्याचे चालू आहे. कालव्याचे काम पूर्ण रित्या झाले नसतानाही आपण पाणी सोडले आहे. त्यामुळे आम्ही लावलेल्या ऊस पिकाचे आतोनात नुकसान होणार आहे व त्यासाठी आपण सर्वजण जबाबदार राहणार आहात जर यातून आमचे नुकसान झाल्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल शेतकऱ्यांच्या हितासाठी सोडलेली पाणी बंद करा, अशी मागणी शेतकरी करीत आहेत पाणी बंद करा या मागणीसाठी शेतकरी आक्रमक झाले असून भर उन्हात आंदोलन करण्यात आले आहे.



तर काही शेतकरी जलसमाधी आंदोलन करीत आहेत.

यावेळी परिसरातील आठ ते दहा गावचे शेतकरी आंदोलनास उपस्थित होते. काही काळ आंदोलन करते शेतकरी व अधिकारी यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## टॉवरवरील उपकरणे चोरणारा उच्चशिक्षित आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

इंडस टॉवरवरील इलेक्ट्रॉनिक उपकरणांची चोरी करणाऱ्या एका उच्चशिक्षित आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. राजेश आचार्य असे या आरोपीचे नाव असून तो पूर्वी रिकाम कंपनीत अभियंता (इंजिनियर) म्हणून कार्यरत होता.

दिनांक १७ मार्च २०२५ रोजी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. येडशी येथील इंडस टॉवर कंपनीच्या टॉवर क्रमांक १०६९८६२ वरील एअरटेल कंपनीचा आय वेन डिवाइस डिश अँटेना अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता. या प्रकारानंतर धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांत टेलिकॉम टॉवरवरील उपकरणे चोरीचे गुन्हे दाखल झाले.

## नॅचरल डेअरीमार्फत दुध उत्पादन वाढीसाठी दुध उद्योगात क्रांती करणार : बी.बी. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

नॅचरल उद्योग समुहातील नॅचरल डेअरीचा १४ वा वर्धापन दिन व दुग्धजन्य पदार्थ विस्तारीत प्रकल्पाचा शुभारंभ डॉ. शैलेश मदने, आंतरराष्ट्रीय विक्री व्यवस्थापक- पशु पोषण, अ‍ॅडव्हॉन्स्ड इन्झाइम्स टेक्नॉलोजीस लि. मुंबई यांचे शुभहस्ते व नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.१८ मार्च रोजी संपन्न झाला.



याप्रसंगी बोलताना डॉ. शैलेश मदने यांनी सांगितले की, दुध धंदयाकडे व्यवसाय म्हणून पाहावे. दुध धंदा हा कष्टाचा असला तरी त्यामधील कष्ट कमी करणेसाठी अभ्यासपुर्ण लहान लहान बाबींचा विचार करून हा व्यवसाय करावा. शास्त्रीय पध्दतीने नियोजन केले तर दुध व्यवसायात २० टक्के दुध उत्पादन वाढते. दुध व्यवसायात ५ तत्वाचा वापर अत्यंत महत्वाचा असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामध्ये जनावरांना पिण्याचे पाणी शुध्द असले पाहिजे. जनावरांसाठी मुरघास वापर केला पाहिजे. गोठयातील तापमान संतुलीत असले पाहिजे, त्यासाठी शेडवरील पत्र्यांना वरून पांढरा रंग लावून गोठयातील तापमान कमी केले पाहिजे. जनावरांना दर तीन महिन्यानी जंताचे औषध दिले पाहिजे व जनावरांच्या आजाराचे रेकॉर्ड ठेवले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुध काढणेसाठी मशिनचा वापर करणे या बाबी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना कृषिरत्न ठोंबरे म्हणाले की, नॅचरल डेअरीचे माध्यमातून सर्व सामान्य जनतेला आर्थिक स्थैर्य देण्याचे मोठे काम केले आहे. ऊस उत्पादन वाढीसाठी वापरण्यात येणारी एआय टेक्नॉलॉजी (कृत्रिम बुध्दीमता) यापुढे नॅचरल डेअरीमध्ये दुध उत्पादन वाढीसाठी वापरण्यात येणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होणेसाठी उत्पादकांचे अभ्यास दौरे नॅचरल डेअरीमार्फत आयोजित केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दुध संकलक व दुध उत्पादक यांचेसाठी ५० टक्के सबसिडीवर एसएस कॅन देण्यात येणार असल्याचेही याप्रसंगी सांगितले.

प्रास्ताविक श्रीपाद ठोंबरे, डेअरी समन्वयक यांनी केले. सुत्रसंचलन कृषीभूषण पांडूरंग आवाड यांनी केले तर अनिल ठोंबरे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, सभासद दुध उत्पादक, कर्मचारी उपस्थित होते.

## तहसीलात रंगपंचमी जोमात; नागरिकांचे कामे कोमात

### कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्या...

### इमारतीत सर्वत्र सप्तरंगाचा सडा...

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.१९ मार्च -**

येथील तहसील कार्यालयामधील कर्मचारी रंगपंचमी दिवशी कार्यालयीन वेळेत तहसील कार्यालयाच्या परिसरातच रंगपंचमी खेळण्यात दंग असल्याचे चित्र तहसील कार्यालयात कामकाजासाठी आलेल्या नागरिकांना दिसून आले आहे. तहसील कार्यालय इमारत परिसरात मोठ्या प्रमाणात रंग खेळण्यात आल्याने सर्वत्र रंगाचे सडे पडल्याचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होऊन धुमाकूळ घालत आहेत.

**कारवाईवर नागरिकांचे लक्ष**

तालुक्यातून ग्रामीण भागातील शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने कामानिमित्त तहसील कार्यालयात दररोज येत असतात. अशा नागरिकांचे कामे करण्याऐवजी तहसील कार्यालयाचे कर्मचारी रंग खेळण्यात दंग असल्याचे बघून नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. तहसील कार्यालयाच्या इमारतीत पार्किंग एरियासह पायऱ्या आणि कामकाजाच्या ठिकाणी रंग पडलेले दिसून येत आहेत तर कर्मचाऱ्यांचे दालन रिकामे दिसत आहेत. शासकीय कार्यालयात रंग आल्याने महत्त्वाच्या कागदपत्रांवर देखील रंग पडू शकतात. कार्यालयातील नागरिकांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांसह शासकीय कागदपत्रे देखील रंगाने खराब होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. नागरिकांच्या कामापेक्षा रंग खेळण्यात कर्मचारी वेळ घालत असल्याचे चित्र तहसील कार्यालयात दिसून आल्याचे नागरिकांनी सांगितले.

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडिओ नंतर वरिष्ठ अधिकारी रंगात माखलेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.



